सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर गुरूवार, दि. २३ मे २०२५ वर्ष - तिसरे अंक ५१ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


**छत्रपती संभाजीनगर** – पांडे आयर्न अ‍ॅण्ड ट्रेडींग कं., शहा स्टील ट्रेडर्स, रॉयल ट्रेडर्स, वाय.के.ट्रेडर्स, **नारेगाव** – एन.के.ट्रेडर्स, **हर्सुल** – सुरेश ट्रेडर्स अँड हार्डवेअर, **बेरीबाग** – सारा ट्रेडर्स, **सावंगी** – अंजनी ट्रेडर्स, **पिसादेवी** – देवदत्त ट्रेडर्स, **शेंद्रा एमआयडीसी** – निशांत ट्रेडर्स, **करमाड** – साई बिल्डींग मटेरिअल अ‍ॅण्ड सप्लायर्स, **आडुळ** – शिवकृपा ट्रेडर्स, **वाळुजगाव** – चंद्रपुष्प इंटरप्राईजेस, **पडेगाव** – कमलेश ट्रेडींग कं, **वैजापूर** – राजाराम स्टील ट्रेडर्स, **लोणी**– बाबा ट्रेडर्स, **देवगाव रंगारी** – मराठवाडा ट्रेडर्स, **खंडाळा** – रविराज अ‍ॅग्रो एजन्सीज, **गंगापूर** – हरिओम ट्रेडर्स, **लासूर स्टेशन** – साई ट्रेडिंग कंपनी (मढीकर), **लिंबेजळगाव** – श्री.विठ्ठल कृपा ट्रेडर्स, **महालगाव** – महालक्ष्मी स्टील ट्रेडर्स, **शिऊर बंगला** – जलाल ट्रेडर्स, **पैठण** – संजय ट्रेडर्स, **बिडकीन** – मानधने स्टील ट्रेडर्स, **वासडी** – संतोष ट्रेडर्स, **पिशोर** – रेणुका ट्रेडर्स, **सिल्लोड** – सहारा ट्रेडर्स, **गोळेगाव** – सागर ट्रेडर्स, **उंडणगाव** – श्री.गणेश ट्रेडर्स, **अंधारी** – विशाल ट्रेडर्स, **आळंद** – गजानन ट्रेडर्स, **फुलंब्री** – गजानन ट्रेडर्स, शिव ट्रेडर्स, **पाल फाटा** – योगराज ट्रेडींग कंपनी, श्री.जगदंबा स्टील ट्रेडर्स, **बोरगाव गणपती** – संजय हार्डवेअर, **सुलतानपूर** – लक्की मशिनरी स्टोअर्स, **कन्नड** – मोरया ट्रेडर्स, **विहामांडवा** – वर्धमान हार्डवेअर अँण्ड मशिनरी, **शिऊर** – विठ्ठल ट्रेडर्स, **औराळा** – बालाजी ट्रेडर्स, **पाणपोईफाटा** – भगवती स्टील, **पाचोड** – श्रीनाथ ट्रेडर्स अ‍ॅण्ड हार्डवेअर, **चितेगाव** – दुर्गा स्टील ट्रेडर्स.

आयकॉन स्टील
टीएमटी बार

## पंतप्रधान मोदींच्या हस्ते पुनर्विकसित १०३ स्थानकांचे उद्घाटन

बिकानेर : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बिकानेरमधून व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे एकाचवेळी देशातील पुनर्विकसित केलेल्या १०३ रेल्वे स्थानकांचे उद्घाटन करण्यात आले. भारतातील १८ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील ८६ जिल्ह्यांमध्ये ही १०३ रेल्वे स्थानके आहेत. यात महाराष्ट्रातील पंधरा स्थानके आहेत.

अमृत भारत योजनेंतर्गत महाराष्ट्रातील आमगाव, चांदा फोर्ट, चिंचपोकळी, देवळाली, धुळे, केडगाव, लासलगाव, लोणंद जंक्शन, माटुंगा, मूर्तिजापूर जंक्शन, नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी जंक्शन, परळ, सावदा, शहाड व वडाळा रोड या स्थानकांचा कायापालट करण्यात आला आहे. पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते पुनर्विकसित केलेल्या १०३ रेल्वे स्थानकांचे उद्घाटन करण्यात आले. या सोहळ्यात महाराष्ट्रातील मुंबईच्या परळ स्थानकातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांनी अमृत भारत योजनेतील कामाचे कौतुक केले. तसेच या योजनेसाठी पंतप्रधान मोदी आणि रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार मानले.

सरकारने राबवलेल्या अमृत भारत योजनेत रेल्वे स्थानकांचा कायापालट करण्यात आला. प्रवाशांकरिता सुखसोयींची व्यवस्था करण्यात आली. रेल्वे स्थानकाच्या दर्शनी भागाचे रुपडे पालटताना स्थानिक भागात कोणत्या संस्कृतीचा अथवा परंपरेचा प्रभाव आहे का याचा प्रधान्याने विचार करण्यात आला. रेल्वे स्थानकात प्रवाशांना विविध प्रकारची माहिती देण्यासाठी सहज दिसतील आणि पटकन वाचून समजतील असे डिस्प्ले बोर्ड आणि इंडिकेटर ठिकठिकाणी बसवण्यावर भर देण्यात आला. स्थानकात येण्याजाण्याचे मार्ग तसेच स्थानकातील जिने - पादचारी पूल, लिफ्ट, एस्कलेटर हे सर्व प्रशस्त करुन प्रवाशांची सोय करण्यात आली. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, महिला आणि पुरुषांसाठीची स्वच्छतागृहे, सीसीटीव्ही, सार्वजनिक घोषणा प्रणाली या सर्व व्यवस्थांचे आधुनिकीकरण करण्यात आले. वृद्ध आणि दिव्यांगांसाठी स्थानकावर ठिकठिकाणी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. स्थानकाजवळ प्रशस्त वाहन तळ उभारण्यात आले. प्रचंड गर्दीच्या स्थानकांवर फूड कोर्ट, किओस्क, रिटेल आऊटलेटची विशेष व्यवस्था करण्यात आली. लांब पल्ल्याच्या गाड्या ज्या स्थानकांवर थांबतात तिथे प्रतीक्षालय, बसण्याची प्रशस्त जागा, प्रकाशयोजना, वायुवीजन, स्वच्छता यावर प्रचंड भर देण्यात आला आहे.

केंद्र सरकार अमृत भारत योजनेत देशातील १३०० पेक्षा जास्त रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास करत आहे. याच योजनेंतर्गत १०३ स्थानकांच्या पुनर्विकासाचे काम करण्यात आले आहे. या स्थानकांचे एकाचवेळी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे पंतप्रधान मोदींनी उद्घाटन केले.

अमृत भारत योजनेअंतर्गत प्रादेशिक वास्तुकला प्रतिबिंबित करण्यासाठी आणि प्रवाशांच्या सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी डिझाइन केलेल्या १,३०० हून अधिक स्थानकांचा पुनर्विकास आधुनिक सुविधांसह केला जात आहे. करणी माता मंदिरात येणाऱ्या यात्रेकरू आणि पर्यटकांना सेवा देणारे देशनोके रेल्वे स्थानक मंदिर वास्तुकला आणि कमान आणि स्तंभ थीमने प्रेरित आहे. तेलंगणातील बेगमपेट रेल्वे स्थानक काकतिया साम्राज्याच्या स्थापत्यकलेपासून प्रेरित आहे. बिहारमधील थावे स्थानकात ५२ शक्तीपीठांपैकी एक असलेल्या माँ थवेवलीचे प्रतिनिधित्व करणारे आणि मधुबनी चित्रांचे चित्रण करणारे विविध भित्तिचित्रे आणि कलाकृतींचा समावेश आहे. गुजरातमधील डाकोर स्थानक रणछोडराई जी महाराजांपासून प्रेरित आहे. भारतातील पुनर्विकसित अमृत स्थानकांमध्ये सांस्कृतिक वारसा, दिव्यांगजनांसाठी असलेल्या प्रवाशां-केंद्रित सुविधांसह आधुनिक पायाभूत सुविधा आणि प्रवासाचा अनुभव वाढविण्यासाठी शाश्वत पद्धतींचा समावेश आहे.

## केरळात मान्सूनचे आगमन ४ ते ५ दिवसात

पुणे : नैऋत्य मोसमी वारे वेगाने भारतीय भूभागाकडे प्रवास करीत असून, येत्या ४ ते ५ दिवसात ते देवभूमी केरळात दाखल होतील असा अंदाज भारतीय हवामान विभागाने मंगळवारी वर्तविला.

अरबी समुद्रात कर्नाटक किनारपट्टी लगत हवेची द्रोणीय स्थिती निर्माण झाली असून, त्याचे बुधवारी कमी दाबाच्या क्षेत्रात रूपांतर होणार आहे.याशिवाय दक्षिण कर्नाटक व आसपासच्या परिसरात हवेची द्रोणीय स्थिती आहे.बंगालच्या उपसागरात आंध्र प्रदेश, तामिळनाडू लगत हवेची द्रोणीय स्थिती आहे.यामुळे मान्सून च्य वाऱ्यांना गती मिळत असून, त्यांनी श्री लंकेचा बहुतांश भाग, दक्षिण अरबी समुद्र, दक्षिण बंगालचा उपसागराचा भाग व्यापला आहे. वाऱ्यांची घोड दौड सुरूच असून, येत्या ४ ते ५ दिवसात ते केरळात पोहोचतील.

अरबी समुद्रात निर्माण झालेल्या कमी दाबाचे क्षेत्र तसेच द्रोणीय स्थितीमुळे महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, केरळ किनारपट्टीवर मुसळधार पाऊस होत आहे. मंगळवारी कर्नाटक तसेच केरळच्या अनेक भागात अतिवृष्टी झाली.गेले ५ दिवस केरळात पाऊस सुरूच असल्याने लवकरच मान्सून केरळ मध्ये दाखल होणार असल्याचे संकेत आहेत.



महाराष्ट्र पासून ते केरळ पर्यंत येत्या सोमवारपर्यंत पावसाचा जोर राहणार आहे. अनेक भागात मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.विजांचा कडकडाट, जोरदार वारे आणि मुसळधार पावसात काळजी घेण्याचे आवाहन हवामान खात्याने केले आहे.

मंगळवारी पुणे शहर आणि लगतच्या भागात जोरदार पाऊस झाला. झाडे कोसळणे , रस्त्यावर पाणी साठले, गटारी तुंबल्याने अनेक ठिकाणी वाहतूक विस्कळीत झाली.३ ठिकाणी होर्डिंग्ज कोसळली, सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही.पुणे विमानतळ परिसरात मुसळधार पाऊस झाल्याने रन वे वर पाणी साचले.

## जम्मू-काश्मिरात २ दहशतवादी ठार, एक जवान हुतात्मा

### किश्तवाडच्या सिंगपोरा छत्रू परिसरात दहशतवाद्यांना वेढा

जम्मू, २२ मे : जम्मू-काश्मीरच्या किश्तवाडमध्ये आज, गुरुवारी सकाळी सुरू झालेल्या 'ऑपरेशन त्राशी' या चकमकीत सुरक्षा दलांनी आतापर्यंत २ दहशतवाद्यांना ठार केले आहे. तर, या चकमकीत एक जवान हुतात्मा झाला आहे. किश्तवारमधील सिंगपोरा छत्रू भागात ही चकमक सुरू आहे, जिथे सुरक्षा दलांनी दहशतवाद्यांच्या एका गटाला वेढा घातला आहे.

लष्कराच्या पॅरा स्पेशल फोर्सेस, ११ आरआर, आसाम रायफल्स आणि एसओजी किश्तवार यांच्या संयुक्त पथकाने गुरुवारी सकाळी ७ वाजेच्या सुमारास, सिंगपोराच्या जंगलात शोध मोहीम सुरू केली. यावेळी दहशतवादी आणि सुरक्षा दलमांमध्ये चकमक सुरू झाली. लष्कराच्या व्हाईट नाईट कॉर्प्सच्या माहितीनुसार, चकमकीमुळे अतिरिक्त सैन्य तैनात करण्यात आले आहे आणि संपूर्ण परिसर सील करण्यात आला आहे. सुरक्षा दलांनी २ दहशतवादी मारले आहेत, तर आणखी २ ते ३ दहशतवादी अजूनही परिसरात अडकले आहे. यामध्ये जिहादी दहशतवादी सैफुल्ला देखील असावा अशी शंका आहे. या चकमकीत एक जवान हुतात्मा झाला असून सुरक्षा दलांनी परिसरात शोध मोहीम हाती घेतली आहे.

गेल्या आठवड्यात पुलवामाच्या त्राल भागात सुरक्षा दलांनी जैश-ए-मोहम्मदच्या ३ दहशतवाद्यांना ठार मारले होते. आसिफ अहमद शेख, अमीर नजीर वानी आणि यावर अहमद भट अशी त्यांची नावे आहेत. यापूर्वी, शोपियानच्या जिनपथेर केलर भागात लष्कर-ए-तोयबाचे ३ दहशतवादी मारले गेले होते, त्यापैकी दोघांची ओळख शाहिद कुट्टे आणि अदनान शफी अशी झाली आहे.

## विदर्भातील ८६ हजार झुडपी जंगल वनक्षेत्र घोषित

### झुडपीवरील अतिक्रमण २ वर्षात हटवण्याचे सुप्रीम कोर्टाचे निर्देश

नागपूर, २२ मे : सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारचा आदेश रद्द करत विदर्भातील ८६ हजार ४०९ हेक्टर झुडपी जंगल वनक्षेत्र म्हणून घोषित केले आहे. यासोबतच, सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र आणि केंद्र सरकारला वनेतर कारणांसाठी जमीन रूपांतरणासाठी संयुक्तपणे योजना तयार करण्याचे निर्देश दिले. तसेच झुडपी जंगलावरील १९८० पासूनचे अतिक्रमण हटवण्यासाठी न्यायालयाने २ वर्षांची मुदत दिली आहे.

विदर्भातील 'झुडपी जंगल' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सुमारे ८६ हजार



४०९ हेक्टर जमिनीवरून एक महत्त्वाचा कायदेशीर वाद सुरू आहे. ही जमीन नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया, भंडारा आणि चंद्रपूर जिल्ह्यात पसरलेली आहे. झुडपी जंगल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जमिनीवर मोठ्या संख्येने लोक राहतात. एवढेच नाही तर या जमिनीवर अनेक विकास प्रकल्पही प्रस्तावित आहेत. तथापि, ती वनजमीन असल्याने, असे करण्यात अनेक अडचणी आल्या आहेत.

महाराष्ट्र सरकारने २०१४ ते २०१८ दरम्यान विविध सरकारी ठरावांद्वारे या जमिनी 'वन' श्रेणीतून काढून टाकण्याचा प्रयत्न झाला. जेणेकरून त्यांचा वापर विकास प्रकल्पांसाठी करता येईल. आणि या जमिनींवर राहणाऱ्या लोकांना जमिनीचे हक्क देता येतील. तथापि, पर्यावरणवादी आणि आदिवासी समुदायांनी याला विरोध केला, कारण त्यांनी असा युक्तिवाद केला की या जमिनी पारंपारिकपणे त्यांच्या वापरात होत्या आणि त्या वन संवर्धन कायद्याअंतर्गत संरक्षित राहिल्या पाहिजेत. या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी एक महत्त्वाचा निर्णय दिला. सरन्यायमूर्ती भूषण गवई यांच्या न्यायालयाने विदर्भातील झुडपी जंगल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जमिनीला वनक्षेत्र म्हणून घोषित केले. आपल्या आदेशात, सुप्रीम कोर्टाने महाराष्ट्र आणि केंद्र सरकारला वनेतर कारणांसाठी जमीन वळविण्यासाठी संयुक्त योजना तयार करण्याचे निर्देश दिले.

## महाराष्ट्र उद्योगांना प्रोत्साहन देणारे राज्य : उदय सामंत

पुणे, २२ मे : महाराष्ट्र हे उद्योगांना प्रोत्साहन देणारे राज्य असून सुमारे १५ लाख ७० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक राज्य शासनाने आणली आहे. मोठ्या उद्योगांसोबतच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना प्रोत्साहन म्हणून मोठ्या प्रमाणात सवलती देण्याचे राज्य शासनाचे धोरण आहे, असे प्रतिपादन उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केले. चाकण औद्योगिक वसाहतीतील उद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठी राज्यशासन आवश्यक ते सर्व प्रयत्न करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

चाकण येथील उद्योगांच्या समस्यांबाबत चाकण येथे सर्व संबंधित शासकीय विभाग आणि उद्योग संघटनांसोबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार बाबाजी काळे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य अभियंता नितीन वानखडे, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस उपायुक्त बापू बांगर, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक संजय कदम आदींसह उद्योग संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

सामंत म्हणाले, चीन देशातून उद्योग बाहेर पडत असताना ते भारताकडे येत असून त्याचा सर्वाधिक फायदा महाराष्ट्राला झाला आहे. मोठ्या उद्योगांबरोबरच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना प्रोत्साहन म्हणून मोठ्या प्रमाणा सवलती देण्यात येत असून त्याची माहिती उद्योगांनी घेऊन प्रगती करावी. गेल्या तीन वर्षात दिलेल्या सवलतींपेक्षा पुढील एकाच वर्षात ६ हजार १०० कोटी रुपयांची सवलत (इन्सेंटिव्ह) देण्याचा निर्णय घेतल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी उद्योग मंत्री सामंत यांनी उपस्थित उद्योग प्रतिनिधींच्या वीज, पाणी, वाहतूक कोंडी, रस्त्यांची स्थिती आदींबाबतच्या समस्या जाणून घेतल्या.

कामगार रुग्णालयासाठी जागेचे बैठकीतच हस्तांतरण

चाकण येथे कामगार रुग्णालय (ईएसआयसी) उभारण्यासाठी जागा मिळण्याबाबतचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याचे उद्योजकांनी सांगितले. त्यावर उद्योगमंत्री सामंत यांनी बैठक संपेपर्यंत कार्यवाही करून जागा उपलब्ध करून देण्याबद्दल निर्देश दिले. बैठक संपताच विभागाने आवश्यक ती कार्यवाही करून उद्योगमंत्री यांच्या हस्ते सादर जागेच्या हस्तांतरणाबाबतचे पत्र संघटनेकडे सुपूर्त करण्यात आले. त्याबद्दल आमदार काळे आणि उद्योगांनी मंत्री सामंत यांना धन्यवाद दिले.

चाकण औद्योगिक वसाहतीमध्ये सुरक्षेच्या उपायोजना म्हणून स्ट्रीटलाईट, सीसीटीव्ही या उपाययोजना करण्यात याव्यात, असे त्यांनी सांगितले. स्ट्रीटलाईटचे काम सुरू असून विशेष बाब म्हणून सीसीटीव्ही बसविण्यासाठी निधी देण्यात येईल, असेही उद्योगमंत्र्यांनी स्पष्ट केले.

या ठिकाणी १५० ट्रक उभे राहू शकतील असे ट्रक टर्मिनस आहे. रस्त्यावरील वाहतूक कोंडी आणि अपघात टाळण्यासाठी औद्योगिक वाहतूक करणारे ट्रक या ठिकाणी उभे राहतील या दृष्टीने संघटनांनी पोलिसांना सहकार्य करणे आवश्यक आहे. तसेच एमआयडीसीतील मोकळ्या जागांचे एमआयडीसी पोलीस विभाग तसेच उद्योग प्रतिनिधींनी संयुक्त सर्वेक्षण करून विकेंद्रीत स्वरूपात छोट्या छोट्या जागा शोधून २५- ३० ट्रक थांबू शकतील अशी व्यवस्था करावी. वाहतुकीला शिस्त लागेल यासाठी पोलिसांनी कठोर कारवाई करावी.

सुरळीत वीज पुरवठ्याच्या अनुषंगाने महापारेषण आणि महावितरण कंपनीने समन्वयाने आवश्यक तेथे हाय टेन्शन वाहिन्या, फीडर, डिस्ट्रीब्यूशन ट्रान्सफॉर्मर आदी नवीन पायाभूत सुविधा तसेच अस्तित्वातील सुविधांचे उन्नतीकरण, विस्तारीकरण करावे, असे निर्देशही सामंत यांनी दिले. त्यानुसार सुमारे ४२० कोटींची कामे सुरू असून ६६४ कोटी रुपयांच्या विविध कामांच्या निविदा झाल्या आहेत, असे महापारेषणच्या वतीने सांगण्यात आले. ही कामे गतीने आणि टप्प्या टप्प्याने पूर्ण करून लवकरात लवकर उद्योगांना दिलासा द्यावा. वीज यंत्रणेच्या दुरूस्तीसाठी आठवड्यात जो खंड घेण्यात येतो त्याचा सोईचा दिवस ठरविण्यासाठी महावितरण, महापारेषणने उद्योग प्रतिनिधींशी चर्चा करून निर्णय घ्यावा. उद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठी नोडल अधिकारी नेमावा, आदी सूचना सामंत यांनी दिल्या.

## राष्ट्राचे रक्षण शस्त्रानेच करावे लागते ! - मेजर गौरव आर्य, चाणक्य फोरम्

फोंडा, गोवा - राष्ट्राचे रक्षण शस्त्रानेच करावे लागते. साधूसंतांच्या रक्षणासाठी श्रीरामाचा जन्म झाला. मुघलांचे आक्रमण वाढल्यानंतर हिंदूंच्या रक्षणासाठी छत्रपती शिवाजी महाराज, गुरुगोविंदसिंग यांचा जन्म झाला. सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवात हिंदूंच्या रक्षणासाठी प्रभु श्रीराम पुन्हा अवतीर्ण झाल्याचा साक्षात्कार होत आहे, असे वक्तव्य 'चाणक्य फोरम'चे मुख्य संपादक तथा सेवानिवृत्त मेजर गौरव आर्य यांनी केले. 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'त 'सनातन राष्ट्र आणि सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचे विविधांगी कार्य' या सत्रात 'सनातन राष्ट्राची सुरक्षा' या विषयावर गौरव आर्य यांनी विचार मांडले.

या वेळी व्यासपिठावर स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे कार्याध्यक्ष श्री. रणजित सावरकर, पंजाब गोरक्षक दलाचे संस्थापक अध्यक्ष श्री. सतीश प्रधान, सनातन संस्थेचे धर्मप्रचारक सद्गुरु नंदकुमार जाधव आणि हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र व छत्तीसगड राज्याचे समन्वयक श्री. सुनील घनवट उपस्थित होते.

हिंदू बलशाली होण्याकडे दुर्लक्ष केल्यानेच देशाचे अवमूल्यन ! - रणजित सावरकर



'हिंदूंचे राजनितीकिरण आणि राजनीतीचे सैनिकीकरण होणे आवश्यक आहे. हिंदू बलशाली व्हायला हवेत. स्वातंत्र्यानंतर देशात सत्तेवर आलेल्या सरकारने याकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे देशाचे अवमूल्यन झाले. त्या काळात सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांनी हिंदूंच्या संघटनाला प्रारंभ केला. सनातनच्या गोवा येथील आश्रमात आल्यावर मला सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक कार्याची प्रचिती आली. सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले असे एकमात्र व्यक्ती आहेत, जे राष्ट्राला दिशा देण्यासाठी कार्य करत आहेत. हिंदूंना बळशाली करण्यासाठी कार्य करणारे सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले करत आहेत, असे स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे कार्याध्यक्ष श्री. रणजित सावरकर यांनी या वेळी म्हटले.

या वेळी श्री. सुनील घनवट म्हणाले, ''हिंदूंना धर्मशिक्षण प्राप्त व्हावे, यासाठी हिंदु जनजागृती समितीने धर्मशिक्षणवर्ग चालू केले. सद्यस्थितीत देशात समितीच्या वतीने ५०० ठिकाणी धर्मशिक्षणवर्ग चालू आहेत. समितीने समाजाला दिशा देण्याचे कार्य केले आहे.'' सनातन संस्थेचे सद्गुरु नंदकुमार जाधव म्हणाले, ''सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांनी साधकांना मार्गदर्शन करून जगभर अध्यात्मप्रसार केला आहे. तसेच नृत्य, गायन, संगीत याद्वारे अध्यात्मिक प्रगती कशी करायची याचे मार्गदर्शन त्यांनी केले.'' पंजाब गोरक्षक दलाचे संस्थापक अध्यक्ष श्री. सतीश प्रधान म्हणाले की, महाराष्ट्रात गोमातेला राज्यमातेचा दर्जा देण्यात आला, त्याप्रमाणे हिंदूंच्या आस्थेचा विचार करून सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाच्या निमित्ताने गोवा सरकारनेही गोमातेला राज्यमातेचा दर्जा द्यावा.



CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सावरकर-होळकर जन्मोउत्सवानिमित्त रक्तदान शिबाराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२२ मे -**

नळदुर्ग शहरात ब्राह्मण समाज संघटनेच्या वतीने येत्या २८ मे रोजी महान देशभक्त स्वा.वि.दा. सावरकर यांची जयंती व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्त सावरकर होळकर जन्मोउत्सव एकत्रितपणे साजरा करण्यात येणार आहे.

यनिमित्त २८ मे रोजी सकाळी १० ते २ या वेळेत नळदुर्ग येथील मल्लिकार्जुन मंदिर येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या रक्तदान शिबिराचे उदघाटन धाराशिव जिल्हा भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष दत्ता कुलकर्णी यांच्या हस्ते होणार आहे.

नळदुर्ग शहरात ब्राह्मण समाज संघटनेने अनेक सामाजिक व धार्मिक कार्यक्रमाचे आजपर्यंत आयोजन केले आहे मात्र यावर्षी सावरकर-होळकर जन्मोउत्सव एकत्रितपणे साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. दि.२८ मे रोजी सकाळी १० वाजता या दोन्ही महापरुषांच्या प्रतिमेचे पुजन होईल.

तरी जास्तीत जास्त तरुणांनी या रक्तदान शिबिरात सहभागी व्हावे व कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन नळदुर्ग शहर ब्राह्मण समाज संघटनेचे अध्यक्ष व माजी नगरसेवक विनायक अहंकारी, संघटनेचे सचिव मुकुंद नाईक व उपाध्यक्ष प्रदीप ग्रामोपाध्याय यांनी केले आहे.



## संक्षिप्त वृत्त...

### रितू खोखर धाराशिवच्या नुतन पोलीस अधीक्षक

**धाराशिव, दि.२२ मे -**

पोलीस अधीक्षक संजय जाधव यांच्या जागी पोलीस अधीक्षक धारशिवच्या पोलीस अधीक्षकपदी २०१८ च्या बॅचच्या आयपीएस अधिकारी रितू खोकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. रितू खोकर ह्या भारतीय पोलीस सेवेतील २०१८ च्या बॅचच्या पोलीस अधिकारी आहेत. रितू खोकर ह्या मूळच्या हरियाणा राज्यातील पानिपत येथील आहेत. त्यांनी कुरुक्षेत्र विश्वम हाविद्यालय मधून एम. एस्सी. गणित विषयात सुवर्ण पदक पटकाविले होते. तत्कालीन गृहमंत्री राजनाथ सिंह यांनी त्यांच्या या यशाबद्दल त्यांना सन्मानित केले होते. रितू खोकर या सध्या सांगली जिल्ह्याच्या अपर पोलीस अधीक्षक आहेत. त्यापूर्वी त्यांनी अकोला जिल्ह्यातील अकोट येथे उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून काम केलेले आहे.





### जगदाळे विद्यालयात राजीव गांधींना अभिवादन

**वाशी, दि.२२ मे -**

कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी येथे जागतिक दहशतवादी विरोधी दिनानिमित्त भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक कदम, प्रा.डॉ. अरुण गंभीरे, प्रा. शामसुंदर डोके, प्रा. राहुल कुलकर्णी व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. अशोक कदम म्हणाले कि, देशामध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञान वाढवण्यामध्ये स्वर्गीय राजीव गांधी यांचे मोलाचे योगदान आहे. देशांतर्गत विविध योजनेमध्ये संगणकाचा वापर त्यांच्या कार्यकाळामध्ये मोठ्या प्रमाणात करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. आनंद करडे यांनी केले. तर सुत्रसंचलन व शपथवाचन प्रा. राहुल कुलकर्णी यांनी केले तर आभार प्रा.एम.डी. उंदरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मोहन डोलारे, शिवाजी साळुंके, विजय जाधव, स्वप्निल शेलकांदे यांनी परिश्रम घेतले.

### परंड्यात आज शेतकऱ्यांसाठी सस्ती अदालत

**परंडा, दि.२२ मे -**

महसूल मंत्री बावनकुळे यांनी शेत रस्त्याबाबतची प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्याचे निर्दे



श दिल्याने त्याच अनुषंगाने विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्रानुसार शेतकऱ्यांना अतिक्रमित शेत रस्ते, पांदण रस्ते मोकळे करणे कामी जलद न्याय मिळावा व प्रकरणाचा तातडीने निपटारा व्हावा यासाठी परंडा तालुका स्तरावर तहसील कार्यालयात उद्या दि.२३ मे शुक्रवार रोजी सस्ती अदालतीचे आयोजन तहसीलदार निलेश काकडे यांच्या उपस्थित होणार आहे. तरी संबंधित सस्ती आदालतीचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा, असे आव्हान तहसील कार्यालय व महसूल विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

### अध्यक्षपदी विशाल शिंगाडे यांची निवड

**धाराशिव, दि.२२ मे -**

शासनमान्य विद्युत ठेकेदार संघटनेच्या अध्यक्षपदी विशाल शिंगाडे यांची निवड करण्यात आली आहे.



या निवडीचे जिल्हाभरातील विद्युत ठेकेदार व कामगारांमधून स्वागत होत आहे. धाराशिव येथे बुधवारी झालेल्या बैठकीमध्ये शासनम ान्य विद्युत ठेकेदार यांची नवीन कार्यकारणी घोषीत करण्यात आली. नूतन कार्यकारिणीत अध्यक्षपदी विशाल शिंगाडे, उपाध्यक्ष शंकर कोळगे, कार्याध्यक्ष नानासाहेब देवकर, सचिव राजाभाऊ पांचाळ, सहसचिव संदीप रोकडे, कोषाध्यक्ष अतुल टेकाळे, तुळजापूर विभाग प्रमुख बापूसाहेब घोंगते, सोशल मीडिया प्रमुख शुभम कुंभार, लोहारा-उमरगा तालुकाध्यक्ष महेश जाधव, भूम तालुकाध्यक्ष परमेश्वर नाईकनवरे, कळंब तालुकाध्यक्ष विशाल जाधवर आणि वाशी तालुकाध्यक्षपदी किशोर ढेंगळे यांची निवड करण्यात आली.

### वधू-वर परिचय मेळाव्याची तयारी पूर्ण

**तुळजापूर, दि.२२ मे -**

तुळजापूरमध्ये रविवार दि.२५ मे रोजी सकल मराठा समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळाव्याची जय्यत तयारी पूर्ण झाली असून बुधवार दि.२१ रोजी सायंकाळी ६ वाजता येथील श्रीनाथ मंगल कार्यालयात संयोजन समितीची बैठक घेऊन मराठा समाज वधु-वर मेळाव्या संदर्भात भोजन व्यवस्था, नोंदणी कक्ष, प्रमुख पाहुणे, सत्कार मुर्ती, मार्गदर्शक, बैठक व्यवस्था, नियोजन आदी विषयांवर अंतिम आढावा घेण्यात आला. आतापर्यंत म ोठ्या संख्येने वधू-वरांची कच्ची नोंदणी झालेली आहे. हा मेळावा रविवार दि.२५ मे रोजी तुळजापूर येथील नळदुर्ग रोडवरील श्रीनाथ मंगल कार्यालयात होणार आहे.

# वाशी तालुक्यात जलजीवन मिशन योजनेची कामे अपूर्ण

## धरण उशाला कोरड घशाला | नांदगाव ग्रामस्थांची पाण्यासाठी वणवण

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२२ मे -**

ग्रामीण भागातील नागरिकांचे पाण्यासाठी हाल होऊ नये म्हणून शासनाने कोट्यावधी रुपये खर्चून अनेक वेगवेगळ्या योजना सुरू केल्या आहेत. पण या योजना ग्रामीण भागात फक्त कागदावरच राबवल्या जातात का? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. शासनाने 'हर घर नल' चा नारा देऊन बराच कालावधी उलटला आहे. जल जीवन मिशन अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या या योजनेचा उद्देश आहे की, २०२४ पर्यंत, देशातील प्रत्येक कुटुंबाला दररोज नळाद्वारे पिण्याचे स्वच्छ पाणी उपलब्ध व्हावे. परंतु २०२५ अर्ध वर्ष संपलं तरी ग्रामीण भागातील बहुतांश गावात पाणी पोहोचले नसल्याचे वास्तव समोर येत आहे.

ग्रामीण भागातील जल जीवन मिशन या योजनेची वस्तुस्थिती फार विदारक असल्याचे दिसते. अनेक ठिकाणी ह्या योजना कादावारच आहेत, तर काही गावात अर्धवट अवस्थेत आहेत. याला जबाबदार कोण? यामुळे नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील गावात म ोठ्या प्रमाणात जलजीवन मिशन योजनेची कामे रखडलेली आहेत. याकडे संबंधित प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. तालुक्यातील नांदगाव ग्रामस्थांची संपूर्ण उन्हाळा झाली. पाण्यासाठी सुरु अलेली वणवण थांबेना झाली.



गावापासून काही अंतरावर मोठा तलाव आहे. या तलावात मोठ्या प्रमाणात पाणी साठा उपलब्ध असून मागील १० ते पंधरा वर्षे झाली तलावातील पाणी साठा कमी झाला नसल्याचे गावातील जाणकार मंडळी सांगतात. मागच्या काही वर्षांपूर्वी जिल्ह्यात मोठा दुष्काळ पडला होता. त्यावेळी शासनाने याच तलावातून धाराशिव जिल्ह्यातील अनेक गावात पाणी पुरवठा केला होता. त्यावेळी देखील तलावाची पाणी पातळी कमी झाली नव्हती.

तसेच या तलावातून रोज इतर गावांसाठी पाणी पुरवठा सुरू आहे. मात्र तलाव गावाजवळ असताना नांदगावकरांची अवस्था म्हणजे धरण उशाला आणि कोरड घशाला अशी झाली आहे. तलाव गावाजवळ असून सुद्धा नागरिकांवर पाण्यासाठी भटकंती करण्याची अशी वेळ आली आहे. गावातील महिला, मुलींना रात्री-बेरात्री पाण्यासाठी दोन ते तीन किलोमीटर शेतात जावे लागत आहे.

मात्र याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. संपूर्ण उन्हाळा संपत आला पण ग्रामपंचायत प्रशासनाने कुठल्याही प्रकारची व्यवस्था केली नसल्याचे गावातील नागरिकांचे म्हणणे आहे. गावाला शासनाकडून नवीन पाणीपुरवठा योजना मिळाली आहे.

योजनेचे काम ही पूर्ण झाले असल्याचे ग्रामस्थ सांगत आहेत. पण त्या योजनेच्या पाणी पुरवठा करणाऱ्या नवीन विद्युत पंपासाठी ग्रामपंचायत प्रशासनाने लाईटची व्यवस्था केलेली नाही. त्यामुळे ही पाणीपुरवठा योजना सद्या बंद आहे,असे गावातील लोक सांगत आहेत. आता संबंधित अधिकारी काय करतात हे पाहणे गरजेचे आहे.

### दहा दिवसापासून विद्युत पुरवठा खंडित; नागरिकांना, जनावरांना पाणी मिळेना...

दहा दिवसापासून गावात व शेतात सतत विद्युत पुरवठा खंडित होत असल्याने सटवाईवाडी गावातील नागरिकांचे तसेच शेतात जनावरांचे पाण्यासाठी हाल होत आहेत. याकडे महावितरणचे साप दुर्लक्ष आहे. या प्रश्नासाठी नागरिकांनी महावितरण कडे अनेकदा संपर्क साधला असता त्यांना आज विद्युत पुरवठा सुरळीत होईल उद्या विद्युत पुरवठा सुरळीत होईल असे सांगितले जात आहे. परिणामी विद्युत पुरवठा नसल्यामुळे शेतकऱ्यांना विहिरीत उतरून जनावरांसाठी तसेच नागरिकांना पिण्यासाठी पाणी काढावे लागत आहे. तरी देखील महावितरणला जाग येत नाही.

## आशियाई स्क्वॉश क्रीडा स्पर्धेसाठी वसुंधराची भारताच्या संघात निवड

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२२ मे -**

चेन्नई येथे येथे १५ ते १९ मे दरम्यान झालेल्या आशियाई निवड स्पर्धे त वसुंधरा मुकुंद नांगरे हिने पंधरा वर्षे वयोगटात देशात तिसरा क्रमांक मिळवून आशियाई स्पर्धेतील आपले स्थान पक्के केले.



जुलै महिन्यात दक्षिण कोरिया देशात होणाऱ्या आशियाई ज्युनिअर स्पर्धे साठी वसुंधराची भारताच्या संघात निवड झाली आहे. कळंब सारख्या ग्रामीण भागातील खेळाडू देशाच्या संघात खेळणे ही एक अभिमानाची गोष्ट आहे. सातत्याने सराव अनेक स्पर्धेचा अनुभव, जिद्द, चिकाटी, मेहनत वसुंधराला भारतीय संघात निवडीसाठी फायद्याची ठरली. कळंबच्या शिवछत्रपती स्क्वॉश अकॅडम ीत सराव करणाऱ्या वसुंधराला मुंबईत खार जिमखाना येथे आंतरराष्ट्रीय कोच अभिनव सिन्हा, रविंद्र नवले, कांगा, नवल खंडेलवाल, चेतन देसाई, करण गायकवाड यांचे पण म ोलाचे मार्गदर्शन लाभले. या तिच्या निवडी बद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

या निवडीबद्दल महाराष्ट्र स्क्वॉश संघटनेचे अध्यक्ष प्रदीप खांडरे, जिल्हा स्क्वॉश संघटनेचे सचिव महेश राजे निंबाळकर, जिल्हा क्रीडाधिकारी श्रीकांत हरणाळ, कैलास लटके, बी.के. नायकवाडी, मुख्याधिकारी मंजुषा गुरमे, गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळम ते, शिक्षक संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष बाळकृष्ण तांबारे, कुलदीप सावंत, लक्ष्मण मोहिते, संजय घुले, परमेश्वर मोरे इत्यादीनी तिचे अभिनंदन केले.

## वारंवार वीज पुरवठा खंडित; नागरिक आंदोलनाच्या पवित्र्यात





**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२२ मे -**

येथील भवानी रोड, आर्य चौक, साळुंखे गल्ली आणि कमान वेस या भागातील वीज वारंवार खंडित होत असल्याने येथील नागरिकांनी महावितरणाचे उपकार्यकारी अभियंता यांना निवेदन देऊन वारंवार खंडित होणारी वीज सुरळीत राहण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी केली असून जुने लोखंडी पोल काढून नवीन पोल टाकण्यात यावे असे निवेदनात म्हणले आहे.

दिवस आणि रात्रीच्या वेळेस होणाऱ्या या अनियमित वीजपुरवठ्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. विद्यार्थ्यांचा अभ्यास, व्यावसायिक कामकाज, वयोवृद्ध व रुग्णांची गैरसोय तसेच घरगुती उपकरणांचे नुकसान यामुळे होत आहे. महावितरण मंडळांने याचे गांभीर्य ओळखून तातडीने तांत्रिक कारणांचा शोध घेऊन या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढावा. तसेच भविष्यात वीजपुरवठा सुरळीत राहील याची योग्य ती खबरदारी घ्यावी.

लोखंडी पोल काढून त्याऐवजी नवीन पोल बसवावा, किंवा सद्यस्थितीत असलेल्या लोखंडी पोलला विद्युत प्रवाह लागू नये म्हणून पोलच्या खालून २० फूट पीव्हीसी पाइप लावण्यात यावा. अन्यथा, स्थानिक नागरिकांच्या वतीने महावितरण कार्यालया समोर लाक्षणिक उपोषण करण्यात येईल आणि तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

सदरील निवेदनावर सुदर्शन वाघमारे, ॲड. शुभम खोले, अनमोल साळुंके, दिनेश मस्के, सुमित साळुंके, ज्ञानेश्वर नागेश, गणेश मोरे, ओमकार लसणे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## उमरगा पोलीस निरीक्षक कार्यालयाचा सन्मान

### १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा अभियानात प्रथम क्रमांकाची गौरवशाली कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२२ मे -**

महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेच्या दुसऱ्या टप्प्यात, छत्रपती संभाजीनगर विभागातून उमरगा पोलीस निरीक्षक कार्यालयाने प्रथम क्रम ांक पटकावल्याबद्दल उमरगा शहरातील पोलीस विभागाचा भाजपा उमरगा शहर मंडळाच्या वतीने सन्मान व सत्कार करण्यात आला.



या यशामध्ये मोलाचा वाटा उचलणाऱ्या पोलीस निरीक्षक अश्विनी भोसले सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत भराते, तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक गजानन पुजारवड यांचा विशेष सन्मान करण्यात आला. सत्कार समारंभात भाजपा उम रगा शहर मंडळाचे अध्यक्ष ॲड. साईराज टाचले, भाजपा चे डॉ. कपिल महाजन, तसेच जगदीश जाखोटिया, संतोष वकारे, समर्थ दंडगे, स्वप्नील बदोले, यशवंत कोथींबरे आणि इतर भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

उमरगा पोलिस ठाण्याच्या पोलिस निरीक्षक अश्विनी भोसले यांचे प्रेरणादायी नेतृत्व आणि उमरग्यासारख्या सीमावर्ती भागातील पोलीस टीमचे कार्य हे सुशासन, शिस्तबद्धता आणि कार्यक्षमतेचे प्रतीक ठरत आहे.

## भवानी चौक, आर्य चौक, किसान चौकरस्त्याचे १२ मिटर रुंदीकरणा रखडले

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२२ मे -**

तुळजापूर विकास प्राधिकरणा अंतर्गत हुतात्मा स्मारक, भवानी चौक, आर्य चौक, किसान चौक या रस्त्याचे काम मागील २० ते २५ वर्षापासुन कुठल्या न कुठल्या कारणास्तव रखडले आहे. प्रशासनास माहीती मागितली तर प्रशासन हे मंत्रालयात प्रस्ताव आहे. तेथून मंजुरी मिळाली की काम चालु होईल असे सांगतात.

प्राधिकरणाच्या कामामुळे तेथील रस्ता, नाली संपूर्ण खराब झाली आहे. नवीन काम करता येत नाही. तेथील रहिवाशांना स्व:ताचे बांधकामही करता येत नाही. रस्ता खराब असल्याने गटारीही खराब झालेल्या आहेत. हा गावातील प्रमुख रस्ता असल्यामुळे त्यावर मोठ्या प्रमाणात रहदारी असते, त्यामुळे सामान्य नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

हा रस्ता मंदिरापासुन फक्त ५० मिटर अंतरावर येतो. नगर विकास विभागाचे प्रधान सचिवांनी स्वता: यात लक्ष घालुन आपल्या कार्यालयात आलेल्या प्रस्तावावर लवकरात लवकर कारवाई करावी म्हणून माजी नगरसेवक सुनील रोचकरी यांनी मंत्रालयात जाऊन नगर विकास विभागाचे प्रधान सचिवांना निवेदन दिले आहे.

## ऑपरेशन सिंदुरच्या विजयाच्या गगनभेदी घोषणांनी धाराशिव दणाणले

### भव्यदिव्य तिरंगा रॅलीने जागवला देशाभिमान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ मे -**

पहलगाम येथे आतंकवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात भारतीय पर्यटक मृत्युमुखी पडले. याचा भारतीय सैन्य दलाने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून बदला घेत पाकिस्तानला त्यांची औकात दाखवली. भारतीय सैन्याच्या या शूर पराक्रमाचा धाराशिव शहरात गुरुवारी भव्यदिव्य तिरंगा रॅली काढून गौरव करण्यात आला. भारत म ातेचा आणि भारतीय सैन्य दलाने केलेल्या कामगिरीचा जयघोष करीत या रॅलीने तमाम धाराशिवकरानी भारतवासीयामध्ये देशाभिमानाची ज्योत पेटवली.

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांच्या आदेशाने शिवसेनेतर्फे ही भव्य तिरंगा रॅली आयोजित करण्यात आली होती. शिवसेना जिल्हा सहसंपर्कप्रमुख भगवान देवकते, जिल्हा संघटक सुधीर पाटील, जिल्हाप्रमुख मोहन पनूरे यांच्या नेतृत्वात ही रॅली काढण्यात आली. रॅलीची सुरुवात राष्ट्रमाता जिजाऊ चौक येथून करण्यात आली. श्रीपतरावभोसले हायस्कूल, आरपी कॉलेज, छत्रपती संभाजी महाराज चौक, संत गाडगेबाबा महाराज चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या मार्गावरून छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे ही रॅली विसर्जित करण्यात आली. या रॅलीमध्ये शालेय विद्यार्थ्यांनी केलेल्या भारतीय जवानांच्या वेशभूषा सर्वांचे लक्ष वेधून घेत होत्या. नागरिकांच्या हातात असलेले तिरंगा ध्वज, देशभक्तीपर गाणी, वारकरी गीत यामुळे अवघे शहर दणाणून गेले.



या रॅलीमध्ये शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांसह महिला, शाळा व महाविद्यालयाचे विद्यार्थी, वारकरी, माजी सैनिक, देशाभिमानी नागरिक सहभागी झाले होते.

### रक्तदान शिबिर संपन्न

**धाराशिव, दि.२२ मे -**

जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुणालय मदत कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने शासकीय रक्तपेढी, जिल्हा रुग्णालय, धाराशिव येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन म हाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र चव्हाण यांच्या हस्ते झाले. शिबिरात मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुणालय मदत कक्षाचे प्रमुख डॉ. सुरज मोटे यांच्यासह भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, अभिजीत काकडे, सुजित साळुंखे, जिल्हा रक्तपेढीचे डॉ.तांदळे, डॉ.बांगर, डॉ. सोनाली, विठ्ठल कांबळे, आकाश राऊत, उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## नगरपरिषदेच्या सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्ष पदी शाम कनगरे, तर सचिव पदी वाल्मीक शिरसाठ



कन्नड:- कन्नड नगरपरिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था निवडणुका खेळी मेळीचा वातावरणात पार पडली. अध्यक्ष म्हणून शाम कनगरे,उपध्यक्ष सिद्धार्थ बनकर ,सचिव वाल्मिक शिरसाठ यांची निवड करण्यात आली. निवडणुकीसाठी,विशेष सहकार्य नगरपरिषदेचे देविदास पाटील, नारायण कनगरे यांनी केले.यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष शाम कनगरे म्हणाले की आगामी काळात पतसंस्थेच्या वृद्धीसाठी काम करणार असून त्यासाठी सर्व संचालक मंडळाला सोबत घेऊन काम करणार असल्याचे ते म्हणाले तर सचिव वाल्मिक शिरसाठ म्हणाले की पतसंस्थेच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना अडचणी सोडवण्यासाठी नेहमी कटिबद्ध राहू असे प्रतिपादन त्यांनी केले संचालक म्हणून शहाबाज अली सिकंदर अली, जगन शिरसे, सुखदेव पाचुंदे, हरणबाई साळवे, साईराम सपकाळ, यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे

## भारतीय सैन्यदलाचे सन्मानार्थ तिरंगा रॅली



तभा वृत्तसेवा

गंगापूर, दि.२२ : शिवसेना पक्षाचे मुख्य नेते मा. मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री मा. ना. एकनाथजी शिंदे साहेबाच्या आदेशाने गुरुवारी( ता.२२)सकाळी १० वाजता गंगापुर तालुका व शहर शिवसेनेच्या वतीने पहलगाम मधील दहशतवादी हल्ल्यात ऑपरेशन सिंदूर मोहीमेतून चोख प्रत्युत्तर देऊन पाकिस्तानचे कंबरडे मोडून ऑपरेशन सिंदुर यशस्वीरित्या पार पाडणाऱ्या भारतीय सैन्यदलाचे सन्मानार्थ तिरंगा रॅलीचे आयोजन सर्व पक्षीय करण्यात आले होते. यावेळेस शिवसेना उपजिल्हाप्रमुख दिलीपसिंग राजपुत, शिवसेना तालुकाप्रमुख दिलीपराव निरपळ, भाजपाचे किशोर धनायत, रविंद्र चव्हाण, डॉ, ज्ञानेश्वर निळ,माजी नगरसेवक प्रदीप भैय्या पाटील , माजी सभापती लक्ष्मणभाऊ सांगळे, उपजिल्हाप्रमुख अविनाश पाटील, माजी सभापती संतोष जाधव, विठ्ठल कोळेकर, मनोज जैस्वाल, लक्ष्मणसिंग राजपुत, प्रकाश दुबे, सचिन काकडे, अनिल चव्हाण, बाळासाहेब चव्हाण, सतिश हिवाळे, महेंद्र गडे, नानासाहेब दंडे, राजाभाऊ दंडे शिवाजी देवभोने, बापु जोशी, रामभाऊ दायमा, भाग्येश गंगवाल, आबासाहेब सिरसाट, फैसल चाऊस, भारत पाटील, संदीप बोजवारे, उत्तम गुढेकर, नंदकुमार राऊत, सारंगधर जाधव,संदीप मनोरे, गणेश पाटेकर, मुन्ना गवळी, ताराचंद पवार, विलास सौदागर, कृष्णकांत व्यवहारे,अतुल रासकर, योगेश केरे, किशोर मगर, बाळासाहेब शिंदे, रमेश चव्हाण, शरद गांधी. महेंद्र गुर्देचा, योगेश राजपुत, आकाश काटकर, शुभम भालेराव, पोपर बनकर, वाल्मीक सिरसाट, गौरव तांगडे, साईनाथ वणे, रामेश्वर मिसाळ, पोपट परभणे,हरिभाऊ शिंदे, ताराचंद दुबिले, कृष्णा वल्ले ,बाळू तांबे,अविनाश इष्टके, बंडू मिसाळ, देविदास तांबे, राजु सोलंनकर, गणेश राजपुत, संदीप आढाव, नितीन करहाळे नारायण बो-हाडे बाजीराव चोरमारे, अंकुश सुंब , श्रीराम नावंदर,काशिनाथ कुकलारे व राष्ट्रप्रेमी नागरिक उपस्थित होते.

## पोर्टफोलिओ २०२५ मुंबईत स्पॉट हायरिंग आणि कॉर्पोरेट सहयोग ठरले आकर्षणाचे केंद्रबिंदू

मुंबई : भारतातील आघाडीची क्रिएटिव्ह शिक्षण संस्था पर्ल अकॅडमीने आज आपल्या मुंबई कॅम्पसवर पोर्टफोलिओ २०२५ या वार्षिक पदवीप्रदर्शनाचा भव्य आयोजन केला. या कार्यक्रमात फॅशन, स्टायलिंग, इंटिरिअर, कम्युनिकेशन, टेक्सटाईल आणि प्रॉडक्ट डिझाईनमधील पदवीधर विद्यार्थ्यांच्या धाडसी कल्पना आणि भविष्योन्मुख प्रकल्पांचे उत्सव साजरे करण्यात आले. विविध भरती करणारे प्रतिनिधी, डिझाइनर्स आणि उद्योगक्षेत्रातील मान्यवर नेते या कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांचे प्रकल्प पाहिले आणि ज्यांच्या कामामध्ये बाजारपेठेतील प्रबळ संभाव्यता व सर्जनशील समस्या निराकरणाची क्षमता दिसून आली, अशा पदवीधरांना त्वरित नोकरीच्या संधी दिल्या. काही विशेष प्रकल्पांमध्ये एआय, शाश्वतता आणि भविष्याभिमुख डिझाईन थिंकिंगचा सुंदर संगम दिसून आला, ज्यामुळे उद्योगासाठी सज्ज प्रतिभा घडवण्याच्या पर्ल अकॅडमीच्या वचनबद्धतेची पुन्हा एकदा पुष्टी झाली. या कार्यक्रमात दोन विद्यार्थ्यांना दुबईच्या अपरेल ग्रुप मध्ये आंतरराष्ट्रीय नियुक्त्या मिळाल्या, तर रिलायन्स ब्रँड्स, टीजेएक्स, जे.जे. वलया, स्नॅपडील आणि मेरेस बेनिसंट यांसारख्या आघाडीच्या ब्रँड्सनी १४ स्पॉट हायरिंग केल्या.

## टाटा मोटर्सकडून ऑल-न्यू अल्ट्रोज लाँच

मुंबई : टाटा मोटर्स या भारतातील आघाडीच्या ऑटोमोबाइल उत्पादक कंपनीने आज ऑल-न्यू अल्ट्रोजच्या लाँचची घोषणा केली, जिची सुरूवातीची किंमत ६.८९ लाख रूपये आहे. आकर्षक डिझाइन, लक्झरीअस इंटीरिअर्स आणि प्रगत वैशिष्ट्यांसह प्रीमियमनेसच्या नवीन युगामध्ये प्रवेश करत ऑल-न्यू अल्ट्रोज लक्ष वेधून घेण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे, तसेच प्रीमियम डिझाइन, अद्वितीय सुरक्षितता, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि थरारक कार्यक्षमता या मुलभूत आधारस्तंभांवर निर्माण करण्यात आली आहे. नवीन एक्स्टीरिअर व लक्झरीअस तंत्रज्ञान-संपन्न केबिनपासून सुधारित कनेक्टीव्हीटी आणि विस्तारित मल्टी-पॉवरट्रेन लाइन-अपपर्यंत - जे आता पहिल्यांदाच एएमटी पर्यायामध्ये देखील आहे - अल्ट्रोज दैनंदिन ड्राइव्ह्जना असाधारण प्रवासामध्ये बदलण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे.

# भर उन्हाळ्यात ८८ मिमी पाऊस;सोयगाव तालुक्यात वादळी वारा अन् रात्रभर उकाडा

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२२ मे

सोयगाव सह तालुक्यात आठवड्यापासून अवकाळी पाऊस,वादळी वारे,विजांच्या कडकडाटात सुरु असून बुधवारी रात्री अकरा वाजता सोयगाव सह तालुक्यात मुसळधार पाऊस झाला गुरुवारी सकाळी या पावसाची चक्क सरासरी ८८ मी मी ची नोंद झाली आहे मागील काही वर्षांपासून वातावरणात बदल होत आहे. त्याचा परिणाम जणजीवनावरही होत आहे. एकाच दिवसात ऊन, पाऊस अन् थंडीचा अनुभव येत आहे. जूनपासून पावसाळ्याला सुरुवात होते. तत्पूर्वी मे महिन्यात अवकाळी पाऊस पडतो. मात्र, यंदा निसर्गाची अजब तन्हा पाहायला मिळाली आहे. चक्क मे महिन्यातच एकाच रात्री ८८ मिमी पावसाची नोंद झाल्याचे पुढे आले आहे.मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून तालुक्यात दररोज कुठे न कुठे दुपारी वातावरणात बदल होऊन मेघगर्जनेसह पाऊस कोसळत आहे. त्यामुळे दिवसभर प्रचंड उकाड्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. जून महिन्यात मान्सून दाखल झाल्यानंतर पावसाला सुरुवात होते. मान्सून कधी वेळेवर, तर कधी उशिरा दाखल होतो. असा अनुभव दरवर्षी शेतकऱ्यांना येतो. मे महिन्यात दोन-तीन वेळा अवकाळी पाऊस पडतो. मात्र, यावर्षी मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून सतत अवकाळी पाऊस पडत असल्यामुळे जून महिन्याच्या वातावरणाचा अनुभव येत आहे. दररोज अवकाळी पाऊस हजेरी लावत असल्याने लग्नसमारंभात धांदल उडत आहे.शेतकरी खरीप हंगाम पूर्व मशागतीची कामे करत आहेत; परंतु दररोज कुठे न कुठे विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडत असल्याने शेतात पाणी साचत आहे.बुधवारी रात्री सोयगाव मंडळात ४ मी मी बनोटी-१८,सावळदबारा-६६मी मी आणि जरंडी-६ मी मी असा एकूण तालुका सरासरी ८८ मी मी नोंद झाली आहे

**एकाच दिवसात तीन ऋतुंचा अनुभव**

मे महिन्यात दररोज दुपारी वातावरणात अचानक वातावरणात बदल होऊन मेघगर्जनेसह अवकाळी पाऊस पडत आहे. त्यामुळे दुसऱ्या दिवशी आर्द्रता वाढून उकाडा जाणवत आहे. तसेच विजांचा कडकडाट चिंता वाढवत आहे.दरम्यान, मे महिन्यात दररोज पाऊस पडत असल्यामुळे उन्हाळ्यात पावसाळा जाणवत आहे. तर सकाळी गारवा. एकाच दिवसात तीन ऋतूंचा अनुभव येत आहे. मे महिन्यात एवढ्या पावसाची नोंद क्वचितच पाहायला मिळत असल्याचे मत तहसील च्या स्वयंचलित हवामान व बाष्पीभवन केंद्राकडून सांगण्यात आले.

**अवकाळी पावसाने नुकसान**

मागील काही दिवसांपासून दुपारी अचानक वातावरणात बदल होऊन मेघगर्जनेसह अवकाळी पाऊस पडत आहे. त्यामुळे उन्हाळी पिकांसह आंबा, केळी पिकांचे नुकसान होत आहे.

## आंतरराष्ट्रीय परिषदेत एमजीएमचे डॉ.अरविंद चेल सन्मानित

छत्रपती संभाजीनगर, दि.२२ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या डिपार्टमेंट ऑफ मेकॅनिकल इंजिनियरिंगचे प्रा.डॉ.अरविंद चेल यांना आंतरराष्ट्रीय परिषदेत सन्मानित करण्यात आले आहे. भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन रिसेंट अँडव्हान्सेस इन इंजिनीअरिंग अँड सायन्सेस - २०२५' या परिषदेत बेस्ट पेपर अवॉर्ड देऊन डॉ. चेल यांचा सन्मान करण्यात आला.

प्रा.डॉ.चेल यांनी मेटल कॉन्टेंट इन प्रिंटेड सर्किट बोर्ड्स: अ रिव्ह्यू या विषयावर आपले संशोधन सादर केले होते. या विषयावर सादर केलेल्या पेपरला उत्कृष्ट पेपर पुरस्कार मिळाला. त्यांचे हे संशोधन सायन्स अँड इंजिनिअरिंग रिसर्च बोर्ड नवी दिल्ली यांचेकडून मिळालेल्या अनुदानावर आधारित आहे.

हा सन्मान प्राप्त केल्याबद्दल प्रा.डॉ.अरविंद चेल यांचे विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.एच.एच. शिंदे व सर्व संबंधितांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी करिअर मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२२ मे

सोयगाव येथील साईवनशा संगणक प्रशिक्षण केंद्र एम.एस. सी.आय.टी.व आरंभ कोचिंग क्लासेस सोयगाव यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२२ गुरुवार रोजी कुरुक्षेत्र अकॅडमी सोयगाव येथे विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय करिअर मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला.विद्यार्थ्यांचे भवितव्य उज्वल करण्यासाठी आणि त्यांना योग्य करिअर निवडण्यास मदत करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात कार्यक्रमाचे अध्यक्ष ड.राजेश गिरी अध्यक्ष सोयगाव तालुका वकील संघ,तसेच पॉलिटेक्निक कॉलेज कन्नडचे प्राचार्य संतोष मतसागर,आय. टि.आय. कॉलेज सोयगावचे प्राध्यापक दर्शन ठाकूर,डॉ.केतन काळे, बार्टी समाजकल्याण समन्वयक रवींद्र बारी,उमाकांत बोराडे,मनोहर अपार,कृषिभूषण अरुण सोहनी,पत्रकार योगेश बोखारे,समाज प्रबोधनकार तथा लोककलावंत विष्णू मापारी,शफिक शेख,कृष्णा जुनघरे,कार्यक्रमाचे आयोजक साईवनशा कम्प्युटर सोयगाव एम.एस.सी.आय.टी.(चडउखढ) बिराजी गायकवाड सह संचालक सनी जावरे,आरंभ कोचिंग क्लासेस सोयगावचे संचालक योगेश काळे,प्रणय कुलकर्णी,कुरुक्षेत्र अकॅडमीचे संचालक गजानन साळवे,सहसंचालक संदेश पाईकराव,मार्गदर्शक सचिन ढगे,यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने सुरुवात करण्यात आली.आपल्या प्रास्ताविकपर भाषणात आरंभ कोचिंग क्लासेस चे संचालक योगेश काळे यांनी करिअर निवडीचे महत्त्व आणि योग्य मार्गदर्शनाची गरज यावर भर दिला.

या कार्यक्रमासाठी प्राचार्य संतोष मतसागर पॉलिटेक्निक कॉलेज कन्नड हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या विविध करिअर संधी, प्रत्येक क्षेत्रातील आवश्यक कौशल्ये,प्रवेश प्रक्रिया आणि भविष्यातील व्याप्ती याबद्दल सखोल माहिती दिली.कला, वाणिज्य,विज्ञान,अभियांत्रिकी,वैद्यकीय,संरक्षण अशा अनेक क्षेत्रांतील करिअर पर्यायांवर त्यांनी प्रकाश टाकला.तसेच प्राध्यापक दर्शन ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना करिअर निवडताना स्वतःची आवड,क्षमता आणि भविष्यातील गरजा यांचा विचार करण्याचा सल्ला दिला. तसेच नवीन तंत्रज्ञान आणि बदलत्या जागतिक परिस्थितीनुसार करिअरमध्ये होणारे बदल आणि त्यानुसार तयारी कशी करावी,यावरही त्यांनी मार्गदर्शन केले.तसेच उमाकांत बोराडे यांनी विद्यार्थ्यांना शिक्षण क्षेत्रात मिळणाऱ्या विविध शिष्यवृत्ती व शैक्षणिक सुविधांबद्दल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात प्रश्न-उत्तर सत्र आयोजित करण्यात आले,या सत्रात विद्यार्थ्यांच्या मनातील करिअर संबंधित अनेक शंका दूर झाल्या.अध्यक्षीय समारोप करताना ड. राजेश गिरी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले आणि विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी अशा कार्यक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच साईवनशा कम्प्युटर्सचे सहसंचालक राजेंद्र जावरे यांनी सर्व मान्यवरांचे,मार्गदर्शकांचे,कार्यक्रमाला उपस्थित सर्व विद्यार्थी व पालक व आयोजकांचे आभार मानले आभार मानले.

## सृजन या अत्याधुनिक मातृ व बाल विभागाचे उद्घाटन



छत्रपती संभाजीनगर, २२ मे : मराठवाडा मेडिकल अँण्ड रिसर्च इन्स्टिट्यूटच्या अंतर्गत असलेले कमलनयन बजाज रुग्णालय नेहमीच रुग्णांना अद्ययावत सुविधा देण्यास कटिबद्ध आहे. रुग्णालयाने आज सृजन या नव्या मातृ व बाल आरोग्य विभागाचा भव्य शुभारंभ केला.

या उद्घाटन सोहळ्याला मुख्य अतिथी म्हणून आदरणीय ट्रस्टी श्री. नंदकिशोरजी कागलिवाल उपस्थित होते. त्यांच्या सोबत ब्रिगेडियर विरेंद्र सिंग व कर्नल शरद भल्ला हे मान्यवर सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते.

सृजन ही सुविधा मातांना व बालकांना परिपुर्ण, आधुनिक व उच्च दर्जाची आरोग्यसेवा देण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. येथे कायमस्वरूपी स्त्रीरोगतज्ज्ञ, डॉ. प्रेरणा देवधर, डॉ. वेदयात्री देशमुख, डॉ. अमृता थेटे, बालरोगतज्ज्ञ डॉ. निखिल पाठक, डॉ. अभिजित जोशी. डॉ. आशिष थेटे हे आधुनिक नवजात शिशु देखभाल (छखउण), तसेच रोबोटिक शस्त्रक्रिया तंत्रज्ञान उपलब्ध आहे. या प्रसंगी हॉस्पिटल प्रशासनाने सांगितले की सृजन ही सुविधा त्यांच्या दर्जेदार व प्रेमळ सेवांचा विस्तार असून, कमलनयन बजाज हॉस्पिटल हे मातृ व बाल आरोग्य सेवेत उत्कृष्टतेचे केंद्र म्हणून नावारूपास येईल.

हॉस्पिटलच्या व्यवस्थापनाने सर्व उपस्थित मान्यवर, मीडिया प्रतिनिधी व शुभेच्छुकांचे आभार मानले.ही सुविधा केवळ इमारतीपुरती मर्यादित नाही, तर विश्वास, सुरक्षितता आणि प्रत्येक कुटुंबासाठी आशा निर्माण करण्यासाठी आहे, असे सीईओ डॉ. जॉर्ज फर्नांडिस यांनी सांगितले.

## भारतीय सैन्य दलाच्या सन्मानार्थ कन्नड शहरात तिरंगा रॅली संपन्न !



तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.२२ मे- भारतीय सैन्य दलाच्या सन्मानार्थ व राष्ट्र प्रेमासाठी एकत्र येण्याच्या उद्देशाने कन्नड शहारातील पिशोर नाका येथून गुरुवारी (दि.२२) सकाळी १० वाजता आमदार संजना जाधव , भाजप जिल्हाध्यक्ष संजय खंबायते , सरचिटणीस डॉं संजय गव्हाणे, गोपालनंद गिरी महाराज, रामेश्वर महाराज मगर, सर्वचैतन्य महाराज, त्रिगुण भारती महाराज, सोमनाथ कर्डीले महाराज, मनीष महाराज झाल्टे, राजू महाराज दांडगे, नवनाथ महाराज शास्त्री, चैतन्य गिरी महाराज, माजी सैनिक मोईनुद्दीन शेख, मुकुंद शिंदे, संजय माळी, भगवान आवारे, विठ्ठल काळे, राजेंद्र शिंदे माजी सैनिक यांच्या प्रमुख उपस्थित आमदार संजना जाधव यांच्या नेतृत्वाखाली तिरंगा रॅली काढण्यात आली. पिशोर नाका येथून शहीद हमीद शेख चौक, टिळक उद्यान, डॉं बाबासाहेब आंबेडकर उद्यान, छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात संतोष बुरकुल महाराज यांनी मार्गदर्शन करून राष्ट्रगीताने सांगता करण्यात आली यावेळी किशोर आबा पवार, डॉ. आण्णा शिंदे, अवचित वळवळे, बाजार समिती सभापती डॉ. मनोज राठोड, उपसभापती जयेश बोरसे, ज्ञानेश्वर निकम, श्रीराम घुगे , आदित्य गर्जे , भाजप शहर अध्यक्ष सुनिल पवार, काकासाहेब कवडे, सुधाकर पवार, सिद्धार्थ बनकर, यांच्या सह वीर पत्नी , वीर माता , सैनिक कुटुंब , मिशन ऑफिसर एकडमी , स्वराज्य प्रतिष्ठानसह राष्ट्रप्रेमी नागरिक मोठ्या संख्येन रॅलीत सहभागी झाले होते.

## 'ऑपरेशन सिंदूर' या विषयावर वर व्याख्यान

**प्रदीप बापट(निवृत्त), अविनाश मुठाळ(निवृत्त) ह्यांचे मार्गदर्शन**

पुणे (प्रतिनिधी) : केशव माधव न्यास च्या वतीने 'ऑपरेशन सिंदूर' चे विविध पैलू उलगडून दाखविणाऱ्या व्याख्यानाचे आयोजन शनिवारी दिनांक २४ मे रोजी सायंकाळी सहा वाजता पटवर्धन बाग येथील 'सेवा भवन' सभागृहात करण्यात आले आहे.'ऑपरेशन सिंदुर ' वर अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषदेचे महाराष्ट्र व गोवा राज्याचे अध्यक्ष व परम विशिष्ट सेवा मेडल प्राप्त एअर मार्शल प्रदीप बापट (निवृत्त) व विंग कमांडर अविनाश मुठाळ (निवृत्त) मार्गदर्शन करणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केशव माधव चे अध्यक्ष नंदाजी भागवत असणार आहेत. भारतीय सैन्याच्या शौर्याची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचवणे हे उद्दिष्ट आहे. ह्या व्याख्यानास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केशव माधव चे सचिव अरविंद देशपांडे ह्यांनी केले आहे.

**कृषि उत्पन्न वाजार समिती. हिंगोली**

**जाहीर प्रगटन**

**प्रकरण :-गाळा हस्तांतरण करणे वावत.**

सर्व जनता रहिवाशी मोहल्ला सर्व्हे नं. ७७ नवा मोंढा हिंगोली यांना कळविण्यात येते की, श्री. अशोक देविकीसन चांडक रा. हिंगोली ता. जि. हिंगोली यांनी नगर परिषद हिंगोली चे हद्दीतील नवा मोंढा येथील सर्व्हे नं. ७७, सिट नं ९८ सिटी सर्व्हे नं ४०६१ मध्ये असलेल्या व मंजूर लेआऊट नकाशाप्रमाणे पहील्या मजल्यावरील गाळा क्र. १९ ज्याची लांबी दक्षीण उत्तर २५ फुट म्हणजेच ७.६२ मीटर व रुंदी पुर्व-पश्चिम १२ फुट म्हणजेच ३.६५ मीटर ज्याचे एकुण क्षेत्रफळ ३०० चौरसफुट म्हणजेच २७.८१ चौरसमीटर ज्याची चतुःसिमा पुर्वेस गाळा क्रं २०, पश्चिमेस : गाळा क्रं १८. दक्षिणेस : बाजार समितीची जागा, उत्तरेस गाळा क्रं १३ वरील चर्तुः सिमेच्या आतील गाळा क्र. १९ हा पूर्वी दि. ३०/१२/२००६ मध्ये श्री. अशोक देविकीसन चांडक रा. हिंगोली ता. जि. हिंगोली यांनी कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली कडून ३० वर्षाचे कालावधीसाठी नोंदणीकृत भाडेपट्टा लेख दि. ३०/१२/२००६ अन्वये भाडयाने घेतला होता. त्यांना आता सदरील गाळयाची आवश्यकता नसल्यामुळे सदरील गाळा ते शेख रफिक शेख शब्बीर रा. हिंगोली यांना उर्वरीत राहीलेला कालावधी ३०/१२/२०३६ पर्यंतच्या मुदतीकरीता कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली मार्फत शेख रफिक शेख शब्बीर, रा. हिंगोली याना कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोलीच्या रेकॉर्डला उपरोक्त गाळयावरील भाडेकरु म्हणून हस्तांतरणाची नोंद करुन घेण्यासाठी श्री. अशोक देविकीसन चांडक यानी अर्ज केला आहे.

सदरील हस्तांतरणाबाबत कोणास काही आक्षेप व उजर असल्यास त्यांनी सदरील नोटीस जाहिर प्रगटन मध्ये प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसात या कार्यालयात लेखी उजर कार्यालयाच्या पत्यावर अथवा प्रत्यक्ष दाखल करावेत. १५ दिवसात उजर आक्षेप न दाखल केल्यास १५ दिवसानंतर कोणासही वरील हस्तांतरणाबाबत आक्षेप व उजर नाही असे गृहित धरुन त्यांच्या नावाने हस्तांतरण नियमाप्रमाणे करुन देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सचिव** **सभापती**

**कृषि उत्पन्न बाजार समिती, हिंगोली**

**औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., छ.संभाजीनगर**

मुख्य कार्यालय : डॉ.राजेंद्र प्रसाद मार्ग, अदालत रोड, छ.संभाजीनगर, पिन क्र. ४३१००५. पोस्ट बॉक्स क्र. ५२३
Email ID : chairman@aurangabaddccb.com, admindept@aurangabaddccb.com
दूरध्वनी क्रमांक : 0240-2334491/92, 2334983 (रजि.AGD/BNK/29/01 July 1983)

**नियुक्ती ''कार्यकारी संचालक''**

दि औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, छत्रपती संभाजीनगर या बँकेला 'कार्यकारी संचालक' या पदावर नाबार्डच्या फिट अँड प्रॉपर क्रायटेरिया निकषांतर्गत नियुक्ती करावयाची असुन खालील 'अ' ते 'क' पैकी किमान एक शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांनी खालील माहितीसह मुदतीत अर्ज सादर करावेत.

| अ. क्र. | पद | संख्या | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १. | कार्यकारी संचालक (मुख्य कार्यकारी अधिकारी ) | ०१ | अ) पदवीधर, यासोबत एच.डी.सी.एम/ सी.ए.आय.आय.बी/ डी.सी.बी.एम. किंवा समकक्ष<br>ब) चार्टर्ड अकौंटंट / कॉस्ट अकौंटंट<br>क) पदव्युत्तर पदवी | मध्यम/उच्च व्यवस्थापन स्तरावरील बँकींग क्षेत्राचा किमान आठ वर्षाचा अनुभव असावा. (सहकारी बँकेला प्राधान्य) |

१. वयोमर्यादा : नेमणुकीच्या वेळी उमेदवाराचे वय ६२ वर्षापेक्षा जास्त नसावे.
२. वेतन : अर्हता/अनुभव विचारात घेवून वेतन निश्चित करण्यात येईल.
३. या जाहिरातीमधील वर नमुद पात्रता निकष पुर्ण करणाऱ्या उमेदवारांनी आपला अर्ज संपूर्ण तपशिलासह (बायोडाटा) टाईप करुन दिनांक ३१.०५.२०२५ पुर्वी बँकेच्या मुख्य कार्यालयातील प्रशासन विभागात, दि औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मर्यादित, डॉ.राजेंद्र प्रसाद मार्ग, छत्रपती संभाजीनगर, ४३१ ००५ या पत्त्यावर व ई-मेलद्वारे पाठवावा.
४. अर्जासोबत लिफाफ्यावर 'कार्यकारी संचालक' या पदासाठी अर्ज असा ठळक उल्लेख असावा.
५. अर्जासोबत शैक्षणिक पात्रता, जन्मतारीख व अनुभव इत्यादींचे प्रमाणपत्रांच्या स्वप्रमाणित सत्यप्रती व स्वतःचे पासपोर्ट आकाराचे अद्यावत फोटो सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा संबंधीताचा अर्ज नाकारण्यात येईल व यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
६. निवडी संदर्भातील अटी शिथिल करण्याचा अधिकार निवड समितीला राहील. प्राप्त अर्जानुसार मुलाखत घेणे / नाकारणे / प्रक्रिया रद्द करणे इत्यादी संदर्भात अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार बँकेने राखुन ठेवलेले आहेत.

किरण पाटील, उपाध्यक्ष — अर्जुनराव गाढे, अध्यक्ष
दि औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म., छत्रपती संभाजीनगर

दिनांक : २२.०५.२०२५

# सोयगाव तालुक्यातील जरंडी ग्रामपंचायत माझी वसुंधरा अंतर्गत जिल्ह्यात आगेकूच



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२२ मे

तालुक्यातील जरंडी गावाला राज्य शासनाच्या माझी वसुंधरा अभियानात उत्कृष्ट ग्राम पंचायत म्हणून पुरस्कार जाहीर झालाय.ठिबक सिंचनाचा वापर करत हजारो झाडे जागवत निसर्ग संवर्धनाचे काम करण्यात आले.शिवाय ग्रामपंचायतीच्या मालकीच्या शेतजमिनीवर उत्पन्न घेत मिळालेल्या नफ्यातून गावात सुसज्ज उद्यान,वृद्धांसाठी विशेष कक्ष, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका,निसर्गरम्य स्मशानभूमी,हागणदारी मुक्त गाव असा विकास केल्याने हा पुरस्कार देण्यात आला असल्याची माहिती ग्रामसेवक ग्रामसेवक सुनील मंगरूळे यांनी दिली.

गावात केली वृक्ष लागवड......

सोयगाव तालुक्यातील जरंडी गावाची लोकसंख्या ३४५३ इतकी असून गेल्या दोन वर्षातच गावाचा कायापालट करण्यात ग्रामपंचायतीला यश मिळाले आहे.अस म्हणतात की गावाकडचे निसर्ग सौंदर्य पाहण्यासारखे असते, हाच उद्देश पुढे ठेवत गावात वृक्षलागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. गेल्या दोन ते अडीच वर्षात गावात जवळपास २७ हजार झाडांची लागवड करण्यात आली, नुसती लागवड नाही तर त्यांचे संवर्धन आणि संरक्षण देखील करण्यात आले. आज याच झाडांमुळे गावात हिरवळ वाढली आहे. लावलेली वृक्ष जागवण्यासाठी पाण्याचे नियोजन अत्यावश्यक होते, त्यामुळं सर्वत्र ठिबक सिंचनाचा वापर करत करण्यात आले, त्यामुळं त्याचा परिणाम अधिक प्रमाणात झाल्याची माहिती सरपंच स्वाती दिलीप पाटील यांनी दिली.

पाच एकरात सुसज्ज उद्यान.....

उद्यान ही संकल्पना तशी शहरी भागात अधिक पाहायला मिळते, मात्र जरंडी गावात असलेले उद्यान विशेष आहे. पाच एकर जागेत अप्रतिम उद्यान साकारण्यात आले. ज्यामध्ये मोठ्या प्रमाणात वृक्षांची लागवड आणि संवर्धन करण्यात आले. या उद्यानाचे वैशिष्ट म्हणजे मोठ्या झाडांबरोबर औषधी वनस्पती देखील लावण्यात आल्या आहेत. हे उद्यान पाहण्यासाठी परिसरातील शिक्षण संस्था शैक्षणिक सहलींचे आयोजन करत आहेत. यामाध्यमातून जवळपास ५० हजारांचे वार्षिक उत्पन्न ग्राम पंचायतीला मिळत आहे, त्यातून गावाच्या विकासासाठी उपयोग केला जात आहे. शिवाय चिडिया घर, ऑक्सिजन पार्क, कारंजे हे उद्यानाचे वैशिष्ट असल्याचं ग्रामसेवक सुनील मंगरूळे यांनी सांगितले.

गावच्या विकास कामासाठी शेती......

जरंडी गावाचे वैशिष्ट म्हणजे ग्रामपंचायतीच्या मालकीची पाच एकर शेती आहे. या शेतात शेवगा आणि आंबे याचे पिक घेतले जाते. त्यातून तीन लाख रुपयांचे वार्षिक उपन्न ग्राम पंचायतीला मिळत आहे. दोन वर्षांपूर्वी सदरील शेत जमीन शेतकऱ्यांना कसायला दिली जात होती, मात्र त्यातून अत्यल्प उत्पन्न मिळायचे. मात्र नंतर ग्राम पंचायतीने स्वतः माणसं लाऊन शेती करण्याचा निर्णय घेतला आणि त्यातून आर्थिक स्रोत निर्माण केले. याच पैशांमधून गावातील विकास कामे केली जात आहे. त्यातून नदीतील गाळ काढणे, स्वच्छता, रस्ते अशी कामे केली गेली असल्याची माहिती उपसरपंच संजय गिरीधर पाटील यांनी दिली.

विद्यार्थी आणि वृद्धांसाठी विशेष व्यवस्था.......

गावात विद्यार्थी आणि वृद्धांसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. वृद्धांसाठी गावात विशेष कक्ष उभारण्यात आला, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका उभारण्यात आली. या अभ्यासिकेत आसपासच्या सहा ते सात गावातील विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी जागा उपलब्ध झाली. तिथे स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थी तयारी करू शकतात. नुकताच या अभ्यासिकेत अभ्यास करणारा एक विद्यार्थ्याने एम.बी.बी.एस ची परीक्षा उत्तीर्ण केल्याने कामाचे चीज झाल्याचं सरपंच स्वाती पाटील यांनी सांगितले.

सुसज्ज अशी स्मशानभूमी.......

गावात पाच एकर समितीवर सुसज्ज अशी स्मशानभूमी उभारण्यात आली आहे. जिथे अडीच हजार झाडे लावून त्यांचे संवर्धन करण्यात आले. त्या झाडांवर बोलकी चित्र काढून, वेगवेगळ्या क्षणी लिहिण्यात आल्या. प्रत्येक झाडाच्या भोवती ओटा तयार करून बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. गावातील सर्व कचरा वर्गीकरण करून संकलित करण्यासाठी महिला बचत गटाला काम देण्यात आले. प्रत्येक घराला शंभर रुपये स्वच्छता कर आकारला जातोय. त्यामुळे गावातील स्वच्छता योग्य प्रमाणात होत असल्याने गाव स्वच्छ आणि सुंदर झाले आहे. त्याच बरोबर गाव शंभर टक्के हागणदारी मुक्त करण्यात आले असल्याने माझी वसुंधरा अभियानात उत्कृष्ट ग्राम पंचायत पुरस्कार देण्यात आला आहे अशी माहिती ग्रामसेवक सुनील मंगरुळे यांनी दिली.

## अग्रलेख...

# साक्षरतेचा 'मिझो'मार्ग

साक्षरतेचा सध्या सर्वत्र बोलबाला आहे. भारतातील सर्वच राज्ये साक्षरतेबाबत फुशारक्या मारत असतात. आजवर केरळकडे सर्वांत जास्त साक्षरतेची संख्या असलेले राज्य म्हणून पाहिले जात होते. देशात या राज्याची त्यासाठी ख्यातीही होती. देशातील तुलनेने लहान असलेल्या या राज्याच्या साक्षरतेची इतर राज्यांना असूयाही वाटत होती. काही राज्ये यात बढाईखोरी करून आपले नाव पुढे रेटत होते. मात्र आता साक्षरतेबाबत कुणाचा पुढाकार हे सांगताना तुमची जीभ अडखळणार नाही. कारण भारतातील पहिले साक्षर राज्य होण्याचा मान ईशान्य भारतातील मिझोरम या राज्याला मिळाला आहे. जिथे एकही निरक्षर व्यक्ती नाही, असे मिझोरम हे भारतातील पहिले राज्य राहणार आहे. साक्षरता ही विकासाची पाऊलवाट असते. त्या पाऊलवाटेवर पाय रोवत मिझोरम राज्य पूर्णतः साक्षर झाल्याची घोषणा मंगळवारी शिक्षण मंत्रालयाने केली. या निर्णयामुळे ईशान्येकडील या छोट्याशा राज्याने केरळलाच नव्हे, तर देशातील सर्व राज्यांना पिछाडवर सोडले आहे. देशातील पहिले साक्षर राज्य होण्याचा गौरव या राज्याला कसा मिळाला, ही घोषणा झाली याचा काय अर्थ आहे, साक्षरतेमध्ये आघाडीवर असलेली इतर राज्ये कोणती, देशात प्रगतिशील म्हणून गौरविल्या जाणाऱ्या महाराष्ट्राची साक्षरतेत किती उंची आहे, हे प्रश्न उपस्थित झाले आहे. एक मात्र निश्चित की मिझोरमने १०० टक्के साक्षरता गाठून भारताच्या शैक्षणिक क्षेत्रात नवा कीर्तिमान रचला आहे. याचाच अर्थ राज्यात आता कोणतीच व्यक्ती निरक्षर राहिलेली नाही. राज्यातील १५ वर्षांच्या वरील सर्व व्यक्ती वाचणे, लिहिणे आणि गुणाकार, भागाकार करण्यास सक्षम आहेत, असा याचा अर्थ होतो. मिझोरमला हे यश नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत मिळाले आहे. केंद्र सरकारच्या या योजनेने लाखो लोकांना साक्षर बनविण्यात महत्त्वाची भूमिका निभावली आहे. साक्षरता म्हणजे शहाणपणा, साक्षरता म्हणजे बुद्धिवर्धन, साक्षरता म्हणजे प्रगतिशीलतेच्या दृष्टीने टाकलेले पाऊल, अशा कितीतरी व्याख्या केल्या जाऊ शकतात. त्या अर्थाने मिझोरमच्या जनतेने देशाच्या समृद्धीसाठी सुरू असलेल्या यज्ञात आपल्या साक्षरतेच्या समिधा अर्पित केल्या आहेत. आपल्या देशात राष्ट्रीय साक्षरता मिशनने साक्षरतेचे काही निकष ठरविले आहेत. ते निकष पूर्ण केल्यामुळेच मिझोरम ही उंची गाठू शकले आहे. या प्रयत्नांसाठी मिझोरम सरकार, तेथील प्रशासन आणि शिक्षण क्षेत्रातील लोकांनी बजावलेल्या कामगिरीला प्रणाम केला जायला हवा. या मिशननुसार एखादी व्यक्ती आपले नाव लिहू आणि वाचू शकत असेल तर त्या व्यक्तीला साक्षर समजले जाते. १५ ते ५५ वयोगटातील ७५ टक्के लोकांना २००७ पर्यंत साक्षर बनविण्यासाठी १९८८ मध्ये साक्षरता मिशनची सुरुवात झाली होती. त्याचे फायदे मिळाले सुद्धा, पण केवळ साक्षरतेत पहिला क्रमांक मिळाल्याने सर्व समस्या सुटत नाहीत. केवळ लिहिता येणे आणि वाचता येण्याने प्रगतीची उंची गाठता येत नाही. त्यासाठी अजूनही अनेक निकषांची पूर्तता करावी लागते. तरीदेखील साक्षरतेच्या निकषांमध्ये उतरलेल्या मिझोरमने मिळविलेले हे यश यत्किंचितही कमी ठरत नाही.

साक्षरतेच्या क्रमवारीत या राज्यापाठोपाठ गोवा, सिक्कीम, केरळ आणि दिल्लीचा क्रमांक लागतो. २०११ च्या जनगणनेत मिझोरमचा साक्षरता दर ९१.३३ टक्के होता व हे राज्य साक्षरतेत देशात तिसऱ्या क्रमांकावर होते. उल्हास योजनेंतर्गत २०२३ मध्ये या राज्यात सर्वत्र सर्वेक्षण करण्यात आले. त्यात ३,०२६ निरक्षरांची ओखळ पटविली गेली. त्यातील १,६९२ लोकांनी दररोज अभ्यास करून साक्षरतेच्या राज्याच्या प्रगतीत योगदान दिले. यानंतर राज्याची साक्षरता ९८.२० टक्क्यांपर्यंत वाढली. हे काम मुळीच सोपे नव्हते. सरकारने २९२ स्वयंसेवकांची एक चमू तयार केली, ज्यामध्ये विद्यार्थी, शिक्षक, तज्ज्ञ आणि समन्वयकांची नियुक्ती केली गेली. या साऱ्यांनी नेटाने निरक्षरांना साक्षर करण्याची किमया केली. महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांत साक्षरता दरात वाढ झाली आहे. २००१ मध्ये महाराष्ट्राचा साक्षरता दर ७७.२७ होता. २०११ मध्ये वाढून हा दर ८२.९१ झाला. मिझोरमच्या साक्षरता यशात सामुदायिक सहकार्य आणि मिझो संस्कृतीत अंतर्निहित तलॉम्मंगाईहना (निःस्वार्थ सेवा) या भावनेने तर स्थानिक स्वयंसेवी संस्थांनीही महत्त्वाची भूमिका बजावली आहे. दुसरीकडे, मिझोरमचे मुख्यमंत्री लालदुहोमा यांनी ही कामगिरी मागील सर्व सरकारे, शिक्षक आणि नागरिकांच्या सामूहिक प्रयत्नांचे परिणाम असल्याचे नमूद केले आहे. ही फक्त एक आकडेवारी नाही. उलट ते मिझो समाजाच्या ताकदीचे आणि प्रगतीचे प्रतीक आहे. आमचे पुढील ध्येय डिजिटल साक्षरता, आर्थिक जागरूकता आणि उद्योजकता कौशल्यांना प्रोत्साहन देणे, हे असल्याचेही त्यांनी नमूद केले. मागास मिझोरमला साक्षरतेमुळे अनेक फायदे होऊ शकतात. साक्षरतेमुळे लोकांना नवीन माहिती व कौशल्य शिकण्याची संधी मिळू शकते, ज्यामुळे त्यांचे जीवनमान सुधारेल. शिक्षित व्यक्ती अधिक कार्यक्षम व उत्पादक असतात, त्यामुळे गावांची व एकूणच प्रदेशाची आर्थिक प्रगती होणार आहे. साक्षरता वाढल्यामुळे लोकांना आरोग्याबाबत माहिती मिळेल, ज्यामुळे त्यांचे आरोग्य सुधारून आजारांचे प्रमाण कमी होईल. शिक्षणामुळे सामाजिक भेदाभेद कमी होतात व समुदायातील एकात्मता वाढीस लागते. त्या अर्थाने मिझोरममधील जातीय सद्भाव वाढीस लागणार आहे. साक्षरतेमुळे लोकांची आपली समस्या समजून घेण्याची क्षमता वाढते व ते अधिक चांगले निर्णय घेऊ शकतात. शिक्षणामुळे स्थानिक संस्कृती व परंपरा जपल्या जातात आणि नवीन ज्ञान व संस्कृतीचेही दर्शन होते. या सर्व बाबी हमखास मिझोरमच्या विकासातील मैलाचा दगड ठरतील.

पूर्वीच्या काळी निरक्षरांची मोठ्या प्रमाणात फसवणूक व्हायची. मुख्यतः सावकारांकडून या लोकांच्या निरक्षरतेचा फायदा घेऊन, त्यांच्याकडून अंगठ्यांचे ठसे घेऊन मोठ्या प्रमाणात जमिनी, आर्थिक मालमत्ता लाटल्या जात असत. ही बाब ध्यानात येताच सरकारकडून सावकारांवर बंधने टाकली गेली. त्यातून असे प्रकार बरेच कमी झाले. निरक्षरतेमुळे समाजाची वाढ खुंटते. व्यवहारी जगात प्रगतीचे अनेक मार्ग उघडे असतानाही निरक्षर समाज पारंपरिक व्यवहारांमध्येच गुंतून पडतो. त्यामुळे त्यांचे आर्थिक प्रगतीचे मार्ग खुंटतात. बालमजुरी, अल्पवयीन गुन्हेगारी, रस्त्यांवर भीक-मागणारी लहान मुले यांच्या प्रमाणात निरक्षरतेमुळे वाढ होते. देशातील अनेक समृद्ध राज्यांना मागे टाकत १०० टक्के साक्षरतेचा सोपान मिझोरमने सहजासहजी गाठलेला नाही. साक्षरतेमुळे येथील लोकांमध्ये शिक्षणाची पातळी वाढली असली तरी तो उद्देश गाठण्यासाठी त्यांना अनेक लोकोपयोगी उपक्रम राबवावे लागले. राष्ट्रीय आजीवन शिक्षण अभियान या योजनेअंतर्गत ग्रामीण भागात व मागासवर्गीय भागांमध्ये साक्षरता वाढविण्यासाठी विविध शिक्षण शिबिरे तसेच आश्रमशाळा व साक्षरता केंद्रे स्थापन करावी लागली. सरकारने विशेषतः २०१५-२०२० या कालावधीत साक्षरता वाढविण्यासाठी विशेष मोहिमा राबविल्या. या मोहिमांमध्ये घराघरापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला. प्राथमिक शिक्षणावर भर देऊन बालकांना व वयोवृद्धांना प्राथमिक शिक्षण देण्याकडे लक्ष केंद्रित केले गेले. विविध स्वयंसेवी संस्था व साक्षरता स्वयंसेवकांना प्रशिक्षण देऊन त्यांना त्यांच्या भागात साक्षरता मोहिमा राबविण्यास प्रोत्साहन दिले गेले. डिजिटल व मोबाईल मिझोरमच्या साक्षरतेमध्ये सरकारने विविध उपक्रम राबविले. मोबाईल व डिजिटल माध्यमांचा उदाहरणार्थ ई-लर्निंग आणि मोबाईल ॲप्सचा वापर करून साक्षरता वाढविण्याचे प्रयत्न अजूनही सुरू आहेत. शाळा व शिक्षण संस्थांना मदत देऊन साक्षरतेस प्रोत्साहन दिले गेले. साक्षरतेमुळे मिझोरमची होत असलेली प्रगती इतर राज्यांसाठी अनुकरणीय ठरत आहे. ईशान्येकडील राज्ये मागासलेली हे समीकरणही या राज्याने मोडकळीस आणले आहे. साक्षरतेच्या या मिझो मार्गाचे अनुकरण इतर राज्ये कशी करतात, यावर त्यांचे यशापयश ठरणार आहे.


## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# भारताची डिजिटल भरारी

काही दिवसांपूर्वी एका जपानी पाहुण्याला पुण्यात फिरवत होतो. अनेक ठिकाणे झाल्यावर एका पेरूवाल्याकडे पेरू घ्यायला गेलो. तिथे क्यूआर कोड बघून जपानी पाहुणा थक्क झाला. जगामध्ये असे कुठेही नाही असं तो म्हणाला. अगदी विकसित अमेरिका, जपानमध्येही डिजिटल योजना तळातल्या व्यक्तीपर्यंत पोहोचलेल्या नाहीत. आपल्या देशात आज डिजिटल युग घराघरात पोहोचलेले आढळते. प्रथमतः कॉम्प्युटरमुळे आणि गेल्या पाच-दहा वर्षांमध्ये स्मार्टफोनमुळे बहुतेकांची नव्या डिजिटल सुविधांशी तोंडओळख नक्कीच झाली आहे. नेटबँकिंग, डिजिटल वॉलेट यासारख्या संकल्पनांचा वापर दैनंदिन जीवनात मोठ्या प्रमाणात दिसतो आहे. डिजिटल इंडिया ही भारत सरकारने २०१५ मध्ये सुरू केलेली एक महत्त्वाकांक्षी मोहीम आहे. या मोहिमेचे उद्दिष्ट भारताला एक डिजिटल अर्थव्यवस्था बनवणे, शासकीय सेवांचे डिजिटलीकरण करणे आणि नागरिकांना डिजिटल साक्षर बनवणे हे आहे. भारतासारखा खंडप्राय, विविधतेने नटलेला देश कधीच डिजिटल होणार नाही असे अनेकांचे मत होते. पण या मोहिमेने अफाट यश मिळवले. मोबाईल बँकिंग, डिजिटल पेमेंट, ई-कॉमर्ससारख्या सेवांचा वापर भारतात झपाट्याने वाढला आहे. सरकारी कामकाज 'नेट'वरून वेगात होऊ लागले असल्याने विविध सरकारी योजनांचा लाभ घेणेही शक्य होत आहे. सरकारी कारभाराचा 'इन-लाईन' पासून 'ऑन-लाईन' पर्यंतचा हा प्रवास बऱ्यापैकी वेगाने झाला. डिजिटल इंडिया मोहिमेमुळे भारतात स्टार्टअप्सची संख्या आणि या क्षेत्रात गुंतवणूक, रोजगारनिर्मिती वाढली आहे.

सार्वजनिक सेवांचे वितरण सुधारण्यासाठी आणि ई-गव्हर्नमेंटच्या युगाची सुरुवात करण्यासाठी विविध राज्य सरकारे आणि केंद्रीय मंत्रालयांनी अनेक ई-गव्हर्नन्स उपक्रम हाती घेतले आहेत. भारतातील ई-गव्हर्नन्स हे सरकारी विभागांच्या संगणकीकरणापासून नागरिक केंद्रितता, सेवा अभिमुखता आणि पारदर्शकता यासारखे शासनाचे बारीकसारीक मुद्दे अंतर्भूत करणाऱ्या उपक्रमांमध्ये सातत्याने विकसित झाले आहे. नोटबंदीचा निर्णय जाहीर झाल्यानंतर अनेक 'पेमेंट ॲप्स'चे पेव फुटले आणि बऱ्याच जणांनी ती स्वतःच्या फोनमध्ये उतरवून घेऊन वापरायला सुरुवातही केली. 'भीम' हे भारत सरकारद्वारे विकसित केलेले एक मोबाईल पेमेंट ॲप आहे. या ॲपच्या माध्यमातून आपण आपल्या बँक खात्यातून पैसे त्वरित आणि सुरक्षितपणे पाठवू शकतो आणि प्राप्त करू शकतो. हे ॲप वापरण्यासाठी आपल्याला फक्त आपले बँक खाते लिंक करणे आवश्यक आहे. हे ॲप विविध भारतीय भाषांमध्ये उपलब्ध असल्यामुळे देशातील प्रत्येक नागरिकाला याचा उपयोग करणे सोपे होते. या ॲपचा वापर करण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही. देशभरातील लाखो व्यापाऱ्यांकडून ते स्वीकारले जाते. रेल्वे ही अनेकांची जीवनदायिनी आहे. आपल्याला बऱ्याचदा रेल्वेने बाहेरगावी जायचे असते. मात्र, वेळेवर तिकीट मिळत नाही. अशा स्थितीत आता रेल्वे (आयआरसीटीसी) ने नागरिकांसाठी 'रेल कनेक्ट' ॲप सादर केले आहे. सर्वाधिक वर्दळीच्या वेळी किंवा आपत्कालीन प्रसंगी तिकीट काढण्यासाठी प्रवाशांना अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते. या समस्यांवर तोडगा म्हणून आयआरसीटीसीने हे ॲप प्रवाशांना उपलब्ध करून दिले आहे. या ॲपद्वारे प्रवासी ऑनलाईन बुकिंग आणि ऑनलाईन पेमेंटसुद्धा करू शकतात. आतापर्यंत १३ कोटीहून अधिक लोकांनी हे ॲप डाऊनलोड केले असून, ४० कोटींहून अधिक तिकिटांचे बुकिंग हे ॲप वापरून झाले आहे




पासपोर्ट, रेशनकार्ड, वाहन परवाना असे आपली ओळख पटवायचे अनेक मार्ग विसाव्या शतकात होते. २००९ मध्ये आपल्या देशात आधार कार्ड हे एक नवीन ओळखपत्र सादर झाले. हे एक महत्त्वपूर्ण ओळखपत्र आहे, जे सूचित करते की तुम्ही भारतीय नागरिक आहात. आधार कार्ड हे भारतातील पहिले विश्वासपात्र ओळखपत्र आहे. आधार कार्ड मिळवण्यासाठी नागरिकांनी ओळख पडताळण्यासाठीची कागदपत्रे (उदा राहत्या पत्त्याचा पुरावा- मतदार आयडी, चालक परवाना, वीज बिल) तसेच बायोमेट्रिक तपशील (जसे बोटांचे ठसे आणि डोळ्यांचे ठसे) सादर करणे आवश्यक असते. त्यानंतर व्यक्तीला एक ओळख क्रमांक दिला जातो, जो तो भारतीय नागरिक असल्याची पुष्टी करतो आणि त्याची सर्व माहिती एका अद्वितीय भारतीय डेटाबेसमध्ये रेकॉर्ड केली जाते. प्रत्यक्ष कार्ड जवळ बाळगायचे नसल्यास 'एम आधार' ॲपचा वापर करता येतो. हे ॲप तुम्ही फोनमध्ये सहज डाऊनलोड करू शकता व याचा कुठेही वापर करणे शक्य आहे. ओळखपत्राचा पुरावा दाखवायचा असतानाही एम आधार उपयोगी येईल. परदेशी प्रवास करायचा असेल तर पासपोर्ट ही अत्यावश्यक गोष्ट ठरते. पहिल्यांदाच परदेशात जाण्याची तयारीच मुळी पासपोर्टपासून सुरू होते; पण त्याखेरीजही पासपोर्ट हा एखाद्या व्यक्तीसाठी महत्त्वपूर्ण पुरावा ठरू शकतो. एके काळी पासपोर्ट काढणे हे परदेशात जाण्याइतकेच कठीण आणि कटकटीचे काम होते; परंतु गेल्या काही वर्षांमध्ये ही प्रक्रिया अतिशय सुटसुटीत आणि जलद बनली आहे. अद्ययावत तंत्रज्ञानाचा अवलंब करत पासपोर्ट विभागाने पासपोर्ट मिळवण्याची प्रक्रिया ऑनलाईन केली आहे. याचाच पुढचा भाग म्हणून आता स्मार्टफोनवरून पासपोर्ट मिळवणे सोपे झाले आहे. भारतीय नागरिकांना जलद, सहज आणि पारदर्शकपणे पासपोर्ट मिळवता यावा, यासाठी केंद्र सरकारने टाटा कन्सल्टन्सीच्या सहकार्यातून 'पासपोर्ट सेवा' हे ॲप सुरू केले आहे.

२०२५ पर्यंत डिजिटल इंडिया मोहिमेने अनेक महत्त्वपूर्ण अंगांनी यश मिळवले आहे. पहिले म्हणजे डिजिटल पेमेंटमध्ये वाढ झाली आहे. युनिफाईड पेमेंट्स इंटरफेसद्वारे होणारे व्यवहार डिसेंबर २०२४ मध्ये २३,२४,६९९.९१ कोटींवर पोहोचले आहेत. हेच तंत्रज्ञान आता सिंगापूर, भूतान, नेपाळ, श्रीलंका, फ्रान्स आणि मॉरिशस यासारख्या ७ देशांमध्ये लाईव्ह व्यवहार सुलभ करत आहे. दुसरे म्हणजे मार्च २०२३ पर्यंत १३६.६५ कोटींहून अधिक आधार कार्ड जारी करण्यात आली आहेत. जानेवारी २०२५ मध्ये आधार फेस ऑथेंटिकेशन सुविधेने शंभर कोटींचा टप्पा ओलांडला आहे. तिसरे म्हणजे १ फेब्रुवारी २०२५ पर्यंत डिजिलॉकर वापरकर्त्यांची संख्या ४६.५२ कोटींवर पोहोचली आहे. चौथे म्हणजे जानेवारी २०२५ पर्यंत २.१४ लाख ग्रामपंचायती इंटरनेटद्वारे जोडल्या गेल्या असून ६.९२ लाख किलोमीटर लांबीची ऑप्टिकल फायबर केबल टाकण्यात आली आहे. १.०४ लाख वाय-फाय हॉटस्पॉट ग्रामपंचायतींमध्ये स्थापित करण्यात आले आहेत. या ॲपने ७.१ कोटींहून अधिक वापरकर्त्यांना ३२ राज्यांमधील २०७७ सरकारी सेवांशी जोडले असून २३ भाषांमध्ये समर्थन पुरवले आहे. हे जगातील सर्वात मोठे शिक्षण तंत्रज्ञान प्लॅटफॉर्म ठरले आहे. 'डिजिटल इंडिया' मोहिमेने पायाभूत सुविधांच्या विकासावर, डिजिटल पेमेंटला प्रोत्साहन देण्यावर, सरकारी सेवा ऑनलाईन उपलब्ध करण्यावर आणि नागरिकांचे डिजिटल सक्षमीकरण करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. यामुळे शहरी आणि ग्रामीण भागातील डिजिटल दरी कमी होण्यास मदत झाली असून नागरिकांच्या जीवनात सुधारणा झाली आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# फुकट मिळणाऱ्या योजनांचे वास्तव

आजच्या घडीला शासनाकडून विविध प्रकारच्या मोफत (फुकट) योजनांची अंमलबजावणी केली जात आहे. गरबि, दुर्बल व वंचित घटकांना मदत करण्यासाठी अशा योजना उपयुक्त ठरतात. शिक्षण, आरोग्य, अन्नधान्य, वीज, गॅस, निवारा आदी मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी केंद्र व राज्य सरकार अनेक मोफत योजना राबवते. उदाहरणार्थ, प्रधानमंत्री अन्न योजना, उज्ज्वला गॅस योजना, मोफत आरोग्य विमा योजना, शालेय पोषण आहार योजना, मोफत वीज/पाणी आदी योजनांचा समावेश होतो. परंतु, या फुकट योजनांमुळे काही गंभीर समस्या उद्भवत आहेत. सर्वसामान्य जनतेमध्ये श्रम न करता मिळविण्याची मानसिकता वाढू लागली आहे. परिणामी, काम करण्याची प्रेरणा कमी होते आणि दीर्घकालीन सामाजिक-आर्थिक विकासावर त्याचा परिणाम होतो. याशिवाय, या योजनांतून मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार देखील होताना दिसतो. योजनेच्या लाभार्थींची यादी तयार करताना अपात्र व्यक्तींना समाविष्ट करणे, निधीचा अपव्यय करणे, स्थानिक राजकीय नेत्यांचा हस्तक्षेप हे सर्व प्रकार सर्रास घडतात. गरजूंना लाभ मिळण्याऐवजी, बड्या मंडळींना याचा फायदा होताना दिसतो. मोफत योजना अनेकदा राजकारणाचे साधन बनतात.

निवडणुकीच्या काळात मतदारांना आकर्षित करण्यासाठी विविध 'मोफत' घोषणांची बरसात केली जाते. शिक्षण, आरोग्य, वीज किंवा इंटरनेट मोफत देण्याच्या आश्वासनांचा उपयोग मतांसाठी केला जातो. यावेळी अगदी निवडणुकीच्या तोंडावर घोषित करण्यात आलेली लाडकी बहीण योजना ही त्यातीलच एक आहे. या योजनेमुळे महाराष्ट्र सरकारला प्रचंड आर्थिक ताण सहन करावा लागत आहे. अशा योजनांमुळे इतर कल्याणकारी योजनांवर खर्च झालेल्या निधीची पूर्तता करताना अडचणी येतात. लाडकी बहीण योजनेमुळे सरकारचे आर्थिक बजेट कोलमडले असून कंत्राटदारांची देयके देण्यात सरकारकडून उशीर केला जात आहे. वास्तविक गरज आणि आर्थिक शाश्वतता लक्षात न घेता योजना जाहीर केल्या जातात, ज्या पुढे अर्थव्यवस्थेवर ताण आणतात. अनेक वेळा खऱ्या गरजू व्यक्ती योजनांपासून वंचित राहतात, कारण त्यांना माहिती नसते, किंवा मध्यस्थ व स्थानिक अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचारामुळे त्यांना लाभ मिळत नाही. काहीवेळा तर ओळखीच्या लोकांना प्राधान्य दिले जाते. त्यामुळे या योजनांचा उद्देश मोडीत निघतो. या योजनांचा उद्देश गरजू लोकांपर्यंत मूलभूत सुविधा पोहोचवणे हा आहे. मोफत योजना हे एक अत्यंत महत्त्वाचे सामाजिक कल्याणकारी साधन असले तरी त्याचे अनेक सकारात्मक व नकारात्मक पैलू आहेत. फुकट मिळणाऱ्या शासकीय योजनांचे स्वरूप, फायदे, नुकसान, त्यातून उद्भवणाऱ्या समस्या, राजकारण, भ्रष्टाचार आणि त्या योजना बंद झाल्यास निर्माण होणाऱ्या समस्या याचा देखील विचार करण्याची गरज आहे.

अशा योजना गरजूंना जीवनावश्यक सुविधा मिळवून देतात. मात्र आता याच योजना भ्रष्टाचाराचे कुरण ठरत आहे. या उद्देशाने या कल्याणकारी योजना अमलात आणल्या तो उद्देश मात्र पूर्ण होताना दिसत नाही. ज्याला गरज आहे त्याला त्या योजनेचा लाभ निश्चितच मिळायला हवा. मात्र ज्याला गरज नाही असेही लोक शासनाच्या या मोफत योजनांचा लाभ घेत आहे. लाडकी बहीण ही योजना चांगली असली तरी या योजनेचे गरजू लाभार्थी कोण आहेत आणि ही योजना लाटणारे, या योजनेसाठी पात्र नसणारे शोधण्याची खरंच गरज आहे. योजना गरिबांसाठी आहे मात्र या योजनेचा लाभ खरे लाभार्थी न घेता इतर लोक लाटू लागले आहेत. योजना मोफत आहे म्हणून आयतेच सरकारकडून सर्व काही मिळत असल्याने श्रम न करण्याची वृत्ती जी समाजात बळावत चालली आहे हे देखील देशहिताच्या दृष्टीने चुकीचे आहे. या सगळ्यांना जबाबदार कोण? या सगळ्याला जबाबदार ठरतात ते प्रशासनातील भ्रष्ट कर्मचारी, राजकारणी आणि एकप्रकारे आम्ही नागरिक देखील. कारण आम्ही पारदर्शकतेची मागणी करत नाही किंवा योग्य ठिकाणी तक्रार देखील करत नाही. जर अचानक या सर्व मोफत योजना बंद झाल्या, तर अनेक गरजूंना मोठा फटका बसेल. गरीब आणि श्रमिक वर्ग संकटात सापडेल. त्यांना मूलभूत सेवा मिळणे कठीण होईल. त्यामुळे या योजना पूर्णपणे बंद करणे योग्य नाही, परंतु त्यांचे स्वरूप सुधारण्याची नक्कीच गरज आहे. फुकट योजनांचा उद्देश चांगला असला तरी, त्यांची अंमलबजावणी पारदर्शक, गरजू केंद्रित आणि आर्थिकदृष्ट्या शाश्वत असावी. भ्रष्टाचाराविरोधात कठोर कारवाई झाली पाहिजे. गरजू आणि पात्र लोकांपर्यंतच लाभ पोहोचविणे हेच खरे प्रशासनाचे यश ठरेल.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# काँग्रेसचे 'हात' दाखवून अवलक्षण

'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी झाल्यानंतर जगात पाकिस्तानचा पर्दाफाश करण्यासाठी विविध देशांत सात संसदीय प्रतिनिधी मंडळ पाठवण्याचा महत्त्वपूर्ण आणि धोरणात्मक निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारने घेतला आहे. विशेष म्हणजे हे प्रतिनिधी मंडळ सर्वसमावेशक राहणार आहे, म्हणजे काँग्रेससह विविध विरोधी पक्षांच्या नेत्यांचाही त्यात समावेश करण्यात आला आहे. मोदी सरकारने विरोधी पक्षांच्या खासदारांचा फक्त या प्रतिनिधी मंडळात समावेशच केला नाही तर यातील एका प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व काँग्रेसचे शशी थरुर यांच्याकडे सोपवले आहे. विशेष म्हणजे या सातपैकी दोनच प्रतिनिधी मंडळांचे नेतृत्व भाजपा सदस्यांकडे आहे, उर्वरित पाचचे नेतृत्व भाजपेतर पक्षांच्या नेत्यांकडे सोपविण्यात आले आहे.

संयुक्त राष्ट्रात मोठ्या पदावर शशी थरुर यांनी काम केले असल्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात त्यांचे वेगळे महत्त्व आहे. इंग्रजी भाषेवर त्यांचे प्रभुत्व आहे. त्यांच्याजवळ वक्तृत्वही आहे, तसेच मुत्सद्दी म्हणून त्यांची जगात ओळख आहे. महत्त्वाचे म्हणजे जगात त्यांना मान्यताही आहे. त्यामुळे दहशतवादाने बरबटलेला पाकिस्तानचा काळा चेहरा जगात उघडा पाडण्यासाठी थरुर यांच्यासारखा दुसरा योग्य वक्ता नाही. या प्रतिनिधी मंडळात सहभागी करण्यासाठी नावे सुचवा अशी औपचारिक विनंती सरकारने काँग्रेससह अन्य पक्षांना केली होती. सरकारने काँग्रेसला चार नावे मागितली होती. मात्र काँग्रेस पक्षाने अंतर्गत राजकारण करत लायक नेत्यांची नावे वगळत 'ना'लायक नेत्यांची नावे पाठवली होती. काँग्रेसकडून अपेक्षित नावे न आल्यामुळे मोदी सरकारने आपल्या अधिकारात शशी थरुर यांच्यासह गुलाम नबी आझाद, आनंद शर्मा आणि सलमान खुर्शीद यांचा या प्रतिनिधी मंडळात समावेश केला. थरुर काँग्रेसमध्ये गांधी घराण्याचे विरोधक म्हणून ओळखले जातात. मल्लिकार्जुन खडगे यांच्याविरोधात त्यांनी काँग्रेस अध्यक्षपदाची निवडणूकही लढवली होती. यात त्यांचा पराभव झाला, ही गोष्ट वेगळी. त्यामुळे खडगे आणि गांधी घराणे या दोघांनाही थरुर यांचे नाव चालणार नव्हते. त्यामुळे थरुर यांना डावलण्यात आले. काँग्रेसला गुणांची पारख नसली तरी मोदी यांना चांगल्या आणि कर्तृत्ववान माणसांची पारख आहे. सरकार जगाच्या वेगवेगळ्या देशात सात प्रतिनिधी मंडळे पाठविणार असून त्यांचे नेतृत्व भाजपाचे रविशंकरप्रसाद आणि बैजयंत पांडा, राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुप्रिया सुळे, शिवसेना शिंदे गटाचे डॉ. श्रीकांत शिंदे, द्रमुकच्या कनिमोझी आणि जदयूचे संजयकुमार झा करणार आहेत. विशेष म्हणजे मोदी सरकारने थरुर यांचा या प्रतिनिधी मंडळात समावेश केल्यानंतर, थरुर यांचे नाव आम्ही सुचवले नव्हते, अशी प्रतिक्रिया व्यक्त करत काँग्रेसने त्यांच्या नावावर एकप्रकारे आक्षेपही घेतला होता. असे करत गांधी घराणे आणि काँग्रेस नेतृत्वाने आपले हसे करून घेतले. काँग्रेसने गौरव गोगोई, राजा बरार, डॉ. सय्यद नासीर हुसेन आणि आनंद शर्मा अशी चार नावे पाठवली होती. सरकारने यातील तीन नावे फेटाळून लावत फक्त आनंद शर्मा यांचे नाव कायम ठेवले. जगात भारताची बाजू मांडण्यासाठी असे प्रतिनिधी मंडळ पाठवण्याची ही पहिली वेळ नाही. काँग्रेस सरकारच्या काळातही याआधी एक-दोन वेळा भारताने असे प्रतिनिधी मंडळ पाठवले होते आणि त्यात विरोधी पक्षाच्या नेत्याचा समावेश केला होता. राजीव गांधी पंतप्रधान असताना १९८८ मध्ये एक प्रतिनिधी मंडळ आपल्याला अमेरिकेत पाठवायचे होते. भाजपाचे अटलबिहारी वाजपेयी यांना काही शारीरिक त्रास होता आणि त्यावर अमेरिकेत ऑपरेशन करणे आवश्यक होते. पण काही आर्थिक अडचणींमुळे ऑपरेशनसाठी अमेरिकेत जाणे वाजपेयींना शक्य होत नव्हते. त्यामुळे पंतप्रधान असलेल्या राजीव गांधींनी अटलबिहारी वाजपेयी यांचा या प्रतिनिधी मंडळात जाणीवपूर्वक समावेश केला, जेणेकरून वाजपेयी आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारताची बाजू प्रभावीपणे मांडू शकतील, तसेच परत येताना आपले ऑपरेशनही करून घेऊ शकतील. राजीव गांधींची १९९१ मध्ये हत्या झाल्यानंतर अटलबिहारी वाजपेयी यांनीच ही बाब पत्रकारांना सांगितली होती.



काँग्रेसच्याच सरकारने दुसऱ्यांदाही अटलबिहारी वाजपेयी यांना भारताची बाजू मांडण्यासाठी संयुक्त राष्ट्रमध्ये पाठवले होते. २७ फेब्रुवारी १९९४ ला संयुक्त राष्ट्र मानवाधिकार आयोगाच्या बैठकीत पाकिस्तानने इस्लामिक देशांच्या संघटनेच्या माध्यमातून काश्मीरमध्ये मानवाधिकारचे उल्लंघन होत असल्याचा प्रस्ताव मांडला होता. हा प्रस्ताव यदाकदा पारित झाला असता तर जगात भारताची नाचक्की झाली असती. त्यामुळे संयुक्त राष्ट्र मानवाधिकार आयोगाच्या परिषदेत भारताची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांनी अटलबिहारी वाजपेयी यांना पाठवण्याचा निर्णय घेतला, तेव्हा वाजपेयी फक्त साधे खासदार होते. वाजपेयींच्या नेतृत्वातील प्रतिनिधी मंडळात तत्कालीन परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री सलमान खुर्शीद यांचाही समावेश होता. विशेष म्हणजे यात काही गैर आहे, असे त्यावेळी पंतप्रधान असलेल्या नरसिंहराव यांनाही वाटले नाही आणि साधे खासदार असलेल्या वाजपेयींच्या नेतृत्वात आपण कसे जायचे असा प्रश्न खुर्शीद यांनाही तेव्हा पडला नाही. वाजपेयी यांनी अतिशय प्रभावीपणे मानवाधिकार आयोगाच्या बैठकीत भारताची बाजू मांडत काश्मीरमध्ये मानवाधिकारांचे उल्लंघन होत असल्याचा पाकिस्तानचा आरोप खोडून काढला होता. त्यामुळे हा प्रस्ताव बारगळला. अटलजी विरोधी पक्षांचे नेते असले तरी जेव्हा देशाचा मुद्दा आला तेव्हा अटलजी आमचे नेते होते, असे सलमान खुर्शीद यांनी तेव्हा म्हटले होते. देशहिताच्या मुद्यावर तेव्हा असा आदर्श घालून देणाऱ्या काँग्रेसच्या नेत्यांनी आज परदेशात आपल्या देशाची बाजू मांडण्यासाठी आपल्या पक्षाच्या नेत्याच्या नावालाच पक्षांतर्गत राजकारणातून विरोध केला.

परदेशात भारताची बाजू मांडण्यासाठी पाठवण्यात येणाऱ्या प्रतिनिधी मंडळात नाव निवडण्याचा अधिकार सरकारचा असतो, विरोधी पक्षांनी सुचवलेली नावे मान्य केलीच पाहिजे, असे कोणतेही बंधन सरकारवर नसते. १९८८ आणि १९९४ ला भाजपाने अटलबिहारी वाजपेयी यांचे नाव सुचवले नव्हते, तर तेव्हाच्या काँग्रेस सरकारनेच अटलबिहारी वाजपेयी यांची निवड त्यांच्या कर्तृत्वावर केली होती. त्यामुळे या मुद्यावरून सरकारवर टीका करण्याचा कोणताही नैतिक अधिकार काँग्रेसला नाही. या मुद्यावरून काँग्रेस जेवढी आदळआपट करेल, तेवढे काँग्रेसचे नुकसान आणि बदनामी होणार आहे. त्यामुळे आता आमच्या पक्षाच्या नेत्याने परदेशात भारताची बाजू प्रभावीपणे मांडली, याचे श्रेय घेण्याचा फुकाचा प्रयत्न करत काँग्रेसने आपली झाकली मूठ सव्वा लाखाची ठेवली पाहिजे, त्यातच त्याचे हित आहे.

९८८१७१७८१७

## प्रेरक विचारपुष्प

'तरुण भारत'ने 'विचारपुष्प' या शीर्षकाखाली पुण्यपुरुषांचे संदेश देण्याचा उपक्रम सुरू केला आहे. हा उपक्रम अभिनंदनीय आहे. या थोर पुरुषांनी आपले संपूर्ण आयुष्य देशाच्या उत्थानासाठी समर्पित केले. हा देश हिंदूंचा आहे. हिंदूची परिभाषा देखील त्यांनी स्पष्ट शब्दांत जगासमोर मांडली. जे या मातृभूमीला आपले मानतात ते सर्व हिंदू अशी सरळ आणि सोपी परिभाषा त्यांनी केली. सर्व जातींचे, सर्व धर्मांचे आणि सर्व पंथांच्या नागरिकांना आपल्यात सामावून घेण्याची क्षमता हिंदू धर्मात आहे. हेच विचारधन सोबत बाळगत या पुण्यपुरुषांनी आपले जीवन देशासाठी खर्ची घातले. संसाराच्या मोहपाशापासून ते दूर राहिलेत. त्याग, तपस्या आणि बलिदानाचे ज्वलंत उदाहरण म्हणून या महानुभावांचा उल्लेख वारंवार करता येईल. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना १९२५ मध्ये झाली. संघाला येत्या २ ऑक्टोबरला १०० वर्षे पूर्ण होतील. जागतिक स्तरावर अशी एकही संघटना नाही ज्यांनी १०० वर्षे अविरत संघ शाखेच्या माध्यमातून देशसेवा करण्याचे व्रत घेतले आणि निरंतर त्याचे पालन केले. विचारपुष्प या सदराखाली ज्यांचे संदेश प्रकाशित होत आहेत ते सर्व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पाईक आहेत. त्यामुळे वंदनीय आहेत. नवीन पिढीला त्यांचे हे संदेश मार्गदर्शक ठरू शकतात, त्यांच्या आयुष्याला दिशादर्शन देणारे ठरू शकतात. याच पुण्यपुरुषांच्या मार्गदर्शनाखाली लाखो स्वयंसेवक घडलेत जे आज विविध क्षेत्रांत निष्ठेने कार्य करीत आहेत आणि भारत भूमीच्या सर्वांगीण विकासात आपले योगदान देत आहेत.

**वसंत पिंपळापुरे**/नागपूर

●● ●●

### 'नरकातला स्वर्ग'मध्ये मूळ मुद्याला बगल

संजय राऊत यांनी 'नरकातला स्वर्ग' हे पुस्तक लिहून प्रकाशित केले आहे आणि त्यात बरेच गौप्यस्फोट(!) केल्याचा दावा केला आहे. मात्र हे पुस्तक म्हणजे मूळ मुद्याला बगल देऊन केलेले एक विषयांतरच आहे. मुख्य विषय असा आहे की, २०१९ मधील विधानसभा निवडणुकीसाठी तत्कालीन शिवसेना आणि भाजप यांची निवडणूकपूर्व युती झालेली होती. त्या निवडणुकीत काँग्रेस व राष्ट्रीवादी काँग्रेस यांच्याबद्दल तिरस्कार असलेल्या हिंदुत्वप्रेमी मतदारांनी युतीला भरभरून मतदान करून स्पष्ट बहुमत दिले होते. मात्र निवडणुकीचे निकाल जाहीर होताच उद्धव ठाकरे यांनी पलटी मारली. राऊतांनी आम्हाला सर्व पर्याय खुले आहेत असे जाहीर केले. त्या दिवसांत देवेंद्र फडणवीस यांचा फोनदेखील मातोश्रीवर घेतला जात नव्हता! प्रत्यक्षात त्या गद्दारीची सुरुवात २०१९ मधील लोकसभा निवडणुकीच्या नंतर लगेचच झाली होती. त्या निवडणुकीतील मतदानाचा विधानसभा मतदारसंघनिहाय विचार करता, युतीला २८८ पैकी जवळपास २२० मतदारसंघांत मताधिक्य मिळाले होते. त्यामुळे त्यानंतरच्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सत्तेत येण्याची सुतराम शक्यता नव्हती. तेव्हापासूनच एजंट राऊत यांना हाताशी धरून कटकारस्थान रचण्यात आले. शिवसेनेने मुख्यमंत्रिपदाच्या लालसेपायी, मतदारांनी स्पष्टपणे नाकारलेल्या काँग्रेस-राष्ट्रवादीशी अनैतिक आघाडी करून सत्ता स्थापन केली. त्यासाठी उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांनी १०, जनपथ येथे जाऊन सोनिया गांधींपुढे लोटांगण घालून प्रखर हिंदुत्वाला सोडचिठ्ठी दिली आणि मराठी अस्मिता खुंटीला टांगली. पुढे योग्य वेळ पाहून एकनाथ शिंदे यांनी बाळासाहेबांच्या हिंदुत्ववादी शिवसेनेचे पुनरुज्जीवन केले आणि भाजपसोबत सरकार स्थापन केले. तेव्हा राऊतांनी आता मनगटे चावून काय उपयोग आहे?

**अविनाश वाघ**/९३२२९९६२४३

●● ●●

### ब्लॅकआऊट किंवा प्रकाशबंदी

युद्धकाळात शत्रूला दिसू नये म्हणून सर्व दिवे बंद करण्याचा काळ म्हणजे ब्लॅकआऊट. प्रकाशबंदी हा अगदी तंतोतंत प्रतिशब्द आहे. मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात देशातील अनेक शहरांनी ही स्थिती अनुभवली आहे. १९७१ साली युद्धपरिस्थितीत काही काळासाठी ब्लॅकआऊट झाल्याचे अनेकांना स्मरत असेलच. त्यावेळी पथदिवे बंद ठेवणे , सर्व खिडक्यांच्या काचांवर काळा कागद चिकटवणे, वाहनांच्या हेडलाईटच्या वरच्या अर्ध्या भागावर काळे स्टिकर लावणे यासारखे उपाय संपूर्ण देशात करण्यात आले. काही शहरांत संपूर्ण प्रकाशबंदी पण करण्यात आली. ब्लॅकआऊटमुळे आजकालच्या आधुनिक अत्यंत वेगवान विमानांना टार्गेट लॉक करणं शक्य होत नाही. मिसाईल आणि ड्रोन यांना नष्ट करणाऱ्या यंत्रणा अंधारात अधिक प्रभावीपणे कार्य करू शकतात याचा अनुभव आपण नुकताच घेतलेला आहे. या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी सरकारने अनेक ठिकाणी मॉक ड्रील आयोजित केल्या होत्या. ब्लॅकआऊटच्या प्रसंगी प्रत्येक नागरिकाने सरकारला आणि प्रशासनाला सहकार्य करणे गरजेचे आहे. सैन्यदलांना आणि सरकारला जबाबदार नागरिक म्हणून मदत व सहकार्य करणे हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# 'बसवेश्वर'च्या पर्यवेक्षकपदी प्रा. पांढरे यांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ एप्रिल -** श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षकपदी रसायनशास्त्र विभागातील प्रा. गोविंद पांढरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

त्यांच्या या नियुक्तीबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्य कक्षामध्ये प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या हस्ते त्यांचा पत्र देऊन यथोचीत सत्कार करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य प्रा. वनीता पाटील, माजी उपप्राचार्य प्रा. संजय पवार, प्रा. शैलेश कानडे, प्रा. माधव नायने, रत्नेश्वर स्वामी आणि नंदू काजापुरे यांची उपस्थिती होती.

प्रा. गोविंद पांढरे हे सन १९९३ पासून महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागात कार्यरत असून त्यांची एकूण ३२ वर्ष सेवा झाली आहे. त्यांनी महाविद्यालयातील अनेक समित्यांवर उत्कृष्ट कार्य केले आहे. रसायनशास्त्र विषयाचे विद्यार्थी प्रिय प्राध्यापक म्हणून ते सर्वांच्या परिचयाचे आहेत. महाविद्यालयातील अनेक गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना त्यांनी वेळोवेळी मदत केली आहे. ते शिस्तप्रिय आणि मितभाषी व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जाते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली असंख्य विद्यार्थी आज वेगवेगळ्या ठिकाणी मोठमोठ्या पदांवर कार्यरत आहेत.

त्यांच्या या नियुक्ती बद्दल श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे आणि सर्व संचालक, मुख्य समन्वयक डॉ. भास्कररेड्डी नल्ला, स्टाफ सचिव डॉ. रत्नाकर बेडगे, प्रा. रवींद्र सुरवसे, डॉ. सिद्राम डोंगरगे आदिंनी अभिनंदन केले.



## संक्षिप्त वृत्त...

### नुकसानीचे पंचनामे करून तत्काळ भरपाई द्या : काँग्रेस

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ एप्रिल -** शहरासह तालुक्यात रविवारी अतिवृष्टी होऊन घरे, फळबागांचे मोठे नुकसान झाले. याचे तत्काळ पंचनामे करून भरपाई द्यावी, अशी मागणी तालुका काँग्रेस आणि बाजार समितीच्यावतीने तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

शहरासह तालुक्यात रविवारी दुपारी व मध्यरात्रीच्या सुमारास वादळी वारे, विजांच्या कडकडाटासह अतिवृष्टी व गारपीट झाली. यामुळे शेतातील भाजीपाला, फुलशेती, पानमळे, आंबा व इतर फळबागांचेही प्रचंड नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी जनावरांच्या चाऱ्याचेही नुकसान झाले आहे. शेतात जनावरांसाठी उभारलेल्या शेडचे पत्रे व गव्हाण, समसापूर अन्य काही गावांतील घरांवरील पत्रे उडून गेल्याने संसारोपयोगी वस्तूंचे नुकसान झाले आहे. वादळामुळे विद्युत खांब पडले. तारा तुटल्याने अनेक भागात वीजपुरवठा खंडित झाला आहे. वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी संबंधित विभागाने तातडीची पावले उचलावीत. इंदरठाणा येथील सालगड्याचा अंगावर वीज पडून मृत्यू झाला आहे. त्यांच्या कुटुंबास मदत देण्याची मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर बाजार समितीचे सभापती उमाकांत खलंग्रे, उपसभापती शेषराव हाके, संचालक प्रवीण माने, हनुमंत पवार, प्रकाश सूर्यवंशी, विश्वनाथ कागले, प्रदीप काळे यांच्यासह शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### ५० हजारांची दुचाकी पळविली : पोलीसात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ एप्रिल -** चाकूर येथील दीपक देविदास पताळे यांनी एमएच २४ बीएस ०६७२ क्रमांकाची दुचाकी उभी केली होती. दरम्यान, अज्ञात चोरट्यांनी ही मोटारसायकल पळविली.

पताळे यांनी दुचाकीचा शोध घेतला. मात्र ती सापडली नाही. अखेर चाकूर पोलिस ठाण्यात तक्रार दिल्याने मंगळवारी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुचाकीची किंमत ५० हजार रुपये आहे. अधिक तपास पोहेकॉ. बोळंगे हे करीत आहेत. दरम्यान, जिल्ह्यात मोटारसायकल चोरीच्या घटनांत वाढ झाली आहे. त्यामुळे नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले आहे. पोलिसांनी दुचाकी चोरांचा शोध घेऊन कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

### सिकंदरपूरच्या सरपंच रेश्मा गंभीरे यांना पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ एप्रिल -** गुरधाळ येथील मानव विकास संस्थेच्या वतीने रविवारी लातूर येथे दयानंद महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडलेल्या कार्यक्रमात सिकंदरपूरच्या (ता. लातूर) आदर्श सरपंच रेश्मा माधवराव गंभीरे यांना राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले.

सिकंदरपूर गावात नाविन्यपूर्ण उपक्रम व उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांना पुरस्कार दिला. पुरस्कार सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, खा. डॉ. शिवाजी काळगे, भागवताचार्य पं. रमाकांत व्यास, हभप गहिनीनाथ महाराज औसेकर, माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, डॉ. अंबरिश महाराज देगलूरकर, संस्थाध्यक्ष वसंत घोगरे-पाटील यांच्या हस्ते देण्यात आला. सिकंदरपूर ग्रा. पं. आयएसओ, वैकुंठधाम, अंगणवाडी, स्मार्ट व्हिलेज, स्वच्छ व हरित गाव, आरोग्यदायी गाव, दारूबंदी, शासनाच्या ९ थीम राबवून गावचा शाश्वत विकास केल्याबद्दल सरपंच रेश्मा गंभीरे यांना पुरस्कार दिला. पुरस्कार मिळाल्यानिमित्त सरपंच गंभीरे यांचे पंचक्रोशीतून अभिनंदन करण्यात येत आहे.

### आखरवाई जि.प.शाळेचे दयानंद ठाकूर यांचा गौरव

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ एप्रिल -** शिक्षक फाउंडेशन द्वारा संचलित महाराष्ट्र शिक्षक पॅनलच्या वतीने लातूर तालुक्यातील आखरवाई जिल्हा परिषद शाळेतील सहशिक्षक दयानंद ठाकूर यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन कोल्हापूर येथे गौरव करण्यात आला. सिने अभिनेत्री मधुराणी प्रभुलकर, कवी प्रा. रोहित शिंगे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी शिक्षक पॅनलचे अध्यक्ष दीपक चामे, सचिव सतीश माळी, राजश्री पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धा परीक्षा वर्ग, पालक सभा, महिला मेळावे, सांस्कृतिक कार्यक्रम आदी उपक्रम शिक्षक ठाकूर यांनी राबविले आहेत.

### महापालिकेचे उपायुक्त डॉ. खानसोळे विकासरत्न पुरस्काराने सन्मानित



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ एप्रिल -** लातूर शहरात प्रशासनाच्या माध्यमातून भरीव कार्य करणारे कर्तव्यदक्ष उपआयुक्त डॉ.पंजाबराव खानसोळे यांना 'वॉईस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरम' व 'केंद्रीय कार्यकारी समिती' यांच्यावतीने 'विकासरत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथे झालेल्या भव्य सोहळ्यात हा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

# लातूर जिल्ह्याला पावसाने पुन्हा झोडपले

## विज पडल्याने चार दिवसांत दोघांचा मृत्यू तर ८४ पशुधन दगावले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ एप्रिल -** लातूर शहरासह जिल्ह्यातील अनेक गावांना अवकाळी पावसाने झोडपून काढले. या पावसामुळे रेणापूर तालुक्यातील नदी प्रवाहित झाली तर अनेक ओढे तुडुंब भरून वाहत आहेत. दरम्यान, वीज पडून जिल्ह्यात दोघा जणांचा मृत्यू झाला असून जवळपास ८४ पशुधन दगावले आहेत.

गेल्या चार दिवसांपासून लातूर जिल्ह्यात विजांचा तांडव सुरू असून यात दोघांचा मृत्यू झाला तर तब्बल ८४ पशुधनांचा होरपळून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. त्यामुळे बळीराजा अडचणीत सापडला आहे. वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे जिल्ह्यातील विविध भागात फळबागा आणि शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

गेल्या काही वर्षांपासून उन्हाळा आणि हिवाळ्यातही निसर्गाच्या लहरीपणाचा सामना करावा



लागत आहे. मान्सूनपूर्व पाऊस हा असतोच. मात्र, यंदा वादळी वाऱ्यासह विजांचा कडकडाट आणि पावसामुळे शेतकऱ्यांचे गणितच बिघडत आहे. खरीपपूर्व मशागतीची कामेही खोळंबली आहेत. लातूर जिल्ह्यात एकीकडे पाणी टंचाईचा प्रश्न गंभीर असतानाच दुसरीकडे गेल्या अडीच महिन्यांत जिल्ह्यातील अनेक भागात अवकाळी पावसाचा सामना करावा लागत आहे. गेल्या चार दिवसांपासून जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह जोरदार अवकाळी पाऊस कोसळत आहे. बुधवारी तर लातूरकरांना सूर्यदर्शनही झाले नाही. या वादळी वाऱ्यात अनेक घरांवरची पत्रे उडून गेल्याने सामान्य कुटुंब उघड्यावर पडले आहेत. अनेक ठिकाणी विजेचे खांब पडल्याने व तारा तुटल्याने वीजपुरवठा बंद आहे. या पावसामुळे आठवडी बाजारातील व्यापारी व ग्राहकांची मोठी तारांबळ उडाली तर फळबागा आणि शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यातच जिल्ह्यात विजांचा तांडव सुरू आहे. वीज पडून दोघांचा मृत्यू झाला, तर तब्बल ८४ पशुधनांचा होरपळून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली.

### काळजी घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह विजांचा कडकडाट सुरू आहे. त्यामुळे विजांचा कडकडाट सुरू असताना झाडांच्या खाली, मोकळ्या जागेत, उघड्यावर थांबू नये. शेतामध्ये काम करत असताना वीज पडण्याची शक्यता असेल, तर त्वरित सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. धातूची अवजारे, मोबाइल फोन यांचा वापर टाळावा. जनावरांना उघड्यावर न बांधता सुरक्षित आश्रयस्थानी ठेवावे. मोबाइलवर 'दामिनी लाईटिंग अलर्ट' हे ॲप डाऊनलोड करून वीज पडण्याची पूर्वसूचना मिळवावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

### राज्य उपाध्यक्षपदी प्रा.डॉ. झरीकर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ एप्रिल -** शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे मागासवर्गीय सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेची बैठक होऊन सेवानिवृत्तांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली.

यावेळी प्रा.डॉ. बाळासाहेब कांबळे झरीकर यांची संघटनेच्या राज्य उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रा. शंकर सोनवणे होते. बैठकीस प्रा. अनंत लांडगे, बलभीम कोथिंबीरे, प्रा. विजय शृंगारे, प्रा. देविदासराव शिंदे, जिल्हाध्यक्ष प्रा. एस.टी. मस्के, मोहन कांबळे सेलूकर, एस.एस. धसवाडीकर, ए.बी. कांबळे, माणिक पवार, बी.बी. गायकवाड, लक्ष्मण धोत्रे, डी.एन. कांबळे, दुष्यंत अंगरखे आदी उपस्थित होते.

### वाहतूक अडथळा; ट्रॅव्हल्सवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ एप्रिल -** शहरातील टिळक नगर परिसरात एमएच ३८ एक्स ८०२७ क्रमांकाच्या ट्रॅव्हल्स चालकाने वाहन उभे करून रहदारीस अडथळा केला.

स्वतःच्या आणि इतरांच्या जीवितास धोका निर्माण होईल, अशा बेशिस्त स्थितीत वाहन उभे करण्याबरोबर प्रवाशांची चढ-उतार करीत असल्याचे आढळले. तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन केल्याचे आढळून आले. या प्रकरणी पोलिस शिपाई आनंद वाघमारे यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलिसात गुन्हा नोंद आहे.

# त्यागमूर्ती प्रयागअक्का कराड जीवन गौरव पुरस्काराचे शनिवारी वितरण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ एप्रिल -** विश्वशांती केंद्र आळंदी, माईर्स एमआयटी, पुणे यांच्यावतीने त्यागमूर्ती प्रयागअक्का कराड यांच्या बाराव्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून, ज्ञान-विज्ञान आणि अध्यात्माच्या समन्वयातून आयुष्यभर समाजप्रबोधन व सांप्रदायिक सद्भावनेचे सेवाभावी कार्य करणाऱ्या पंचकन्यांना शनिवारी (दि.२४) सकाळी १० वाजता लातूर तालुक्यातील रामेश्वर (रूई) येथे 'पूर्णब्रह्मयोगिनी त्यागमूर्ती श्रीमती प्रयागअक्का कराड समर्पित जीवनगौरव राष्ट्रीय पुरस्कार' देऊन



सन्मानीत करण्यात येणार आहे, अशी माहिती माईर्स एमआयटीचे अध्यक्ष डॉ. मंगेश कराड आणि विश्वस्त व महासचिव प्रा. स्वाती कराड-चाटे आणि लातूर ग्रामीणचे आमदार रमेश कराड यांनी दिली.

या समारंभासाठी जगप्रसिध्द शास्त्रज्ञ डॉ. भूषण पटवर्धन हे विशेष सन्माननीय पाहुणे असतील. बडोदा संस्थानचे जितेंद्रसिंह गायकवाड हे विशेष सन्माननीय पाहुणे असतील. अध्यक्षस्थानी एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड असतील. तसेच, एमआयटीचे कार्याध्यक्ष राहुल कराड हेही उपस्थित राहणार आहेत. या पंचकन्यांमध्ये आळंदी येथील रमाबाई किसन महाराज साखरे, बडोदा येथील बडोदा संस्थानच्या महाराणी आशाराजे गायकवाड, ज्येष्ठ समाजसेविका भारती ठाकूर, राजस्थान येथील ग्लोबल इनिशिएटिव्ह ऑफ पीस अँड वेलबिईंगच्या राजयोगिनी डॉ. बिन्नी सरीन आणि बद्रिनाथ धाम येथील माणा गावाच्या शिक्षिका व समाजसेविका दमयंती जितवान यांचा समावेश आहे.

या पंचकन्यांना सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह, स्मृतिपदक व रोख १ लाख २५ हजार रुपये देऊन सन्मान करण्यात येणार आहे. त्यागमूर्ती प्रयागअक्का कराड या भारतीय संस्कृती, परंपरा आणि तत्त्वज्ञानाचे मूर्तिमंत प्रतीक, तत्त्वज्ञ संत श्री ज्ञानेश्वर माउली, जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज आणि समचरण पांडुरंगाच्या सेवेत श्रध्दा, निष्ठा व भक्तिमय असे व्रतस्थ आणि समर्पित जीवन जगल्या. त्यांच्या कार्यापासून सर्वांनी प्रेरणा घ्यावी, हा या पुरस्कार देण्यामागचा हेतू आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्यास सर्व स्तरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन लातूर ग्रामीणचे आमदार रमेश कराड आणि संयोजन समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

# स्मृतिदिनानिमित्त राजीव गांधींना मांजरा परिवारातर्फे अभिवादन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ एप्रिल -** माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त बुधवारी विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखानास्थळी माजी मंत्री तथा मांजरा साखर कारखान्याचे चेअरमन दिलीपराव देशमुख, माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी भारतरत्न राजीव गांधींच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

यावेळी विलास साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन वैजनाथ शिंदे, लातूर बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, रेणा साखर कारखान्याचे चेअरमन अनंत देशमुख, व्हाईस चेअरमन ॲड. प्रवीण पाटील, मारुती महाराज साखर कारखान्याचे चेअरमन श्याम भोसले, व्हाईस चेअरमन सचिन पाटील, विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन अशोक काळे, जागृती शुगरचे व्हाईस चेअरमन लक्ष्मण मोरे, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, सचिन दाताळ, जिल्हा काँग्रेसचे माध्यम समन्वयक हरिराम कुलकर्णी यांच्यासह मांजरा साखर परिवारातील कारखान्यांचे कार्यकारी संचालक, काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

# आंबेडकर चौकातील गटार कामाच्या चौकशीची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ एप्रिल -** शहराच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील मुख्य रस्त्यावर साचणारे पाणी बंद करण्यासाठी भूयारी गटार तयार केली. परंतु, पहिल्याच पावसात रस्त्यावर पाणी साचून तळे निर्माण झाले आहे. यामुळे भूयारी गटार योजनेच्या निकृष्ट कामाची चौकशी करण्याची मागणी पूर्व भाग कृती समितीच्यावतीने करण्यात आली आहे.

शहराच्या आंबेडकर चौकातील नांदेड रस्त्यावर अनेक वर्षांपासून पावसाच्या पाण्याचा डोह साचत आहे. याकडे महानगरपालिकेचे लक्ष वेधण्यासाठी पूर्व भाग कृती समितीने आंदोलने केली. रसत्यावरील पाण्यात कागदी होड्या सोडल्या, पाण्यात मांडी घालून बसण्याचे आंदोलन केले, पाण्यात बेशरमाचे झाड लावले, आयुक्तांचे छायाचित्र असलेली होडी पाण्यात सोडण्यात आली. त्यानंतर आयुक्तांनी पाहणी केली. कार्यवाहीचे आदेश दिले. त्यानुसार या चौकापासून विवेकानंद चौकापर्यंत भूयारी गटार करण्यात आली आहे.

रस्त्याच्या दुतर्फा गट्टू फुटपाथ बसविण्यात आले आहेत. पण पहिल्याच पावसात डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात पूर्वीप्रमाणेच पाणी साचले आहे. यामुळे रस्त्यावर तळे साचले आहे. सदर कामाच्या गुणवत्तेची चौकशी करण्याची पूर्व भाग कृती समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे, बाबासाहेब बनसोडे, सुरेश संगापुडे, नितीन चालक, तायप्पा कांबळे, मुन्ना हाश्मी यांनी केली आहे.

# लॉजवर छापा; दोघींची सुटका

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ एप्रिल -** अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या पथकाने मंगळवारी रात्री शहरातील शिवाजी रोड स्क्रॅप मार्केटजवळ असलेल्या आनंद लॉजवर छापा मारून दोन पीडित महिलांची सुटका केली, तर तुळजापूर येथील एक पुजारी व एका विद्यार्थ्यासह १० जणांविरुध्द गांधी चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे.

लातूर शहरातील शिवाजी रोड स्क्रॅप मार्केटजवळील आनंद लॉजमध्ये लॉजचा मालक, व्यवस्थापक आणि त्यांचे साथीदार हे परराज्यातील महिलांना पैशाचे आमिष दाखवून त्यांच्याकडून देहविक्रय व्यवसाय करवून घेत असल्याची गुप्त माहिती मिळाली. माहितीची खातरजाम करून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या पथकाने मंगळवारी (दि.२०) दुपारी एक वाजेच्या सुमारास या लॉजवर बनावट ग्राहक पाठविला.

**बनावट ग्राहकाकडून इशारा**

## तुळजापुरातील पुजारी, विद्यार्थ्यासह १० जणांवर गुन्हा

मिळतात पथकाने लॉजवर छापा टाकला. सदर छाप्यात परराज्यातून देहविक्रय करवून घेण्यासाठी आणलेल्या दोन पीडित महिला आढळून आल्या तर लॉजचा व्यवस्थापक व इतर साथीदार अशा ७ जणांना ताब्यात घेण्यात आले. यावेळी पीडित महिलांची सुटका करण्यात आली. यावेळी किशोर नरहरी तळेकर, श्याम किशोर तळेकर, शाहू तळेकर, संतोष किशोर तळेकर (सर्व रा. म्हाडा कॉलनी, बाभळगाव रोड, लातूर), अजय तात्याराव कांबळे (रा. उटगेनगर, लातूर), समर्थ नितीन भोसले (वय २१, व्यवसाय पुजारी, रा. शुक्रवार पेठ, तुळजापूर, ता. तुळजापूर), सौरभ अंबादास बिराजदार (वय २५, व्यवसाय शिक्षण, रा. जिजामातानगर, तुळजापूर, ता. तुळजापूर), समर्थ धन्यकुमार कवडे (वय २२, व्यवसाय फोटोग्राफी), विश्वजीत मोहन शिंदे, (वय १९, व्यवसाय शिक्षण, दोघेही रा. शुक्रवार पेठ, तुळजापूर, ता. तुळजापूर) यांना अटक करून त्यांच्याविरुध्द गांधी चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे पोलीस निरीक्षक समाधान चवरे, पोलीस उपनिरीक्षक सुभाष सूर्यवंशी, श्यामल देशमुख, राजाभाऊ सूर्यवंशी, सदानंद योगी, सुधामती वंगे-यादव, लता गिरी यांनी ही सेवा बजावली.

# १२ हजारांची लाच घेणारा कंत्राटी कर्मचारी 'एसीबी'च्या जाळ्यात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ एप्रिल -** विहिरीचा प्रस्ताव वाढवून देण्याच्या कामासाठी १२ हजार रुपयांची लाच घेणाऱ्या रेणापूर पंचायत समिती कार्यालयातील कंत्राटी सहायक कार्यक्रम अधिकाऱ्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले.

शेतामध्ये वडिलांच्या नावे रोजगार हमी योजनेतून विहीर घेण्यासाठी तक्रारदाराने ५ मार्च रोजी प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावाचे अंदाजपत्रक चार लाख रुपयांचे होते. मजुरी वाढल्याने १ एप्रिलपासून नवीन दरानुसार विहिरीचे इस्टिमेट ५ लाख रुपयांचे झाले आहे. त्यानुसार अंदाजपत्रक तयार करण्यासाठी व नरेगा साईटवर तक्रारदाराच्या वडिलांचे आडनाव सोमवंशी ऐवजी सूर्यवंशी झाले आहे, त्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी पंचायत समिती कार्यालयातील कंत्राटी सहायक कार्यक्रम अधिकारी ज्योतिर्लिंग बाबूराव चिखले (वय ४३, रा. अग्रोयानगर, लातूर) याने या कामासाठी १५ हजार रुपयांची लाचेची मागणी केली होती. याबाबत ८ मे रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल करण्यात आली होती. १३ मे रोजी अंदाजपत्र आणि आडनावात बदल करणे या दोन्ही बाबींसाठी 'तुझ्या मनाने पैसे देऊन जा' म्हणत लाच घेण्याबाबत आरोपी ज्योतिर्लिंग चिखले याने सहमती दर्शवली.

दरम्यान, मंगळवारी (दि.२०) सायंकाळी अग्रोयानगर परिसरात १५ हजार रुपयांपैकी १२ हजार रुपये स्विकारताना सहायक कार्यक्रम अधिकारी ज्योतिर्लिंग बाबूराव चिखले यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी रंगेहाथ पकडले.ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उप अधीक्षक संतोष बर्गे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यामध्ये निरीक्षक भास्कर फुलारी, अन्वर मुजावर, फारूक दामटे, भागवत कठारे, भीमराव आलुरे, श्याम गिरी, मंगेश कोंडरे, दीपक कलवले, गजानन जाधव, शहाजान पठाण, शिवराज गायकवाड यांनी केली.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पर्यावरण शपथ घेऊन स्वच्छता उपक्रमांची सुरुवात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २२ मे-**

नांदेड,२२- केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार पर्यावरण, आरोग्य व स्वच्छता उपक्रमांची जिल्ह्यात आजपासून सुरुवात करण्यात आली. या उपक्रमाचा जिल्हास्तरीय शुभारंभ जिल्हा परिषदेच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये पर्यावरण शपथ घेऊन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांच्या हस्ते झाला.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी नारायण मिसाळ, महिला व बालविकास विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत थोरात, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ. सविता बिरगे, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगर, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रवीणकुमार घुले, समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता आर. डी. रावसाहेब, अभियंता अशोक भोजराज, विशाल चोपडे आदी मान्यवर उपस्थित होते.

गावस्तरावर पर्यावरणीय समृद्धीसाठी ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी केले. दिनांक २२ मे ते ५ जून २०२५ या कालावधीत प्लास्टिक प्रदूषण निर्मूलन विशेष मोहीम राबवली जाणार आहे. या मोहिमेंतर्गत सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता, प्लास्टिक संकलन, एकल वापराच्या



प्लास्टिकचा टाळाण्यासाठी जनजागृती, सोशल मीडियाच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षणाचे महत्व जनमानसात पोहोचविण्यात येणार आहे. नागरिकांनी या मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवून ही मोहिम यशस्वी करावी, असे आवाहनही सीईओ मेघना कावली यांनी यावेळी केले.

**गावस्तरावर विविध उपक्रम**

याव्यतिरिक्त, दिनांक २८ मे रोजी मासिक पाळी व्यवस्थापन दिन साजरा करण्यात येणार आहे. या दिनानिमित्त प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, शाळा व अंगणवाड्यांमार्फत किशोरवयीन मुली व महिलांना मासिक पाळीतील स्वच्छता, सॅनिटरी नॅपकिन्सचा वापर यासंबंधी मार्गदर्शन करण्यात येईल. यामध्ये आरोग्य कर्मचारी, महिला बचत गट, महिला शिक्षक, आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविका यांचा सक्रिय सहभाग असणार आहे. तसेच, दिनांक २१ जून रोजी जागतिक योग दिन 'एक पृथ्वी, एक आरोग्य' या थीमअंतर्गत जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये साजरा केला जाणार आहे. योग सत्राव्दारे नैसर्गिक जीवनशैलीचे महत्व, मानसिक व शारीरिक आरोग्य यावर भर दिला जाणार आहे.

**पाणी गुणवत्ता तपासणी जनजागृती अभियानाचा शुभारंभ**

या कार्यक्रमात पाणी गुणवत्ता तपासणी जनजागृती अभियानाचा जिल्हास्तरीय शुभारंभ देखील मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या हस्ते करण्यात आला. हे अभियान दिनांक ७ जून पर्यंत जिल्हाभर राबविण्यात येणार आहे. यामध्ये गावांतील शाळा, अंगणवाडी तसेच सार्वजनिक पाण्याच्या स्त्रोतांची तपासणी एफ.टी.के. (ऋढघ) किटच्या साहाय्याने करण्यात येणार आहे. शुद्ध पिण्याच्या पाण्याचे महत्व यासंदर्भात जनजागृतीही केली जाणार आहे.

# शेतीच्या वादातून दोन गटात तुंबळ हाणामारीत युवकाचा खून

## मुदखेड तालुक्यातील चिलपिंपरी गावातील घटना

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २२ मे-**

मुदखेड तालुक्यातील चिलपिंपरी येथे शेतीच्या बांधाच्या वादातून येडे व गाढे या दोन कुटुंबात कुऱ्हाड, कत्ता आणि फावड्याच्या सहाय्याने तुंबळ हाणामारीच्या घटनेत डोक्यात कुऱ्हाडीचा घाव बसल्याने युवक सिताराम देविदास येडे (वय २६) याचा खून झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेत येडे व गाढे कुटुंबातील तिघेजण गंभीर जखमी असून शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार गावालगतच्या फुल शेतात बांधाच्या वादातून दि.२० मे रोजी सकाळी आठ वाजताच्या सुमारास शेतात गाढे व येडे कुटुंबात कुरबुर झाली होती. यानंतर गावात घरी परत येताच दोन कुटुंबात पुन्हा तुंबळ हाणामारी सुरू झाली. यामध्ये कुऱ्हाड, काट्या, कत्ता आणि लोखंडी फावडे याचा वापर यावेळी करण्यात आला. यावेळी दोन कुटुंबाच्या तुंबळ हाणामारीत सिताराम देविदास येडे यांच्या डोक्यात कुऱ्हाडीचा घाव बसल्याने गंभीर जखमी झाले. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना नांदेड येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. परंतु त्यांना मृत घोषित करण्यात आले. या घटनेत बालाजी देविदास येडे, नागोराव देविदास येडे, नागोराव माधवराव गाढे गंभीर जखमी झाल्याने त्यांनाही रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

युवक सिताराम येडे खून प्रकरणी गाढे कुटुंबातील सात जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नागोराव माधवराव गाढे, मारोतराव माधवराव गाढे यास इतर पाच जणांवर मुदखेड पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. मयत सिताराम येडे यांच्या पार्थिव देहावर दि. २१ मे रोजी दुपारी दोन वाजता शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी गावात मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त दाखल होता. पुढील तपास पोलीस निरीक्षक वसंत सप्रे करीत आहेत.

## संक्षिप्त वृत्त

### नंदिनी जाधव चे दहावी परीक्षेत यश

**नांदेड**-नुकत्याच जाहीर झालेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत कुमारी नंदिनी मारोती जाधव हिने तब्बल ९३.८ टक्के गुण प्राप्त करून घवघवीत यश मिळवले आहे. आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे स्वीय सहाय्यक मारोती जाधव यांची मुलगी नंदिनी ही सीबीएससी पॅटर्न दहावी बोर्ड परीक्षेत कुमारी नंदनी जाधव ही ९३.८ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाली आहे. ती केंद्रीय विद्यालय एस .सी आर ची विद्यार्थिनी आहे. मार्च २०२५ च्या इयत्ता दहावी सीबीएससी पॅटर्न मधून परीक्षा दिली होती. या परीक्षेत तिने ९३.८ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाल्याबद्दल तिथे शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी अभिनंदन केले आहे. कुमारी नंदिनीच्या यशाबद्दल वडील मारोतराव जाधव, आई सविता जाधव, काका गंगाधर जाधव, काकू जयश्री जाधव, भाऊ अथर्व जाधव, ओम जाधव, श्री जाधव, मामा विजय हिवराळे यांच्यासह नातेवाईक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.



### लोहा शहरात आज तिरंगा रॅलीचे आयोजन

**लोहा**- शहरात उद्या दि.२३ मे रोजी सायंकाळी ४ वाजता तिरंगा रॅली चे आयोजन करण्यात आले आहे. पहलगाम येथील अतिरेकी हल्ल्यानंतर भारत देशाच्या सैन्याने शत्रूला दिलेले प्रत्युत्तर हे अभिमानास्पद आहे. देशाच्या वीर जवानांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी शहरांमध्ये उद्या दि.२३ मे रोजी सायंकाळी ४ वाजता भव्य तिरंगा रॅली चे आयोजन करुन छत्रपती शिवाजी महाराज स्मारक जुना लोहा ते मुख्ये बाजार पेठ रस्त्याने नगर परिषद कार्यालयातील महात्मा बसवेश्वर महाराज स्मारकाल अभिवादन करुन डॉ . बाबासाहेब आंबेडकर स्मारक बस स्थानक जवळ क्रांतिसूर्य बुध्द विहार डॉ.आंबेडकरनगर मेन रोड येथे सायंकाळी ६ वाजता सदरील तिरंगा रॅलीचा समारोप करण्यात येणार आहे या भव्य तिरंगा रॅली मध्ये शहर व तालुक्यातील, व्यापारी, शिक्षकांनी, कर्मचाऱ्यांनी, डॉक्टर, वकील यांच्यासह नागरिकांनी सहभाग नोंदवा असे लोहा मतदारसंघ भारतीय जनता पक्षाच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

### पशुसंवर्धन दिनानिमित्त श्वावानांना रेबीज प्रतिबंध लसीकरण मोहीमेस सुरूवात

**नवीन नांदेड**-पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासन व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २० मे २०२५ रोजी पशुसंवर्धन दिनानिमित्त रेबीज मुक्त महाराष्ट्रासाठी श्वानांमध्ये रेबीज प्रतिबंधक लसीकरण मोहिमेचा शुभारंभ मनापा पशुवैद्यकीय दवाखाना अशोक नगर नांदेड येथे पशु शल्य चिकित्सक डॉ .मो.रईसोद्दीन त्यांनी केला. श्वानांचे लसीकरण आवश्यकच असल्यामुळे रेबीज लसीकरण करून घ्यावे यामध्ये पाळीव कुत्रे व त्यासोबत भटक्या कुत्र्यांचेही निर्मितीकरण करून याद्वारे रेबीज आजाराचा प्रादुर्भाव रोखला जाऊ शकतो म्हणूनच महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत आदी स्तरावर या लसीकरणाची मोहीम चालू भटक्या कुत्र्यांना या आजाराचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून मनपा आयुक्त डॉ. महेश कुमार डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पशु शल्य चिकित्सक डॉ. मो. रईसोद्दीन यांनी दिनांक २० मे २०२५ रोजी पशुसंवर्धन दिनानिमित्त रेबीज लसीकरणास सुरुवात पशुवैद्यकीय दवाखाना अशोक नगर येथे करण्यात आली. यावेळी डॉ.राजकुमार पडिले (जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नांदेड),डॉ. प्रविणकुमार घुले (जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड) ,डॉ. रोहित धुमाळ (सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, नांदेड) ,डॉ. अविनाश बुनावार (पशुधन विकास अधिकारी - विस्तार ),पंचायत समिती, नांदेड,डॉ.मो. रईसोद्दीन पशुशल्यचिकित्सक,महानगरपालिका, डॉ.माधव आठवले,नांदेड यांच्यासह दवाखान्यातील कर्मचारी सचिन कांबळे, मोहम्मद जब्बार यांच्या उपस्थितीमध्ये कुत्र्यांना लसीकरण करण्यात आले. यावेळी ३४ श्वानांचे लसीकरण करण्यात आले.



# गुरुद्वारा येथे १ जून रोजी मोफत वैद्यकीय शिबिर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २२ मे-**

येथील सचखंड गुरुद्वारा परिसरातील दशमेश हॉस्पिटल येथे सतत डोकेदुखीचा त्रास होणाऱ्या रुग्णांसाठी १ जून २०२५ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.३० या वेळेत न्यूरोलॉजिकल डिसऑर्डरवर मोफत वैद्यकीय शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

ठाणे येथील सोलारिस मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलने यासाठी पुढाकार घेतला असून गुरुद्वाराच्या वतीनेही सहकार्य मिळणार आहे. अनुसया चॅरिटेबल ट्रस्टच्या सहकार्याने येत्या हे मोफत शिबिर विशेषतः न्यूरोलॉजिकल आजार आणि विकारांनी ग्रस्त रुग्णांसाठी घेण्यात येत या मोफत आरोग्य शिबिरासाठी नोंदणी सुरू असून तज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची तपासणी होणार आहे.

संबंधित आजार एखाद्या व्यक्तीच्या जीवनावर लक्षणीय परिणाम करू शकतात. जगभरात लाखो लोकांना मायग्रेन, एपिलेप्सी, डिमेंशिया, स्ट्रोक, अल्झायमर रोग आणि मल्टिपल स्क्लेरोसिस सारख्या आजारांचा त्रास होतो. या आरोग्य समस्यांचे प्रभावीपणे उपचार करण्यासाठी लवकर निदान अत्यंत महत्त्वाचे आहेत. हे मोफत आरोग्य शिबिर रुग्णांना त्यांच्या आजारांबद्दल माहिती मिळविण्यासाठी एक उत्कृष्ट व्यासपीठ उपलब्ध करून देणार आहे. असेही यावेळी सांगण्यात आले.

अनेकदा खर्च किंवा भौगोलिक मर्यादांसारख्या अशा विविध अडथळ्यांमुळे रुग्णांना उपचाराची संधी मिळत नाही. मात्र हे मोफत शिबिर न्यूरोलॉजिकल आरोग्याबद्दल जागरूकता वाढविण्यास आणि समुदायांमध्ये आवश्यक असलेला आधार देण्यासाठी मदत करणार आहे. या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉक्टर हंसराज वैद्य, डॉ. दिपक आयवळे , डॉ. अमित आयवळे व गुरुद्वाराच्यावतीने करण्यात आले आहे

# आदमपूर परिसरात अवकाळी पावसाची हजेरी

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. २२ मे-**

बिलोली तालुक्यातील आदमपूर परिसरात अनेक भागात बुधवार दि.२१ मे रोजी पहाटेपासून अवकाळी पावसाची रिमझिम अवचित सुरू झाली. रात्री सोसाट्याचा वारा आणि रिमझिम पाऊस सुरू झाल्याने लाईटही गुल झाल्याने ऐनवेळी झोपमोड होता,त्यामुळे उकाड्याने परिसरातील नागरिकही वैतागून गेले आहेत.गेल्या दोन चार दिवसांपासून दुपारीच वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटास सुरूवात होत आहे. त्यामुळे भर दुपारी पादचारी व वाहन धारकांना रस्त्यावरील धुळीचा सामनाही करावा लागत आहे.कधी टिपूस तुरळक थेंब तर कधी रिमझिम पाऊस कोसळत आहे.

# मन्याड नदी अमृतवाहिनी करण्यासाठी शासनाची सर्वतोपरी मदत : पालकमंत्री सावे

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. २२ मे-**

चला जाणूया नदीला या कार्यक्रमांतर्गत मन्याड नदी अमृतवाहिनी करण्याचे कार्य सुरू आहे. पालकमंत्री मा. अतुलजी सावे यांनी सोमवार (दि.१९) रोजी वझरगा (ता. देगलूर) येथील मन्याड नदीच्या पात्रात चालू असलेल्या गाळ काढण्याच्या कामाची पाहणी करून प्रशंसा केली. याकामासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, संस्कृति संवर्धन मंडळाचे चेअरमन प्रमोद देशमुख, उपजिल्हाधिकारी अनुप पाटील, तहसीलदार भारत सूर्यवंशी, जलसंधारण



विभागाचे प्रादेशिक संचालक अतुल आटके, अभियंता रामेश्वर भेरे, अटकळीचे माजी सरपंच विनोद देशमुख, शिवाजी डोंगरे, वसंत रावणगावकर व परिसरातील शेतकरी मोठ्या संखेने उपस्थित होते.

नदी प्रवाहित राहण्यासाठी पात्रात जमलेला अतिरिक्त गाळ काढणे गरजेचे आहे, यामुळे पूर परिस्थिती टाळून नदी काठची गावे व शेतीचे नुकसान होणार नाही तर मुबलक पाणीसाठा उपलब्ध होईल, यासाठी सगरोळी (ता.बिलोली) येथील संस्कृति संवर्धन मंडळ, नाम फाउंडेशन, जिल्हा प्रशासन व लोकसहभागातून मन्याड नदी पुनरुज्जीवित करण्यासाठी चला जाणूया नदीला हा उपक्रम २०२३ पासून राबवण्यात येत आहे. वझरगा (ता.देगलूर) ते सगरोळी (ता.बिलोली) पर्यंत एकूण २२ किमी मन्याड नदीपात्रातील गाळ काढला जाणार असून मागील महिन्यात दुसऱ्या टप्प्यातील कामास सुरुवात झाली आहे. कामाची पाहणी करून पालकमंत्री सावे यांनी पूर्णतः सहकार्य राहील असे आश्वासन दिले.

**नाम फाउंडेशनचे मोठे योगदान**

मन्याड नदी अमृतवाहिनी करण्यासाठी नाम फाउंडेशनचे मोठे योगदान आहे. कार्यारंभापासून नामने यंत्र सामग्री उपलब्ध करून दिली. वस्तूतः नाम फाउंडेशन मुळेच मन्याड सारख्या क्षतिग्रस्त नदीचे पुनर्जीवन होण्याचा मार्ग दिसला. नाना पाटेकर यांचे चिरंजीव स्वतः मल्हार पाटेकर व नामचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश थोरात यांनी मन्याड नदीची पाहणी केली होती. त्यानंतरच कामाची सुरुवात झाली. याकामी नाम फाउंडेशनचा मोठा वाटा असल्याने भविष्यात मन्याड खोऱ्यामध्ये नामचा विशेष नामोल्लेख होत राहील.

# नरसीतील कृषीसेवा केंद्रात चढ्या दराने बियाणांची विक्री

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. २२ मे-**

तालुक्यातील नरसीतील कृषी सेवा केंद्रातून दरवर्षाप्रमाणे याही वर्षात काही प्रवानाधारकानी नामी शक्कल लढवित यंदाच्या वर्षात शेतकऱ्यांच्या सोयाला बाजार पेठेत भाव मिळत नसल्याने खरीप हंगामातील पिक लागवडी साठी शेतकऱ्यांची गरज ओळखून कृषी विभागातील अधिकारी यांना हाताशी धरून नरसी बाजारपेठेत काही कृषी सेवा केंद्र धारकांनी खुल्या बियाणांची उगवण क्षमता न पाहताच सोयाबिनचे बियाणे ३० किलोच्या बॅग भरून नामांकित कंपनीचे लेबल लावून कृषी सेवाकेंद्रातील दूकानात एक माल तर डूपलीकेट लेबल लावलेला माल मात्र गोडाऊनमध्ये ठेवून खरीप हंगामातील पेरणीसाठी सोयाबीन चे बी-बियाणे, खते खरेदीसाठी शेतकऱ्यां ची बाजारात धावपळ सुरू आहे.याचाच फायदा घेत स्थानिकचे काही व्यापारी चढ्या दराने खते,बियाणा ची विक्री करीत आहेत, अशा कृषीसेवा केंद्रधारकां वर कृषी विभागातील अधिकाऱ्यांनी तत्काळ निर्बंध लादण्याची मागणी नरसीसह परिसरातील अनेक गावातील शेतकऱ्यांच्या गोटातून मागणी होत अस ल्याचे ऐकावयास मिळत आहे.

कृषी विभागाकडून कृषी सेवा केंद्रावर प्रत्येक बि बियाणांचे भाव फलक दूकानातील दर्शनी भागात लावणे बंधनकारक असताना ते देखील सध्या कोणत्या ही सेवा केंद्रात कुठेही दिसून येत नाही. कृषी विभागा कडूनही या संदर्भात जनजागृती करण्यात येतनाही जिल्ह्यातील कृषी विभागाकडून 'उंटावर बसून शेळ्या हाकण्या चा प्रकार' सुरू असून, सध्या तालुक्यातील सेवा केंद्रातील व्यापाऱ्यांना पाठीशी घालण्यासारखा असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

नायगांव तालुक्यातील पंचायत समिती स्तरा वरील कृषी विभागही यापासून अनभिज्ञ आहे. कृषी व महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी बोगस बियाणे,खते चढ्या दराने विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यां वर कडक कार्यवाही करावी. कृत्रिम टंचाई करून वाढीव दराने खते, बी-बियाणे विक्रीकरणाऱ्या कृषी सेवा केंद्रांवर तत्काळ कार्यवाही करावी, बोगस खते व बी-बियाणे विक्री करणाऱ्या व उत्पादन करणाऱ्या कारखान्यांचे परवाने रद्द करून त्यांच्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. यावेळी नरसी पासुन हाकेच्या अंतरावरील होटाळा येथील संभाजी पाटील जाधव, संजय महाराज बन,केदरवडगांव येथील प्रल्हाद पाटील, सुभाष आनंदराव कदम मनोहर कदम ,बालाजी बोडके, संभाजी सुर्यवंशीसह, आदी शेतकऱ्यांकडून मागणी होत आहे.

# माहूर बस स्थानकाच्या जागेत व्यापारी संकुल उभारणीचा मार्ग मोकळा

**तभा वृतसेवा**
**माहुर, दि. २२ मे-**

येथील बसस्थानकाच्या जागेत बीओटी तत्त्वावर व्यापारी संकुल उभारण्यासाठी मंजुरी देऊन निधी उपलब्ध करण्याची मागणी आमदार भीमराव रामजी केराम यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या कडे पत्राद्वारे केली होती. या पत्राची तातडीने दखल घेण्यात आली असून, वास्तु शास्तज्ञ, बांधकाम खाते,राज्य परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय मुंबई यांनी विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, नांदेड यांना पत्र पाठवून तात्काळ माहूर बसस्थानकाच्या समोरील जागेत शॉपिंग कॉम्प्लेक्स ( व्यापारी संकुल) उभारणीसाठी परिस्थितीजन्य माहिती सादर करण्याचे आदेशीत केल्याने माहूर बसस्थानक परिसरात आता लवकरच व्यापारी संकुल उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे.





राज्यातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक प्रसिद्ध तिर्थक्षेत्र फक्त एवढीच श्री क्षेत्र माहूरची ओळख आणि जमेची बाजू बाकी उद्योगधंद्यांच्या बाबतीत ठणठणगोपाल अशी विसंगती परिस्थिती असल्याचे दिसून येते. लोकसभा आणि विधानसभा उमेदवार निवडीच्या बाबतीत माहूर-किनवट तालुक्यात मागील काळात राजकीय विसंगतीमुळे या ना त्या कारणाने अस्थिरतेची परिस्थिती जाणवत होती. परिणामी प्रचंड बेरोजगारीची समस्या भेडसावत असतानाही याठिकाणी उद्योगधंद्यांना चालना देण्यासाठी आजपर्यंत एमआयडीसी उभी राहिली नाही. साखर कारखाना, सुतगिरणी असे कोणतेही मोठे उद्योग सुरू करण्यात आले नाही. परिणामी, तालुक्यातील बेरोजगार युवा वर्गाला रोजगार मिळवण्यासाठी नाईलाजाने परराज्याचा मार्ग धरावा लागत आहे. या गंभीर बाबीची जाणीव झाल्यावर तालुक्यातील बेरोजगारांना तालुक्यातच रोजगार उपलब्ध व्हावा या उदात्त हेतूने माहूरच्या बस स्थानकाच्या जागेत शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारावे यासाठी आमदार भीमराव केराम यांनी राज्य परिवहन महामंडळाकडे पत्राद्वारे मागणी केली होती.या विषयाची तातडीने दखल घेऊन एसटी महामंडळ विभागाचे वास्तु शास्त्रज्ञ यांनी नांदेडचे विभाग नियंत्रक च.ना.वडचकर यांना शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारणी बाबत तात्काळ विहित नमुन्यात माहिती सादर करण्याचे आदेशित केल्याने आता माहूरच्या बस स्थानकाच्या समोरील जागेत शॉपिंग कॉम्प्रेस व्यापारी संकुल उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

विशेष उल्लेखनीय म्हणजे,आमदार भीमराव केराम हे विकासकामांसह बेरोजगारी,शेती आणि इतर कुठल्याही समस्यांबाबत नागरिकांनी मागणी केल्यास त्या मागणीसंदर्भात तातडीने दखल घेतात,याची प्रचिती वारंवार आल्यानेच जनता जनार्दनाने त्यांना सलग दुसऱ्यांदा किनवट- माहूरचे आमदार म्हणून निवडून दिले आहे. आणि त्यांनीही या मतदानरुपी मणभर ऋणाची कणभर परतफेड म्हणून मतदारसंघात कोट्यवधींची विविध विकास कामे खेचून आणत ती प्रत्यक्षात उतरवण्याचा जणू धुमधडाका लावला असल्याचे त्यांनी केलेल्या व सूरु असलेल्या विविध विकास कामांकडे पाहील्यास दिसून येत आहे. जी भविष्यात विकासाचा हिमालय ठरणार आहेत. जनता जनार्दनाशी असलेला भावनिक ऋणानुबंध आताही त्यांनी मोठ्या मनाने व कर्तव्यभावनेने जोपासला असून, बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणून माहूर बसस्थानक परिसरात शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारणीसाठी सातत्याने पाठपुरावा करत व्यापारी संकुल उभारण्याचा मार्ग मोकळा केला आहे. या नजरेत भरणाऱ्या कार्यामुळे आ.केराम यांचेवर बेरोजगार नागरिकांमधून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

याकामी भाजपाचे रुग्ण कल्याण समिती सदस्य अनिल वाघमारे यांनीही सातत्याने पाठपुरावा केला आहे.विभाग नियंत्रक च.ना. वडचकर, आगारप्रमुख विश्वनाथ चिबडे, बस स्थानक प्रमुख वसंत जावळे हे तात्काळ माहिती सादर करतीलच जेणेकरून शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारणीचा भूमिपूजन सोहळा लवकरच पार पडेल अशी अपेक्षा मागणी करणाऱ्या पदाधिकाऱ्यांसह, बेरोजगार नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# महसूल प्रशासनाची अवैध वाळू तस्करांवरती धडक कारवाई

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २२ मे-**

हदगाव तालुक्यातील अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या माफियांविरोधात धडक कारवाई करण्याची मोहीम राबवली गेली असून उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशान्वये व तहसीलदार श्रीमती सुरेखा नांदे यांच्या मार्गदर्शनानुसार एक पथक स्थापन करून १ हायवा व १ टिप्पर जप्त करून पुढील कारवाई साठी तहसील कार्यालयात लावण्यात आले असून यातील टिप्पर क्रमांक एम. एच .३०-ए.बी.४६७६ चे चालक -मालक यांनी संगणमत करून पळवून घेऊन गेले असता त्यांच्यावर पोलीस स्टेशन हदगाव अंतर्गत गुन्हा दाखल झाल्याची माहिती महसूल प्रशासनाच्या वतीने कळविण्यात आली असून या कारवाईमुळे वाळू माफियांमध्ये खळबळ उडाली आहे.

अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या माफिया विरोधात पथक स्थापन झाल्यानंतर सदर पथकाने दि. १६ मे रोजी हदगाव - तामसा रोडवर रात्रीच्या वेळेस हायवात अंदाजे ५ ब्रास व दि.१९ मे रोजी राठी चौक हदगाव येथे १.५ ब्रास अवैध वाळू वाहतूक करतांनी पथकास आढळून आले असता तहसील कार्यालय येथे पुढील कारवाई करण्यास सदरील वाहने लावण्यात आले तर चेंडकापूर ता. हदगाव येथे तीन तराफे जाळून टाकण्यात आले. कोथळा येथे २५ ब्रास वाळू जप्त करण्यात आले तर मागील पंधरा दिवसांपूर्वी २३४ ब्रास वाळू साठा जप्त करून शासनाच्या ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी उपविभागीय अधिकारी हदगाव यांना सादर करण्यात आल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांचा दौरा कार्यक्रम

**परभणी,/प्रतिनिधी:** महाराष्ट्र विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे हे दि. २३ मे २०२५ रोजी परभणी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौऱ्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे. शुक्रवार दि. २३ मे रोजी दुपारी १२.३० वा नांदेड येथून शासकीय विश्रामगृह, परभणी येथे आगमन व राखीव. दु. १.३० वा. प्रमोद वाकोडकर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट. दु. २.०० वा. शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) जिल्हा प्रमुख पदाधिकारी व लोकप्रतिनिधी चर्चा व भेट (स्थळ-शासकीय विश्रामगृह, परभणी). दुपारी ४.०० वा. छत्रपती संभाजीनगरकडे मोटारीने प्रयाण

### आकाशात वीज चमकतेय... घ्या काळजी

**परभणी,/प्रतिनिधी-** पावसाळ्याच्या काळात आकाशात अचानक वीज चमकू लागते आणि काही क्षणात जोरदार कडकडाटासह वीज कोसळते. ही एक नैसर्गिक आपत्ती असली तरी योग्य सावधगिरी बाळगली, तर आपला जीव वाचवता येतो. ग्रामीण भागातील शेतकरी, मच्छीमार, तसेच जंगलात काम करणारे लोक यांना याचा विशेष धोका असतो. त्यामुळे वीज पडताना कोणती खबरदारी घ्यावी आणि काय टाळावे, हे जाणून घेणे अत्यंत गरजेचे आहे. ''पावसाळ्यात विजा चमकणे व वीज कोसळणे या नैसर्गिक घटना सामान्य असल्या तरी त्यातून गंभीर अपघात व जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः ग्रामीण भागातील शेतकरी, कामगार, मच्छीमार, जंगलात व मैदानी भागात काम करणारे नागरिक या धोक्याला अधिकतर सामोरे जातात. मात्र, योग्य काळजी घेतल्यास जीवितहानी टाळता येते. नागरिकांनी पावसाळ्याच्या दिवसांत अधिक सतर्क राहावे - जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे''

**आकाशातून कोसळणाऱ्या विजेपासून स्वतः चे रक्षण करण्यासाठी खालील दक्षता घ्यावी.**

हे करा - शेतात काम करीत असताना शेताजवळील घराचा त्वरित आसरा घ्या. विद्युत उपकरणे बंद ठेवा. शक्य असेल तर पायाखाली लाकूड, प्लास्टीक, गोणपाट अशा वस्तू, अथवा कोरडा पालापाचोळा ठेवा. दोन्ही पाय एकत्र करुन गुडघ्यावर दोन्ही हात ठेवून डोके जमिनीकडे झुकवा, तथापि डोके जमिनीवर ठेऊ नका. ओल्या शेतात अथवा तलावात काम करणाऱ्या व्यक्तींनी तात्काळ कोरड्या व सुरक्षित ठिकाणी जावे, पोहणारे, मच्छिमारी करणारे यांनी तात्काळ पाण्यातून बाहेर यावे. झाडाच्या उंचीपेक्षा झाडापासून दुप्पट अंतरावर उभे रहा. एखादे उंच झाड सुरक्षित ठेवायचे असल्यास उंच वृक्षाच्या खोड अथवा फांदीवर तांब्याची एक तार बांधून तिचे दुसरे टोक जमिनीत खोलवर गाडून ठेवावे, म्हणजे हे झाड सुरक्षित होईल. वीजवाहक वस्तूंपासून दूर रहा. उदा. रेडीयटर, स्टोव्ह, मेटल, लोखंडी पाईप, टेलिफोनचे खांब, विजेचे खांब, टेलिफोन टॉवर यांपासून दूर रहा. मजबूत असलेले पक्के घर हे सर्वात सुरक्षित ठिकाण आहे. जंगलात असाल तर कमी उंचीच्या व दाट झाडांचा आसरा घ्या. वृक्ष, दलदलीची ठिकाणे तथा पाण्याचे स्त्रोत यापासून शक्यतो दूर रहा. तथापि मोकळ्या आकाशाखाली असण्यापेक्षा लहान झाडाखाली आसरा घेणे चांगले मोकळ्या आकाशाखाली राहणे आवश्यकच असेल तर खोलगट ठिकाणी रहा.

हे टाळा - विजेच्या खांबाजवळ उभे राहू नका. झाडाखाली उभे राहू नका. उंच जागेवर, झाडावर चढू नका. पाण्याचे नळ, फ्रिज, टेलिफोन यांना स्पर्श करु नका. धातूंच्या वस्तूंपासून दूर रहा. प्लग जोडलेली विद्युत उपकरणे हाताळू नका. दूरध्वनीचा वापर करु नका. गाव, शेत, आवार, बागबगीचा आणि घर यांच्या भोवती तारेचे कुंपन घालू नका. कारण ते विजेला सहजतेने आकर्षित करते. दोन चाकी वाहन, सायकल, ट्रक, ट्रॅक्टर, नौका यांवर असाल तर तात्काळ उतरुन सुरक्षित ठिकाणी जा. अशावेळी वाहनातून प्रवास करु नका. वाहनाच्या बाहेर थांबणे आवश्यक असल्यास धातूचे कोणतेही उपकरण हातात बाळगू नका. एकाच वेळी जास्त व्यक्तींनी एकत्र राहू नका. दोन व्यक्तींमधील अंतर किमान १५ फूट असेल असे रहा. धातूची दांडी असलेल्या छत्रीचा उपयोग करु नका.

**संकलन जिल्हा माहिती कार्यालय, परभणी**

### गोमातेची चोरी करणाऱ्या टोळीविरुध्द कारवाई करा

अन्यथा आमरण उपोषण करु : गोसेवकांद्वारे इशारा

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील वृंदावन कॉलनी व उघडा महादेव परिसरातून गोमातेची चोरी करणाऱ्या टोळीविरुध्द कारवाई करावी अन्यथा २८ मे पासून आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा गोसेवकांनी दिला आहे.

गोसेवक भीमराव लिंबाजी एंगडे, निवृत्ती सोपान साळवे, आरती अनिल वाघ, गोसेवक मारोतराव खटींग, शिवाजीराव घुले, कृष्णकुमार रसाळ यांनी बुधवार २१ मे रोजी जिल्हाधिकाऱ्यांना एक तपशीलवार निवेदन सादर केले. त्याद्वारे, शहरातील उघडा महादेव परिसरातून गोसेवक भीमराव एंगडे यांच्या मालकीची एक गाय व दोन वर्षाची कालवड, निवृत्ती साबळे यांची एक गाय व आरती वाघ यांच्या तीन गायी व एक गोरा चोरीला गेल्याबाबत १६ मे रोजी नवा मोंढा पोलिस ठाण्यात तक्रार देण्यात आली. परंतु, तक्रार देवून पाच दिवस उलटले तरीदेखील नवा मोंढा पोलिसांद्वारे अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. ज्या परिसरातून गायी चोरी झाल्या आहेत. त्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आलेले आहेत. या सीसीटीव्हीमध्ये गायी चोरी करणारी टोळी सक्रिय दिसत आहे. शहरात वेगवेगळ्या ठिकाणीही हे चोरीचे प्रकरण सुरुच आहे. तरीदेखील दखल घेतली जात नाही, अशी खंत या निवेदनाद्वारे गोसेवकांनी व्यक्त केली आहे.

येत्या सात दिवसांच्या आत या टोळीविरुध्द गुन्हा दाखल करुन कारवाई करावी व आमचे पशूधन आम्हाला परत मिळवून द्यावे, अन्यथा २८ मे पासून आमरण उपोषण करण्यात येईल, अशा इशारा या गोसेवकांनी दिला आहे.

### परभणीत रिमझिम पाऊस

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील असंख्य भागात गुरुवार दि.२२ मे रोजी दुपारपासून रिमझिम अशा पावसाचे आगमन सुरु झाले होते. तसेच येत्या काही दिवसांत अशाच प्रकारचे वातवावरण राहणार असून या वातावरणा सामान्य नागरिकांनी अवकाळी वारे, वीजा यापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी प्रशासनाने दिलेल्या सर्व नियमांचे पालन करण्याचे आवाहन केलेआहे.

तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

दैनिक वेबसाईट सोशल मिडिया

छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी

खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

९४ २३३२४६६६५. ९२८४६६४४३०. ९२८४६९५५८३

# मोबाईल शॉपी तोडून लाखो रुपयांचा मुद्देमाल केला लंपास

## परभणी- वसमत रस्त्यावरील घटना, चोरटे सीसीटीव्हीत कैद

**परभणी,/प्रतिनिधी-** मोबाईल शॉपी फोडून लाखो रूपयांचा मुद्देमाल लंपास वसमत रस्त्यावरील घटना : एसएस मोबाईल शॉपी : नवा मोंढा पोलिसांसमोर तपासाचे आव्हान आहे.

दरम्यान वसमत रस्त्यावरील एसएस या मोबाईल शॉपीचे अज्ञात चोरट्यांनी बुधवारी रात्री ते गुरूवारी पहाटेदरम्यान शटर तोडून शोरुममधील मोबाईल्स व इतर इलेक्ट्रॉनिक साहित्य असा एकूण सुमारे ५० लाखांपेक्षा अधिक रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना उघडकीस आली. दरम्यान, भर रस्त्यावरील ही शॉपी एका टोळीने लुटल्याने नवा मोंढा पोलिसांसमोर तपासाचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

बुधवारी रात्री एसएस मोबाईल शॉप धारकाने दररोज प्रमाणेच रात्री साडेदहाच्या सुमारास आपले संपूर्ण व्यवहार आटोपून शॉपी बंद केली. परंतु, गुरुवारी सकाळी शॉपीचे शटर तोडल्याची माहिती दुकानमालकास कळाली. तात्काळ धाव घेवून दुकान मालकाने नवा मोंढा पोलिसांना या घटनेबाबत माहिती दिली तेव्हा पोलिस अधिकारी घटनास्थळी धावून आले. नवा मोंढा पोलिसांचे पथक पाठोपाठ स्थानिक गुन्हा शाखेचे पोलिस निरिक्षक विवेकानंद पाटील यांच्या नेतृत्वाखालील पथकाने तपास सुरु केला. श्वान पथकास पाचारण केले. घटनास्थळावरील ठशांचे नमूने गोळा केले. तसेच चोरी करण्याच्या पध्दतीचा अंदाज घेतला. तेव्हा पोलिसांना या जबरी चोरीत एक दोनजण नव्हे तर किमान पाच ते सहा चोरटे असावेत, असा अंदाज आला. या चोरट्यांनी वसमत रस्त्याच्या बाजूने शॉपीचे असणारे मुख्य शटर मूळापासून तोडल्याचे निदर्शनास आल्यानंतर पोलिसांनी ते शटर मूळापासून कसे उखडले असावे, या गोष्टीचाही अंदाज घेतला.

संबंधित चोरट्यांनी या शटरच्या हॅन्डलला हुक अडकवून एखाद्या वाहनाच्या सहाय्याने ते शटर वर उखडले असावे, असे निदर्शनास आले. कारण त्या शटरचे लॉक व पट्टी किमान १ फ ुट खोलवर होती. हुक व प्रेशरमुळे हे शटर पूर्णतः उखडून वर आले. त्यानंतर चोरट्यांनी शिवराम नगरकडे जाणाऱ्या रस्त्यावरील या शॉपीचे दुसरे छोटे शटर उचलून आत प्रवेश केला व शॉपीमधील किमती मोबाईल, ईलेक्ट्रॉनिक वस्तू वगैरे अन्य साहित्य पोत्यानिशी एका वाहनाद्वारे लंपास केले. या चोरीत एक पिकअप व्हॅन चोरट्यांनी वापरली असावी, असा अंदाज आहे.

### सीसीटीव्हीत तीन चोरटे कैद....

**या शॉपीवरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये तीन चोरट्यांचे चेहरे कैद झाले असल्याची माहिती हाती आली आहे. पोलिसांनी या घटनेबाबत सायंकाळी उशीरापर्यंत कोणतीही अधिकृत माहिती दिली नाही. परंतु, अंदाजे चोरट्यांची संख्या ६ ते ७ असावी, असा अंदाज आहे. हे सर्व चोरटे चेहरे ओळखू येवू नयेत म्हणून बुरखा घालून आले होते. परंतु, तीघाजणांचे बुरखे निघाल्यामुळे त्यांचे चेहरे सीसीटीव्हीत कैद झाल्याची अनाधिकृत माहिती आहे.**

### अन्य ठिकाणीही चोरी...

**शिवराम नगर भागात एका निवासस्थानातून अज्ञात चोरट्यांनी कुलूप तोडून सोन्या-चांदीचे दागिणे लंपास केल्याची माहिती हाती आली आहे. तर याच भागात एका एटीएम मशीनवरसुध्दा चोरट्यांनी डल्ला मारण्याचा प्रयत्न केला, असेही निदर्शनास आले आहे. परंतु पोलिसांनी या बाबत कोणतीही माहिती दिली नाही.**

### पिक कर्जाचे पुनर्गठन करून पेरणीसाठी अर्थसहाय्य करा

स्वाभिमानी शेतकरी संघटनेची मागणी : जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**परभणी,/प्रतिनिधी :** पिक कर्जाचे पुनर्गठन करून शेतकऱ्यांना पेरणीसाठी अर्थ सहाय्य करावे, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

किशोर ढगे, रामप्रसाद गमे, गजानन तुरे, दिगंबर पवार, मुंजा लोडे, माऊली शिंदे, राम दुधाटे, माऊली दुधाते, किशन शिंदे, हनुमान गरुड, विकास भोपळे, गजानन दुगाने, उद्धव जवंजाळ आदींच्या एका शिष्टमंडळाने बुधवार २१ मे रोजी जिल्हा प्रशासनास या मागणी संदर्भात निवेदन सादर केले. त्याद्वारे, परभणी जिल्ह्यातील शेतकरी खरीप पेरणीसाठी तयारीला लागला असतांना पेरणीसाठी लागणारा खर्च, त्यासाठी लागणारे भाग भांडवल त्यांच्याकडे नाही. याचे मुख्य कारण म्हणजे सोयाबीन, कापुस या पिकांतून उत्पादन खर्च भरून निघत नाही, त्यामुळे आज शेतकऱ्यांजवळ पेरणीला पैसे नाहीत.

### खरीप हंगाम पेरणीसाठी मुबलक बियाणे- जिल्हाधिकारी गावडे

**परभणी,/प्रतिनिधी:** जिल्ह्यात खरीप हंगामासाठी मुबलक प्रमाणात बियाणे उपलब्ध आहेत. तरी बियाणे खरेदी करताना शेतकऱ्यांनी दक्षता घ्यावी. बियाणे खरेदी करताना भेसळयुक्त बियाणे खरेदी टाळण्यासाठी अधिकृत विक्रेते यांच्याकडून पावतीसह बियाणे खरेदी करा. अनोळखी व्यक्ती / दलाल यांच्यापासून सावध रहा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दौलत चव्हाण यांनी केले आहे.



परभणी जिल्ह्यामध्ये खरीप हंगाम २०२५-२६ साठी ५,५६,९५२ हे. क्षेत्रावर पिक पेरणीचे नियोजन करण्यात आलेले आहे. मुख्यत्वे सोयाबीन व कापूस पिकाचे प्रमुख क्षेत्र आहे. त्यामध्ये सोयाबीन पिकाखाली २,६६,८६० हे. साठी २,००,१४५ क्विंटल बियाण्यांची गरज आहे. तसेच कापूस पिकाखाली २,०७,८८५ हे. क्षेत्रासाठी ११,४३,३६८ पाकीटांची गरज आहे. परभणी जिल्ह्यामध्ये बियाणे मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत.

तरी बियाणे खरेदी करताना भेसळयुक्त बियाणे खरेदी टाळण्यासाठी अधिकृत विक्रेते यांचेकडून पावतीसह बियाणे खरेदी करावे. पावतीवर बियाण्यांचा संपूर्ण तपशील जसे की, पिक, वाण, दर्जा, लॉट नंबर, कंपनीचे नाव, किंमत, खरेदीदाराचे संपूर्ण नाव व पत्ता, विक्रेते त्यांचे नाव इत्यादी नमूद असावे. बियाण्याची पिशवी, टॅग, खरेदी पावती व त्यातील थोडे बियाणे पिकाची कापणी होईपर्यंत जपून ठेवावे. भेसळीची शंका दूर करण्यासाठी पाकीट सीलबंद/मोहोर बंद असल्याची खात्री करावी. कापूस बियाण्याच्या अनुषंगाने एच.टी.बी.टी.ची खरेदी कोणत्याही अनोळखी व्यक्ती / दलाल/ कृषी केंद चालक यांच्याकडून केली जाणार नाही याची काळजी घेण्यात यावी, तसेच कापूस बियाण्याची कोणत्याही विशिष्ट वाणाची मागणी न करता बाजारपेठेत उपलब्ध असलेल्या सरस वाणामधून बियाणे निवडून त्याची लागवड करावी.

शेतकऱ्यांना दर्जेदार निविष्ठा रास्त भावात योग्य वेळी योग्य किंमतीत मागणीप्रमाणे मिळण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरावर एक व तालुका स्तरावर ९ असे एकूण १० भरारी पथके स्थापन करण्यात आलेली आहेत. तरी निविष्ठा खरेदीच्या अनुषंगाने काही तक्रार / अडचण असल्यास आपल्या तालुक्यातील कृषि अधिकारी, पंचायत समिती व संबंधीत तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन श्री. चव्हाण यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.

### मान्सुन पूर्व शेती कामास आला वेग

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरासह जिल्हयातील मान्सुन पूर्व शेतीच्या कामास शेतकरी लागला असून आता मोठया प्रमाणात शेतकरी शेतातील कामामध्ये मग्न असल्याचे चित्र दिसून येत आहे. यावर्षी मान्सुन लवकर दाखल होणार असल्याकारणामुळे शेतकरी आपल्या मशागतीच्या कामात पूर्णपणे मग्न असल्याचे दिसून येत आहे. शिवाय लवकरच पेरणीसाठीचे बियाणे खरेदी देखील होणार असल्याचे दिसते आहे.

### १ जून रोजी परभणीत शिवदिक्षा संस्कार व सत्संग सोहळा

वीरशैव लिंगायत समाजाच्यावतीने आयोजन : पुजेसाठी नोंदणी करण्याचे आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील वीरशैव लिंगायत समाज व श्री जगद्गुरु पलसिध्द महाकालेश्वर मंदिर ग्रुप परभणीच्या वतीने रविवार १ जून रोजी परभणीत शिवदिक्षा संस्कार (गुरुमंत्र) व सत्संग सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री.प.पु.१०८ सद्गुरु सिध्दलिंग शिवाचार्य महाराज साखरखेर्डेकर यांच्या मार्गदर्शनाखाली व श्री.ष.ब्र.१०८ वेदांताचार्य शिवाचार्यरत्न सद्गुरु श्री सिध्दलिंग महाराज आणि ष.ब्र.१०८ सद्गुरु सिध्दचैतन्य शिवाचार्य महाराज यांच्या दिव्य सानिध्यात रविवार १ जून रोजी सकाळी १० वाजता नांदखेडा रस्त्यावरील श्री पलसिध्द महाकालेश्वर मंदिरात या सोहळ्याचे आयोजन आले आहे. या सोहळ्यात पुजेकरीता नोंदणी करावी, नोंदणीसाठी बापुस्वामी इटोलीकर (मो. ९०४९५६५७२१), संदिप काशिनाथस्वामी पोत्रेकर (मो.९९६०४१९९५८), रवि स्वामी जिंतुरकर (मो. ९७६३१५३६१५), श्री. बंडु पाचलिंग (बॉस) (मो. ९४२२१७५५९५), श्री. नागनाथ आप्पा डोंगरे (मो. ९४२१३८७०९१), श्री. शिवलिंग आप्पा खापरे (मो.९४२२८७५६१४), श्री. दत्ता स्वामी मठपती (मो.८००७९३१८१९) यांच्याशी संपर्क साधवा, असे आवाहन आयोजक वीरशैव लिंगायत समाज परभणी व श्री जगद्गुरु पलसिध्द महाकालेश्वर मंदिर ग्रुप परभणी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## आर.पी.हॉस्पिटलमध्ये परभणी जिल्हयातील ऱ्हदयावरील पहिली रोटा शस्त्रक्रिया यशस्वी



**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी येथील आर. पी. हॉस्पिटलने वैद्यकीय क्षेत्रात आणखी एक ऐतिहासिक कामगिरी केली आहे. जिल्ह्यात प्रथमच येथे रोटेशनल अथेरेक्टॉमी या तंत्रज्ञान चा वापर करून ७५ वर्षीय स्त्री च्या हृदयावरील अतंत्य अवघड अशी अँजिओप्लास्टी यशस्वीरित्या पार पाडली.

या प्रक्रियेसाठी अत्याधुनिक बोस्टन रोटा प्रो डिव्हाइसचा वापर करण्यात आला, जो या जिल्ह्यातील पहिलाच प्रयोग ठरला.

हे यश आमदार डॉ. राहुल पाटील यांच्या पुढाकारामुळे शक्य झाले. त्यांनी जागतिक दर्जाची पायाभूत सुविधा उपलब्ध करून परभणीतील रुग्णांना प्रगत वैद्यकीय सेवांचा लाभ मिळवून दिला आहे. तसेच, अधिष्ठाता डॉ. प्रमोद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व तज्ञांची एक मजबूत टीम तयार करण्यात आली, जी सर्व प्रकारच्या गंभीर रुग्णांचे यशस्वी उपचार करत आहे. या प्रयत्नांमुळे परभणी आणि परिसरातील रुग्णांना उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध झाल्या आहेत.

या यशस्वी प्रक्रियेत हॉस्पिटलमध्ये पूर्णवेळ कार्यरत असणारे हृदयरोग तज्ञ डॉ. दिपक कुबडे यांचे विशेष योगदान राहिले. त्यांच्यासोबत सहकारी म्हणून डॉ. सलाम तांबोळी आणि डॉ. दैठणकर वैद्यकीय आधिक्षक डॉ. अमीर तडवी, डॉ संतोष हारकळ, डॉ शहाजी बोडखे यांनीही मोलाची भूमिका बजावली. या तज्ञांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे ही प्रक्रिया यशस्वी झाली.

डॉ. दिपक कुबडे यांनी सांगितले की,रोटेशनल अथेरेक्टॉमी ही एक प्रगत वैद्यकीय प्रक्रिया आहे, जी हृदयाच्या रक्तवाहिन्यांमधील अडथळे (प्लाक) काढण्यासाठी वापरली जाते. ही प्रक्रिया विशेषतः ज्या रुग्णांच्या रक्तवाहिन्यांमध्ये कॅल्शियम जमा झाले आहे किंवा कठीण प्लाक तयार झाले आहे, अशा रुग्णांसाठी प्रभावी ठरते. यामुळे रक्तप्रवाह सुधारतो आणि हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका कमी होतो.स्वी शस्त्रक्रिये बदल बोलताना आ.डॉ. राहुल पाटील यांनी सांगितले की,'' आर. पी. हॉस्पिटलमध्ये रोटेशनल अथेरेक्टॉमी यशस्वी होणे हा आमच्या वैद्यकीय प्रगतीचा ऐतिहासिक क्षण आहे. स्थानिक रुग्णांना प्रगत उपचार मिळावेत, यासाठी आम्ही जागतिक दर्जाच्या सुविधा आणल्या. ही केवळ सुरुवात आहे; आम्ही परभणीला वैद्यकीय क्षेत्रात अग्रेसर ठेवण्यासाठी कटिबद्ध आहोत.''

परभणी मेडिकल कॉलेज व आर पी हॉस्पीटल चे अधिष्ठाता डॉ.शिंदे म्हणाले की,''रोटेशनल अथेरेक्टॉमी ही अत्याधुनिक प्रक्रिया आहे, जी जटिल हृदयरोगांवर प्रभावी उपचार करते. आर. पी. हॉस्पिटलच्या सुविधा आणि टीमवर्कमुळे हे यश शक्य झाले.

## संबोधी'च्यावतीने १ जून रोजी सर्वधर्मिय सामूहिक विवाह सोहळा

### विवाह सोहळ्याच्या नोंदणीस मोठा प्रतिसाद

**मोहन धारासूरकर**

**परभणी ,/प्रतिनिधी-** संबोधी अकादमीच्या वतीने रविवार १ जून रोजी सर्वधर्मिय सामुहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून या सोहळ्यास नोंदणीस मोठा प्रतिसाद मिळत आहे.

येथील महात्मा फ ुले विद्यालय येथे होणाऱ्या सामुहिक विवाह सोहळ्यास देश-विदेशातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. मंगल परिणय विधी पुज्य भदंत पय्याबोधी, नांदेड व भिक्खू संघ याच्या हस्ते संपन्न होणार आहे. या विवाह सोहळ्यात आजपर्यंत २५०० पेक्षा अधिक जोडपी विवाहबध्द झालेले आहेत. या विवाह सोहळ्यात सहभागी होणाऱ्या जोडप्यास महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत कन्यादान योजनेतंर्गत वीस हजारचे अनुदान मिळणार आहे. तसेच संबोधी अकादमीच्या वतीने वधू-वरांना शुभ्र वस्त्र, सर्वांना सुरुची भोजन, वाजंत्री आदी सुविधा मोफत दिल्या जाणार आहेत.



या विवाह सोहळ्यासाठी नोंदणीला प्रचंड प्रतिसाद मिळत असुन इच्छूकांनी २५ मे पर्यंत संबोधी अकादमी, महाराष्ट्र चे कार्यालय, गाळा क्रं. ६, सुपर मार्केट, कारेगाव रोड, परभणी येथे मो.क्र. ७७९८५४४७८६ यावर संपर्क करावा.वधु-वर नोंदणीसाठी मुलीचे वय १८ वर्ष पूर्ण तर मुलाचे वय २१ वर्ष पूर्ण असणे आवश्यक आहे. वयाचा पुरावा म्हणून टी.सी.,/ दहावीची सनद / जन्म प्रमाणपत्र यापैकी एक, चार पासपोर्ट फोटो, वधू किंवा वर यापैकी किमान एका जणाचे जातीचे प्रमाणपत्र, वधु-वराचे रहिवाशी प्रमाणपत्र नोंदणी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

अधिक माहितीसाठी अविनाश मालसमिंदर-७७९८५४४७८६, यांच्याशी संपर्क करावा, तसेच सोहळ्यात जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन विवाह सोहळ्याचे आयोजक संबोधी अकादमीचे अध्यक्ष समाजभूषण डॉ. भीमराव हत्तीअंबीरे, भगवानराव जगताप, डॉ. अरविंद सावते, शेषराव जल्हारे, सिध्दार्थ भराडे, गौतम साळवे, भीमराव पतंगे, शशिकांत हत्तीअंबीरे, बबन शिंदे, बाळासाहेब अंभिरे, डॉ. लक्ष्मण कांबळे, मुरलीधर ढेंबरे, ॲड. सुनिल बगाटे, बाळासाहेब किर्तने, विश्वनाथ डबडे, दि.फ. लोंढे, नवनाथ पैठणे, माधव मोते, गौतम कठाळे, राजेश चांदणे, एल.आर. कांबळे, भीमराव धबाले, राजेश पंडीत, बाबासाहेब भराडे, संतोष भराडे, संभाजी खिल्लारे, गंगाधर परसोडे, धनंजय रणविर, सोनाजी लांडगे, बाबासाहेब भुजावळे, दिपक जाधव, हेमंत घुगे, साहेबराव ढगे, उत्तम साळवे, अरुण पंचांगे, एकनाथ खंदारे, डॉ. नामदेव मुळे, प्रभाकर कांबळे, भीमराव श्रीखंडे, बंडू नरवाडे, सुर्यकांत उजगरे, सुरेश मगरे, बाबुराव गवळी, रोहिदास साखरे, गोमाजी श्रावणे, पवन कांडलीकर यांनी केले आहे.

# ६०६ कर्मचारी बदलीसाठी पात्र
# पोलिस अधीक्षकांनी पारदर्शकपणे केली खांदेपालट

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ मे**

मागच्या अनेक वर्षांपासून भैय्या,अण्णा,काका,दादाच्या आशीर्वादाने खुर्चीवर चिकटून बसलेले पोलीस कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या अखेर नवनीत कॉवत यांनी गुरुवारी (दि.२२) बदल्या केल्या आहेत. आजपर्यंत इतिहासात पहिल्यांदाच कोणत्याही वशिलेबाजी अथवा पैशांचा घोडेबाजार न भरविता तब्बल ६०६ कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्यात.एसपींनी बदल्यांसाठी राबविलेला पारदर्शी कारभार जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरला असून अनेकांना यामुळे मात्र धक्का बसला आहे.

पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी स्वतः बदल्यांमध्ये लक्ष घालून कालावधीपूर्ण झालेले आणि निकषात बसणाऱ्या कर्मचारी आणि सहाय्यक फौजदारांना बदलीपासून संरक्षण मिळणार नसल्याचे आधीच जाहीर केले होते.अनेक पोलीस कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी तरीही स्वतःची खुर्ची टिकविण्यासाठी आपल्या 'गॉडफादर'कडे धाव घेत एसपींना बदल्यांमध्ये झुकते माप देण्यासाठी सूचना करायला लावल्या.अगदी स्वतः नवनीत कॉवत यांनी बदल्यांसाठी अनेकांशी संवाद साधताना कर्मचाऱ्यांचे म्हणणेही ऐकून घेतले. पण



जे कर्मचारी दीर्घकाळापासून एकाच विभागात आणि शहरात कार्यरत होते त्यांना थेट दणका दिल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.पोलीस दलात पहिल्यांदाच ६०६ कर्मचाऱ्यांची थेट खांदेपालटच करण्यात आली असून एसपींनी स्वतः बदल्यांसाठी तीन दिवसांपासून वेळ दिला होता अशी माहिती आहे.ते कार्यालयात आले तरी त्यांचे सर्व लक्ष बदलीपात्र कर्मचाऱ्यांच्या बाबतीतच होते.नवनीत कॉवत यांनी बीड जिल्ह्यात पोलीस कर्मचाऱ्यांच्या बदल्यांमध्ये घालून दिलेल्या वस्तुपाठ सध्या जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरला असून एसपींना लोकप्रतिनिधींना देखील मी कोणाचेच चुकीचे ऐकणार नसल्याचा देखील या माध्यमातून संदेश दिल्याचे पाहायला मिळत आहे.

## जिल्हा हद्दीत ३ जूनपर्यंत ड्रोन कॅमेरा, मानवविरहीत यंत्र उडविण्यास मनाई

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ मे**

भारतीय सैन्याकडून पहलगाव येथील दहशतवादी हल्ल्याचे नंतर ऑपरेशन सिंदुर राबवुन पाकिस्तान मधील दहशतवाद्यांची ठिकाणे नष्ट करण्यात आलेली आहेत. यामुळे स्लीपर सेल सक्रिय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिकांचे सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून ड्रोन कॅमेरा, मानवविरहित यंत्र चालविण्यास, उडविण्यास मनाई करणेबाबत दिनांक १४ मे ते ३ जून २०२५ पर्यंत भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम १६३ लागू करणे बाबत राज्य गुप्तवार्ता विभाग मुंबई यांनी कळविले आहे.

सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेता नागरिकांचे सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून संपूर्ण बीड जिल्ह्यात दिनांक १४ मे २०२५ पासून ते ३ जून २०२५ पर्यंत तातडीचे परिस्थितीत, नमूद कालावधी करिता भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम १६३ (१)(३) अन्वये आदेश लागू करणेस विनंती करण्यात आली आहे. तरी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) मधील शक्तीचा वापर करून नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून बीड जिल्हा हद्दीत दि. १६ मे २०२५ ते ३ जून २०२५ या कालावधीत ड्रोन कॅमेरा, मानवरहीत यंत्र चालविण्यास किंवा उडविण्यास मनाई आदेश एकतर्फी पारीत करण्यात येत आहे, असे बीडचे अपर जिल्हादंडाधिकारी यांनी नमुद केले आहे.

## परिवहनेत्तर दुचाकी वाहनांसाठी नविन नोंदणी मालिका सुरू करण्यात येणार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ मे**

परिवहनेत्तर दुचाकी वाहनांसाठी नोंदणी मालिका MH23BM ही सद्यस्थितीत सुरु असून सदर मालिकेतील नोंदणी क्रमांकाचे वाटप संपत आलेले आहेत. त्या अनुषंगाने परिवहनेत्तर दुचाकी वाहनांसाठी MH23 BP 0001 ते 9999 ही मालिका दि.०३ जून२०२५ पासून सुरु करण्यात येईल.

ज्या वाहन धारकांना पसंतीचा नोंदणी क्रमांक घ्यावयाचा असेल त्यांनी आपला विहीत नमुन्यातील अर्ज, सदरील आकर्षक क्रमांकाला लागू असलेली फी च्या रकमेचा, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड यांच्या नावाचा धनादेश वा धनाकर्ष (Deamand Draft) व आपल्या ओळखपत्राच्या व आधार कार्डच्या साक्षांकीत प्रतीसह दि. २६ मे ते ०२ जून २०२५ रोजी दुपारी २.०० पर्यंत कॅश काऊंटर खिडकी क्र. ०२ वर जमा करावा. सदर मालिकेतील आकर्षक क्रमांकाचे वाटप महाराष्ट्र मोटार वाहन नियम व परिवहन आयुक्तांच्या परिपत्रकानुसार करण्यात येईल. तसेच एकाच आकर्षक क्रमांकासाठी एका पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झालेल्या अर्जाची नोटीस दि.०२ जून २०२५ रोजी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर दुपारी ०४.०० वाजता प्रसिध्द करण्यात येईल.दि. ०३ जून २०२५ रोजी एकापेक्षा जास्त अर्ज असलेल्या अर्जदारांनी दुपारी २.०० वाजेपर्यंत बंद लिफाफ्यामध्ये मुळ शुल्का व्यतिरिक्त अधिक रकमेचा धनादेश जमा केल्यानंतर त्याच दिवशी दुपारी ०३.०० वाजता लिलावाची विहित कार्यपध्दती अवलंबून नोंदणी क्रमांकाचे वाटप करण्यात येईल. तरी सर्व वाहन धारकांनी, नागरिकांनी याची नोंद घ्यावी असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केले आहे.

## न.प.ने गणेशपार भागात बांधकाम परवाने देताना भविष्यातील वाहतूक कोंडीचा विचार करावा

### नागरिकांची मुख्याधिकाऱ्याकडे निवेदनाद्वारे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२२ मे**

परळी शहरातील सर्वात जुना भाग असलेल्या गणेशपार भागात अगोदरच रस्ते अरुंद असुन यात नवीन बांधकाम करताना अगदी रस्त्याच्या कडेपर्यंत बांधकाम करण्यात येत असुन भविष्यातील वाहतुकीचा विचार करुन गणेशपार भागातील रस्त्यांच्या कडेला बांधकाम परवाने द्यावेत अशी मागणी या भागातील नागरिकांनी मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

गणेशपार हा परळीच्या गावभागातील महत्वपूर्ण असलेला भाग आहे. येथील गणेश मंदिर जवळ असलेल्या चौकात कायम गर्दी असते.जुना गावभाग असल्याने या भागात रस्ते अरुंद आहेत. कालांतराने वाढत जाणारी लोकसंख्या व वाहने यामुळे कायम वाहतूक कोंडी होत असते. तसेच सांडपाण्याचेही




प्रमाण वाढल्याने वारंवार नालीत कचरा अडकून पाणी रस्त्यावर येत असते.गणेश मंदिराजवळच सदर बाजार मशीद आहे.तसेच अनेक दुकाने असल्याकारणाने भविष्यातील मोठे रस्ते व नाल्या होणे गरजेचे आहे. परळी नगरपरिषदेने भविष्याचा विचार करून गणेशपार चौकात होणारे कुठलेही बांधकाम होताना व अनधिकृत बांधकामांना आळा घालावा वाहतुकीस अडथळे ठरतील असे बांधकाम परवाने देऊ नयेत अशी मागणी जी.एस.सौंदळे,अश्विन मोगरकर,शिवाजी देशमुख,बाळु फुले,विजय जोशी,शरद चव्हाण, तुकाराम धुमाळ,बालासाहेब गित्ते जयप्रकाश बियाणी,गणेश जोशी आदींनी केली आहे.

## पॉवरलुम भागातील रोहित्र झाडी,वेलीतुन मुक्त करा,शिवाजी पालाकुडतेवार यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२२ मे**

शहरातील पावरलुम भागातील रोहित्र आजुबाजुच्या झाडे,वेलींनी झाकुन गेले आहे.महावितरण व नगरपालिकेचे प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याने या झाडे,वेलींमध्ये विजप्रवाह उतरुन नागरीकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे.या रहित्राला झाडी,वेली व कचर्यापासुन मुक्त करावे अशी सामाजीक कार्यकर्ते शिवाजी पालाकुडतेवार यांनी केली आहे.

शहरातील पावरलुम भागात असलेल्या एकाच जागेवर लगत दोन रोहित्र आहेत.या रोहित्रावरुन पावरलुम,नाथ नगर,शिवाजी नगर,माणिकनगर या भागात



विजपुरवठा होतो.या दोन्ही रोहित्रांना सध्या झाडे व वेलींनी घेरले आहे.हे रोहित्र रस्त्यावर असल्याने या ठिकाणी कायमची रहदारी असते तर रोहित्राजवळ कचर्याचे ढिग साचले आहेत.याठिकाणी कुठलेही कुंपण नसल्याने मोकाट जनावरे,डुक्कर असे प्राणी रोहित्राजवळ येतात रोहित्रांभोवती झाडांचे जंगल बनले आहे तर वेली पोलवरुन वेली तारापर्यंत गेल्याने विजप्रवाह उतरुन जिवितास धोका निर्माण झाला आहे.या भागातील नागरीकांनी महावितरण व नगरपालिका प्रशासनास कळवुनही सदरील रोहित्र झाडांमधून मुक्त न केल्याने नागरीक जीव मुठीत धरुन वागत आहेत.सदरील रोहित्राला झाडी,वेली व कचर्यापासुन मुक्त करावे अशी मागणी सामाजीक कार्यकर्ते शिवाजी पालाकुडतेवार यांनी केली आहे.

# महापुरुषांच्या जयंती उत्सवात माणूस जोडण्याचे प्रयत्न व्हावेत ; मान्यवरांनी व्यक्त केल्या भावना

**महापुरुषांच्या डीजे मुक्तजयंतीचा संकल्प अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सव सोहळ्यास प्रारंभ**

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२२ मे**

महापुरुषांच्या जयंती मध्ये डीजेच्या तालावर कर्कश आवाजात नाचून तरुणाई बिघडवण्यापेक्षा वैचारिक आणि अध्यात्मिक विचार मंथनातून नवी पिढी घडवण्याचा संकल्प सिरसाळा पंचक्रोशीच्या वतीने साजरा करण्यात येणाऱ्या पुण्यश्लोक आहिल्यादेवी त्रिजन्मशताब्दी सोहळ्यात करण्यात आला. जात-धर्माच्या पलिकडे जाऊन माणूस घडविण्याचा प्रयत्न अशा जयंती महोत्सवातून व्हावा असा आशावादही यावेळी सर्व वक्त्यांनी व्यक्त केला.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सव सोहळ्याच्या निमित्ताने सिरसाळा पंचक्रोशीच्या वतीने पंचदिनी कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचा उद्घाटन सोहळा बुधवारी रेणुका माता मंदिर, सिरसाळा येथे पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीड जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती प्रभाकर वाघमोडे तर उद्घाटक म्हणून शेतकरी नेते अजय बुरांडे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून शेतकरी नेते अमर हबीब, डॉ. राजाराम मुंडे, बालासाहेब दोलताडे, व्यंकटेश चामणर, दिलीप आबा बिडकर, संतराम गडदे, बाबासाहेब काळे, पांडुरंग काळे, अशोक करे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमा मागील भूमिका स्पष्ट करताना संयोजक शामसुंदर महाराज सोन्नर म्हणाले की, महापुरुषांच्या जयंती मधून समाजाला काहीतरी दिशा मिळाली पाहिजे, परंतु आज आपण पाहतो आहोत की, कोणत्याही महापुरुषाची जयंती ही डीजेच्या दणदणाटात आणि नशेच्या धुंदीत पार पडते. यातून त्या महापुरुषांच्या विचाराचा जागर होण्याऐवजी त्यांच्या विचारांना तिलांजली दिल्याचे दिसून येते. म्हणूनच डीजे मुक्त जयंती साजरी करता येऊ शकते. याचा वस्तू पाठ घालून देण्यासाठी पुण्यश्लोक आहिल्यादेवी यांच्या त्रिजन्मशताब्दी सोहळ्या निमित्ताने हे वैचारिक जागरण मांडले आहे. या कीर्तन महोत्सवातून मोक्षमुक्तीचा विचार दिला जाणार नाही तर संतांनी आणि महामानवाने मांडलेल्या मानवतेचा विचार



मांडला जाईल. जात धर्माच्या पलीकडे जाऊन माणूस आपण एक झालं पाहिजे. यासाठी हा सोहळा आहे असे शामसुंदर महाराज म्हणाले.

शेतकरी नेते अमर हबीब यांनी या वेळेला शेतकरी नेमका कोणत्या कारणाने अडचणीत आहे याची माहिती दिली. कोणतेही नैसर्गिक संकट आलं की पहिला शेतकरी भरडला जातो. शेतकरी दुबळा आहे आणि त्याला जास्तीत जास्त दुबळ्या ठेवण्याचे काम इथले शासन व्यवस्था करते आहे असेही ते म्हणाले. यावेळी बोलताना उद्घाटक अजय बुरांडे म्हणाले की, या कार्यक्रमातून सध्या समाजामध्ये जात, धर्म यावरून जी दरी निर्माण झाली आहे, ती दरी सांधण्याचा प्रयत्न केला जाईल. कान्नापूर येथील शेतकरी कीर्तन महोत्सव, सिरसाळ्याचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या त्रिजन्मशताब्दी सोहळ्याचा उत्सव हा माणूस जोडण्याचा प्रयत्न आहे, यातून समाजात सकारात्मक बदल घडतील असा अशावाद बुरांडे यांनी व्यक्त केला.

अध्यक्षस्थानावरून बोलताना प्रभाकर वाघमोडे म्हणाले की, सध्या महापूरुषांच्या जयंत्यामधून चांगले विचार समाजात रुजविण्या ऐवजी बहुतांशी तरुणाई बिघडत आहे. कोणत्या तरी नेत्याकडून देणगी आणायची, डीजे लावायचा त्यातून तरुणाई बिघडत आहे. शामसुंदर महाराज सोन्नर यांनी डीजे मुक्त आणि वैचारिक मंथन करणारी जयंती कशी साजरी करता येईल याचा उत्तम वस्तूपाठ घालून दिला आहे. यावेळी डॉ. राजाराम मुंडे, बाबूराव रुपनर यांचीही भाषणे झाली. देवराव काळे, सतीश काळे, व्यंकटेश काळे, गोरख काळे, सुधाकर काळे, अशोक गलांडे, मुंजाभाऊ होनमाने, शिवाजी काळे, नितेश काळे आदींनी सिरसाळावासियांच्या वतीने सर्वांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्र संचालन बंडू खांडेकर यांनी तर मुन्ना काळे यांनी आभार मानले. यावेळी तुकाराम येवले, बबनराव सरोदे, विशाल देवकते, रत्नाकर देवकते, चंद्रकांत देवकते, अशोक देवकते आदी मान्यवर उपस्थित होते.

## AHTU बीड, पथकाने रोखले एकत्र होणारे दोन बालविवाह

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ मे**

२२.५ .२०२५ रोजी, पोलीस स्टेशन बीड ग्रामीण हद्दीत पांगरबावडी या गावी सखाराम मोगलाजी संकोड, व गंगाराम गंगाधर अनारसे यांचे घरी एकत्र दोन बालविवाह होत असल्याचे गोपनीय माहिती ATHU पथकास मिळाली होती,त्या नुसार AHTU पथकाने सदर ठिकाणी सामाजिक कार्यकर्ते व पांगर बावडी गावाचे बालविवाह अधिकारी यांनी भेट दिली असता लग्नातील दोन्ही नवरी मुली अल्पवयीन मिळून आल्या, शिक्षणाचा अभाव, भटके जीवन, तसेच कायद्याबद्दलचे अज्ञान, तरुण मुलींना वयात आल्यानंतर सांभाळायचे कसे?अशी अनेक कारणांमुळे मुलीचा विवाह लावत असल्याचे पालकांनी सांगितले, दोन्ही कडील आई वडील नातेवाईक, यांना AHTU पथकाने कमी वयातील लग्नामुळे मुलींच्या शरीरावर होणारे गंभीर परिणाम, लहान वयात पडणाऱ्या जबाबदाऱ्या, कुपोषित अपत्य, शिक्षणाचे महत्त्व अशा सर्व समुपदेशन करून मुलीचा विवाह अठरा वर्षे झाल्याशिवाय लावून देणार नाही, असे हमीपत्र घेवून सदरचे दोन्ही बालविवाह रोखण्यात आले, ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर यांचे मार्गदर्शनाखाली AHTU पथक प्रमुख API वर्षा व्हगाडे, पोलीस अंमलदार अशोक शिंदे, प्रदीप येवले, मनीषा खरमाटे, रूपाली टोणे,यांचेसह बालविवाह अधिकारी ग्रामसेवक एस. बी. सपकाळ, व सामाजिक कार्यकर्ते तत्त्वशील कांबळे यांनी केली.

## कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे पाटील स्मृती प्रतिष्ठाणच्या वतीने उंदरी येथे खरीप पिक परिसंवाद व आत्मभान जागृती कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२२ मे**

कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे पाटील यांच्या दहाव्या पुण्यस्मरणानिमित्त त्यांच्या नांवे असलेल्या स्मृती प्रतिष्ठाणच्या वतीने रविवार, दिनांक २५ व सोमवार, दिनांक २६ मे २०२५ रोजी केज तालुक्यातील उंदरी येथे विविध उपक्रम तसेच मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कार वितरण व शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोबतच 'खरीप पिक परिसंवाद व आत्मभान जागृती कार्यक्रम' ही होणार आहे. या सर्व कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन श्रीमती प्रभावती बालासाहेब ठोंबरे-पाटील आणि जनार्धनराव दादासाहेब ठोंबरे-पाटील यांच्या वतीने करण्यात आले आहे.

येथील कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे-पाटील स्मृती प्रतिष्ठाणच्या वतीने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, विद्यार्थीप्रिय दिवंगत सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे-पाटील यांच्या दहाव्या पुण्यस्मरणानिमित्त रविवार, दिनांक २५ मे रोजी सायंकाळी ७ वाजून १५ मिनिटाला उंदरी (ता.केज) येथे 'खरीप पिक परिसंवाद व आत्मभान जागृती कार्यक्रम' आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते ॲड.राजेसाहेब देशमुख (माजी अध्यक्ष, अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना, अंबाजोगाई.) आणि उद्घाटक म्हणून अविनाश पाठक (भाप्रसे) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मत्स्य व्यवसाय विकास महामंडळ, मुंबई हे असणार आहेत. यावेळी मार्गदर्शक म्हणून प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे (ख्यातनाम गांधीवादी विचारवंत तथा इतिहास अभ्यासक, लातूर.), आणि प्रा.अरूण गुट्टे (विस्तार कृषि विद्यावेत्ता, अंबाजोगाई.) यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. तसेच २६ मे सोमवार रोजी सकाळी ठिक ९.४० ते १०.०५ या वेळेत वृक्ष पुजन व संवर्धन करण्यात येवून सकाळी १० वाजता नियोजित कार्यक्रमास सुरूवात होईल. उंदरी (ता.केज) येथील 'कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे-पाटील स्मृती भवन' येथे दहाव्या पुण्यस्मरणानिमित्त पुरस्कार वितरण व शेतकरी मेळावा देखिल आयोजित करण्यात आला आहे. या शेतकरी मेळाव्याचे उद्घाटन रमेशराव आडसकर (चेअरमन, अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना.लि.अंबाजोगाई) यांच्या हस्ते होईल. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार सौ.नमिताताई अक्षय मुंदडा (केज विधानसभा मतदारसंघ,जि.बीड) या असणार आहेत. तर यावेळी विचारमंचावर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.नागोराव पवार (माजी संचालक



विस्तार शिक्षण, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी) आणि प्रकाश देशमुख (विभागीय कृषी सहसंचालक, छत्रपती संभाजीनगर) या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. यावेळी विविध क्षेत्रात कार्यरत असणार्या ११ मान्यवरांना कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे-पाटील स्मृती पुरस्कार तर अन्य ४ जणांना अनुक्रमे स्व.माणिकराव दादासाहेब ठोंबरे-पाटील व स्व.सौ.राणीलक्ष्मीबाई दादासाहेब ठोंबरे-पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. पुरस्कार प्राप्त मान्यवरांत अनिकेत द्वारकादास लोहिया, अबाजोगाई (सामाजिक सेवा पुरस्कार-२०२४), दत्ताभाऊ शंकरराव बारगजे, बीड (सामाजिक सेवा पुरस्कार-२०२५), सय्यद रहेमान चाँद पाशा, लातूर (भक्त पुंडलिक पुरस्कार-२०२४), डॉ.संजय शिवराम पवार, ता.कंधार जि.नांदेड (भक्त पुंडलिक पुरस्कार-२०२५), विनोद नरहरराव रापतवार, नागपूर (आदर्श बंधू भरत पुरस्कार-२०२४), महावीर साहेबराव मस्के पाटील, ता.वडवणी जि.बीड (आदर्श बंधू भरत पुरस्कार-२०२५), डॉ.विनोद विजयकुमार चव्हाण, ता.जि.लातूर (पत्रकारिता पुरस्कार-२०२४), प्रा.नानासाहेब निवृत्तीराव गाठाळ (पत्रकारिता पुरस्कार-२०२५), अजीज खुद्दूस सय्यद, ता.जि.लातूर (सद्भावना पुरस्कार-२०२४), सौ.प्रतिभाताई जयंतराव वानखडे, ता.जि.अमरावती (सद्भावना पुरस्कार-२०२५), डॉ.रामधन अंबादास ठोंबरे (उंदरी ग्रामभूषण पुरस्कार-२०२५) तसेच स्व.माणिकराव दादासाहेब ठोंबरे-पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पांडुरंग साहेबराव आवाड, ता.कळंब,जि.धाराशिव (कुशल कारभारी किसान पुरस्कार-२०२४) आणि रेवणसिध्द भागवत लामतुरे, ता.जि.धाराशिव (कुशल कारभारी किसान पुरस्कार-२०२५) स्व.सौ.राणीलक्ष्मीबाई दादासाहेब ठोंबरे-पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सौ.शोभा शिवाजी खोगरे, अंबाजोगाई (कुशल कारभारीन किसान पुरस्कार-२०२४) आणि सौ.द्वारका प्रतापराव काळे, ता.पुर्णा,जि.परभणी (कुशल कारभारीन किसान पुरस्कार-२०२५) यांचा समावेश आहे. २५ व २६ मे या दोन्ही दिवशी कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे पाटील स्मृती प्रतिष्ठाणच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सर्व कार्यक्रमांसाठी केज, अंबाजोगाई तालुका आणि लातूर तसेच बीड जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन श्रीमती प्रभावती बालासाहेब ठोंबरे-पाटील आणि जनार्धनराव दादासाहेब ठोंबरे-पाटील यांच्या वतीने करण्यात येत आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी उंदरी (ता.केज) येथील समस्त गांवकरी उंदरी, माजी कृषी विद्यार्थी संघ व मित्र परिवार, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ, परभणी आदिंनी पुढाकार घेतला आहे.

## भोगवटा धारकांना मालकी हक्क देऊन त्यांना न्याय मिळवून देणार-राजकिशोर मोदी

**अंबाजोगाई शहरातील भोगवटा धारकांच्या नोंदी मालकीमध्ये घेवून मालकीच्या पीटीआर देण्याच्या मागणीचे राजकिशोर मोदी यांचे जिल्हाधिकारी याना निवेदन**

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२२ मे**

अंबाजोगाई शहरात अनेक ठिकाणी नवीन वस्त्या त्याचबरोबर काही जागांवर अतिक्रमण करून अनेक वर्षे पासून शेकडो कुटुंब भोगवट्यामध्ये रहात आहेत. अशा कुटुंबाना मालकीमध्ये घेऊन त्यांना त्यांच्या मालकीच्या पिटीआर द्याव्यात अशी मागणी अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी उपजिल्हाधिकारी यांच्यामार्फत जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे. शहरातील विविध वस्त्यामधील भोगवटा धारकांना मालकीत घेऊन त्यांना त्यांचा हक्क व न्याय मिळवून देणार असल्याचे राजकिशोर मोदी यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.

वरील मागणीसाठी सादर केलेल्या निवेदनामध्येअंबाजोगाई नगर परिषद हद्दीतील असणाऱ्या लोक वस्त्यामधील अतिक्रमण धारकांच्या घरांच्या नोंदी भोगवटयामध्ये आहेत. ज्यामध्ये क्रांती नगर, लाल नगर, कबीर नगर, रायगड नगर, सिद्धार्थ नगर, मिलिंद नगर, गांधी नगर ,बोधी घाट, पेन्शन पुरा, सदर बाजार, समता नगर, भीम नगर, दमदम पुरा, शाह बट्टा, गवळी पुरा या अशा इतर वस्त्या गेल्या अनेक



वर्षापासून वसलेल्या आहेत. तेथे हजारो कुटुंब आपल्या कुटुंबियांसह वास्तव करत आहेत.

२००९ साली महाराष्ट्र शासनाने परिपत्रक काढून सदरच्या अतिक्रमण धारकांच्या भोगवट्यातील नोंदी मालकीत घ्याव्यात असा स्पष्ट उल्लेख केला आहे. मात्र भूमी अभिलेख खात्याच्या धोरणामुळे आजपर्यंत यात यश मिळू शकले नाही. मात्र याच परिपत्रकाच्या आधारे गेवराई नगर परिषदेने भोगवटा धारकांना मालकीच्या पीटीआर दिल्या आहेत.

त्याच पध्दतीने अंबाजोगाई नगर परिषदेने देखील येथील हजारो भोगवटा धारकांना त्यांच्या मालकीच्या जागेत घेऊन त्यांना त्यांच्या मालकीच्या पी टी आर द्याव्यात जेणे करून त्यांना शासनाच्या पंतप्रधान आवास योजना, रमाई आवास घरकुल योजना व अन्य शासकीय योजनांचा लाभ घेता येईल अशी मागणी अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे यांच्या मार्फत जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे. या निवेदनावर राजकिशोर मोदी, आदमाने महादेव , खालेद चाउस, गणेश मसणे, सुनील वाघाळकर, खयामोद्दीन काझी, किशोर परदेशी,कमलाकर हेडे, धम्मा सरवदे, दत्ता सरवदे, आकाश कऱ्हाड, गोविंद पोतंगले, रफीक गवळी, असलम शेख, शरद काळे,अकबर पठाण, मुन्ना वेडे, दत्ता हिरवे,संतोष चिमणे,अक्षय परदेशी आशिष ढेले, तौसिफ सिद्दीकी, यांच्यासह अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.